जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. – तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

???

वाचकांना विनंती

अर्थबोधपत्रिकेचा अंक दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

माहितीसाठी– 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संकेतस्थळाला वाचकांनी अवश्य भेट द्यावी. www.ispepune.org.in

निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

पर्यावरण

इंडोनेशियातील पाणी प्रश्न

आजच्या परिस्थितीत गंभीर होत चाललेला आणि उद्यासाठी एक मोठे आव्हान बनू पाहणारा प्रश्न म्हणजे पाण्याचा प्रश्न. भविष्यातील संघर्ष आणि युद्धे पाण्यामुळेच होतील अशीही आशंका आंतरराष्ट्रीय स्तरावर कळीच्या ठरणाया विषयातील जाणकारांकडून सातत्याने व्यक्त केली जाते आहे. अनेक देशांना भेडसावणारी पाण्याची समस्या लक्षात घेता हे जलसंकट खरोखरीच मोठे असणार आहे याची जाणीव सगळ्यांनाच आहे. इंडोनेशिया हा देशसुद्धा सध्या पाण्याच्या समस्येचा सामना करतो आहे.

आशिया खंडातील एक महत्त्वाचा देश म्हणून इंडोनेशियाकडे पाहिले जाते. एका बाजूला हिंद महासागर तर दुसऱ्या बाजूला प्रशांत महासागर लाभलेला हा देश दोन समुद्रांच्या मध्यभागी वसलेला आहे. या देशाचा ७६ टक्के भाग पाण्याने तर २४ टक्के भाग जमिनीने व्यापलेला आहे. तब्बल ५४ हजार किलोमीटरपेक्षा जास्त समुद्रकिनारा या देशाला लाभलेला आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती आणि खनिजसंपत्तीने हा देश समृद्ध आहे. कोळसा, नैसर्गिक तेल, तांबे, शिसे, फॉस्फेट, युरेनियम, बॉक्साइट, सोने, लोखंड, पारा, निकेल, चांदी, सागवान या देशात विपुल प्रमाणात आढळते. परंतु, संपन्नतेलाही शाप असतो त्याप्रमाणे या देशाला अनेक प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. त्यामुळे सुनामी, भूकंप, पूर, वादळे यांना वारंवार सामोरे जावे लागणे, हे या देशासाठी नित्याचेच आहे.

या देशातील ८४ टक्के जमीन जंगलव्याप्त होती. परंतु, वाढत्या जंगलतोडीमुळे मात्र फार विचित्र परिस्थिती उद्‌भवलेली आहे. १९०० साली १७० दशलक्ष हेक्टर जमीन जंगलाखाली होती. पुढच्या अवघ्या दहा वर्षांत हे चित्र झपाट्याने बदलले आणि ते प्रमाण कमी होऊन १०० दशलक्ष हेक्टर इतके खाली आले. लाकडापासून लगदा तयार करणाया आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी बेसुमार अशी जंगलतोड केली आणि

सगळी परिस्थिती बदलून टाकली. ब्राझीलमध्येही अशीच मोठ्या प्रमाणावर जंगलतोड झाली होती. त्या खालोखाल इंडोनेशियाचाच क्रमांक लागतो. याच्याच जोडीला स्वत:चे रबराचे आणि पामचे मळे असावेत असा विचार शेतकऱ्यांनी केला आणि स्वत:ची शेती बंद केली. अनेकांनी तर या नव्या पर्यायासाठी आपली शेते जाळून टाकली. या सगळ्या बदलांचा परिणाम म्हणजे हरितगृह वायू निर्माण करणाया देशांच्या यादीमध्ये चीन आणि अमेरिकेच्या खालोखाल आता इंडोनेशियाचा तिसरा क्रमांक लागतो.

देशातील बहुसंख्य लोकसंख्या ही नद्या किंवा समुद्राच्या किनायावर वसलेली आहे. देशाच्या आर्थिक व सांस्कृतिक विकासामध्ये नद्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. Kapuas ही या देशातील सर्वांत मोठी नदी आहे. त्या खेरीज Mahakam, Musi यासारख्या काही महत्त्वाच्या नद्यादेखील आहेत. इंडोनेशियामध्ये ५०० हून अधिक सरोवरे आहेत. या देशात फार पूर्वी जे ज्वालामुखी जागृत झालेले होते त्यामुळे उंचसखल जमिनी तयार होऊ न त्यातून सरोवरांची संख्या जास्त आढळून येते. Toba, Poso, Towuti ही प्रमुख सरोवरे इंडोनेशियामध्ये आहेत. यातील बहुतांश सरोवरे पर्यटनस्थळे म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळे तिथे पर्यटकांचा मोठा ओघ कायमच दिसून येतो. बहुतांश सरोवरांचे पाणी पिण्यायोग्य आहे. तसेच सिंचनासाठीदेखील या सरोवराच्या पाण्याचा वापर केला जातो. परंतु, इतर देशांमध्ये ज्या प्रमाणे सरोवरांमध्ये प्रदूषणाची समस्या आढळून येते तशीच समस्या इंडोनेशियातील बहुतांश सरोवरांमध्ये आताशा आढळून येते. तेथील अनेक सरोवरांमध्ये गाळ जमा झालेला आहे. तसेच जलपर्णी वाढलेल्या आहेत. आजुबाजूच्या परिसराचा विकास झाल्याने सरोवरांमध्ये जे प्रदूषण होते तेदेखील मोठ्या प्रमाणावर झालेले दिसून येते. सरोवरांमधील वाढते प्रदूषण लक्षात घेऊन आता तेथील शासनाने पावले उचलण्यास सुरुवात केलेली आहे. सरोवरांची पाहणी करणे, त्यांचे सर्वेक्षण करणे, त्यांची सद्य:स्थिती पाहून उपाययोजना करणे आणि त्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुदींचे नियोजन करणे या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात झालेली आहे.

नद्या आणि सरोवरे यांची विपुल समृद्धता असतानादेखील इंडोनेशियातील १ कोटी ८० लाख लोकांना पिण्याचे सुरक्षित पाणी मिळत नाही. पाण्याच्या तुटवड्यापायीच स्वच्छतेचीही मोठी समस्या निर्माण झालेली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या दोन्ही समस्यांवर लक्ष केंद्रित करावे लागणार आहे.

वीजनिर्मिती आणि सिंचनासाठी धरणांची उभारणीही इंडोनेशिया मोठ्या प्रमाणावर

करते आहे. आजमितीला देशात एकूण ६१ धरणे उभारण्यात आलेली आहेत. जावा बेटावरील Citarum नदीवर Cirata हे देशातील सर्वांत मोठे धरण बांधण्यात आले आहे. वीजनिर्मिती, पूर नियंत्रण, सिंचन, पिण्याचे पाणी उपलब्ध करणे अशी विविध उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून प्रमुख धरणे बांधण्यात आलेली आहेत. इंडोनेशिया हा प्रामुख्याने शेतीप्रधान देश आहे. परंतु, त्याच्या जोडीला आता पर्यटनाची साथ लाभल्याने सेवा आणि उद्योग या क्षेत्रांचा विकास अलीकडच्या काळात तिथे वेगाने झालेला आहे. प्रत्यक्ष राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचे योगदान कमी असले तरीही सामान्य माणसाच्या आयुष्यात शेतीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. तब्बल ४.५ कोटींहून अधिक लोक शेती आणि शेतीपूरक उद्योग करतात. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४१ टक्के लोकांना शेतीच्या माध्यमातून काही ना काही रोजगार प्राप्त होतो. एकूण उपलब्ध जमिनीपैकी ३० टक्के जमीन प्रामुख्याने शेतीसाठीच वापरली जाते.

देशात लागवडीखाली असलेल्या एकूण क्षेत्रापैकी १५ टक्के जमिनीला सिंचनाचा लाभ मिळतो. सिंचनाखाली असलेली एकूण जमीन ७.४ दशलक्ष हेक्टर इतकी आहे. उपलब्ध असणाऱ्या पाण्यापैकी ८० टक्के पाणी हे प्रामुख्याने शेतीसाठी वापरण्यात येते. मात्र सिंचनपद्धतीचा कालानुरूप विकास झालेला नाही. त्यामुळे येथील ५० टक्क्यांहून अधिक सिंचनपद्धती या जुन्या आणि पारंपरिक आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्यामध्ये शेतीचा आधार निश्चितपणाने मोठा आहे. अन्नसुरक्षेबाबतही समाधानकारक अशी स्थिती आहे. परंतु सध्या प्रचलित असलेल्या सिंचनपद्धतीमध्ये सुधारणा करणे हे या देशाच्या पुढ्यातील एक मोठे आव्हान आहे. जमिनीचे क्षारीकरण, पाणी साठून राहणे, कालव्यांद्वारे पाणी फिरताना जमिनीत मुरून पाण्याची होणारी क्षती या सगळ्या मोठ्या समस्या असून त्यावरही काम होणे गरजेचे आहे. देशातील जलसाठवण व्यवस्थाही पुरेशी नाही असे या क्षेत्रातील जाणकार जलअभ्यासकांचे मत आहे. त्यामुळेच ही परिस्थिती भविष्यात आव्हानात्मक बनत जाईल अशी भीती व्यक्त केली जाते आहे.

'वॉटर'सारख्या जागतिक पातळीवर कार्यरत असणाऱ्या संस्था या प्रश्नांवर काम करीत आहेत. पाण्याचे सुयोग्य व्यवस्थापन करणारी 'वॉटरक्रेडिट सोल्यूशन' ही प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. घरात लागणारे पाणी आणि स्वच्छता यासाठी कमी व्याजदरामध्ये लोकांना कर्ज उपलब्ध करून देण्याची सुविधा या योजनेअंतर्गत देण्यात आलेली आहे. २०१४ सालापासून नियोजनबद्ध रीतीने विविध

देशांत याचे काम विस्तारलेले आहे. अनेक वित्तीय संस्थांना मदतीला घेऊन पाण्याच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यावर सातत्याने भर दिला जातो आहे. सुमारे चार कोटी लोकांना चांगले पिण्यायोग्य पाणी आणि स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध करू न देण्यात 'वॉटर' या संस्थेला यश लाभलेले आहे. पाण्याची गरज ही कधीही न संपणारी आहे. त्यामुळे नागरिक कराच्या रूपाने पाण्यासाठी पैसेही मोजतात. परंतु, तरीही जेव्हा लोकांना पुरेसे पाणी मिळत नाही आणि स्वच्छतेच्या किमान गरजा पूर्ण होत नाहीत तेव्हा त्यासाठी 'वॉटरक्रेडिट सोल्यूशन' सारखे 'मॉडेल' उपयुक्त ठरू शकते. त्या अंतर्गत कमी व्याजाने छोटी कर्जे उपलब्ध करून ही समस्या कमी करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. हे 'मॉडेल' इंडोनेशियासह अनेक देशांमध्ये यशस्वी ठरलेले आहे. आजवर १३ देशांमध्ये सहा कोटींहून अधिक लोकांना या माध्यमातून पुरेसे पाणी उपलब्ध करून देण्यात यश आलेले आहे.

आजही इंडोनेशियामध्ये तब्बल २.५ कोटी लोक शौचालयाचा वापर करीत नाहीत आणि उघड्यावर नैसर्गिक विधी आटोपतात. प्रक्रिया न केलेल्या अस्वच्छ पाण्याचा वापर केल्याने अनारोग्याच्या समस्याही मोठ्या प्रमाणावर आहेत. काही वर्षांपूर्वी इंडोनेशियामध्ये झालेल्या सर्वेक्षणानुसार, ८९ टक्के पाण्याच्या स्रोतांमध्ये बॅक्टेरियाचे प्रमाण अधिक आहे. केवळ सात टक्के पाण्यावर प्रक्रिया केली जाते. संपन्नता असतानाही पाण्याच्या संदर्भातील अशा अनेक समस्या इंडोनेशियामध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेल्या दिसतात. हे चित्र बदलण्यासाठी वेळीच पावले उचलणे गरजेचे आहे.

पर्यावरण

वाळवंटीकरण रोखण्यासाठी हिरवी भिंत

वाढत जाणारे वाळवंटीकरण ही आज केवळ एखाद्या राज्याची किंवा देशाची समस्या राहिलेली नाही तर ती अवघ्या जगाची समस्या बनू पाहते आहे. जगातील सर्वांत मोठे वाळवंट म्हणून ज्याची ओळख आहे ते सहारा वाळवंटदेखील अधिक पसरत चालले असल्याचे निरीक्षण अभ्यासकांनी नोंदवलेले आहे. त्यामुळे हे वाढते वाळवंटीकरण रोखायचे कसे हा एक गंभीर प्रश्न पर्यावरण अभ्यासकांच्या पुढ्यात उभा ठाकलेला आहे. त्या प्रयत्नांचाच एक भाग म्हणून हे वाळवंटीकरण रोखण्यासाठी गेल्या दोन दशकांपासून प्रयत्न सुरू आहेत. त्या माध्यमातून, वाळवंटाच्या बाजूच्या भागात मोठ्या प्रमाणावर झाडे लावून एक हिरवी भिंत उभारण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

सहारा वाळवंटात राहणाया आफ्रिकी लोकांचे जीवन संकटात सापडले होते. वाढत्या वाळवंटीकरणाचे अनेक दुष्परिणाम त्यांना मोठ्या प्रमाणावर भोगावे लागत होते. फ्रेंच राजवटीच्या काळात या सगळ्याची सुरुवात झालेली असावी. शेतीच्या चुकीच्या पद्धतींमुळे या भागातील शेतीचे खूप मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. शेतीतून मिळणारे हमखास उत्पादन पाण्याच्या टंचाईमुळे आणखी कमी होत गेले. पुढे १९८० च्या दशकामध्ये या भागामध्ये मोठा दुष्काळही आलेला होता. त्यापायी लोकांचे खूप हाल झाले. परिसरात वाळवंट वाढत होते. परिणामी उरल्यासुरल्या हिरवळीवर भुकेल्या प्राण्यांना पोट भरावे लागायचे. गावेच्या गावे तेव्हा ओस पडू लागली होती. दुष्काळग्रस्त भागात राहणाऱ्या लोकांच्या नशिबी जे भोग येतात ते सारे भोग आफ्रिकेतील लोकांच्या नशिबी आलेले होते. ही परिस्थिती पुढे पुढे आणखीनच बिघडत गेली. त्या संबंधातील अनेक बातम्या सातत्याने वृत्तपत्रांतून आणि प्रसारमाध्यमांतून प्रसारितही होत होत्या. वाढत्या हवामानबदलाचे आणि 'ग्लोबल वॉर्मिंग'चे हे दुष्परिणाम असावेत असाही अंदाज पर्यावरण अभ्यासकांकडून

वर्तवला जात होता.

पसरणारे वाळवंटीकरण रोखण्याच्या प्रयत्नांची सुरुवात झाली ती २००५ सालापासून. नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष Olusegun Obasanjo यांनी जगाच्या व्यासपीठावर एक प्रस्ताव मांडला. सहारा वाळवंटामध्ये 'ग्रेट ग्रीन वॉल' म्हणजे वृक्षांची एक हिरवीगार महाकाय भिंत उभारण्याचा अफलातून पर्याय त्यांनी मुखर केला. या प्रस्तावाकडे सगळ्यांनीच गांभीर्याने पाहिले आणि त्या दिशेने पावले टाकण्याचाही निर्धार करण्यात आला. हवामानबदलाचा सामना करण्याची ती एक महत्त्वाकांक्षी योजना मानली गेली. अटलांटिक महासागरापासून ते लाल समुद्रापर्यंतच्या पट्ट्यामध्ये लाखो झाडे लावण्याचा प्रस्ताव या योजनेअंतर्गत पुढे आणण्यात आला आणि त्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीसंदर्भात विचारमंथन सुरू झाले. १० कोटी हेक्टर जमिनीचे पुनरुज्जीवन करण्याचा संकल्प त्या अंतर्गतच करण्यात आला. असे केल्याने पुढील २५ ते ३० वर्षांत वातावरणातील २५ कोटी टन कार्बन कमी होईल आणि त्यातून पर्यावरणाचे संतुलन राखले जाईल, असा विचार अभ्यासकांनी केलेला होता. या माध्यमातून लाखो लोकांना 'ग्रीन जॉब्ज' म्हणजे पर्यावरण रक्षणासाठी होणाया प्रयत्नांतून रोजगाराच्या नव्या संधीही प्राप्त होतील असा अंदाज वर्तवण्यात आलेला होता. २०३० सालापर्यंत हे सारे पूर्ण करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आलेले होते.

सहारा वाळवंटाच्या दक्षिण किनायावरील प्रदेशात इथिओपिया, सुदान, नायजेरिया, माली, मारिट्रिया आणि सेनेगाल या देशांमध्ये हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प लागू करण्याचे निश्चित झाले. बेनेन, इजिप्त, लिबिया यासारखे इतर देशही त्यात सहभागी झाले. या मोहिमेचा गाजावाजा मोठ्या प्रमाणावर झाला. आता परिस्थिती खूप वेगाने बदलेल असा आशावादही व्यक्त होत राहिला. परंतु प्रत्यक्षात मात्र ज्या वेगाने आणि जोरकसपणाने त्याची सुरुवात झाली तो वेग फार कमी काळ टिकला. त्यामुळे 'ग्रीनवॉल'साठी जो भाग निर्धारित केलेला होता त्यातील अनेक ठिकाणी केवळ चार टक्के तर काही मोजक्या ठिकाणी १८ टक्के लागवड झालेली आहे. सुरुवातीच्या काळात उत्साहाने लावलेली झाडे नष्ट झालेली आहेत. त्यांची देखभाल करून सातत्याने निगराणी होणे आवश्यक असते तसे झालेले नाही. त्याचप्रमाणे, या कामासाठी जो अपेक्षित निधी मिळणे अपेक्षित होते तसेही न झाल्याने अनेक ठिकाणी निधी अपुरा पडतो आहे.

ज्या प्रमुख देशांमध्ये ही वृक्षलागवड करायची होती त्या देशांमध्ये अंतर्गत

कलह, हिंसाचार, ढासळत चाललेली अर्थव्यवस्था अशा अनेक मुद्यांनी जोर पकडलेला असल्याने त्या देशांचे प्राधान्यक्रमही वेगळे होत गेले. त्यामुळे हा महत्त्वाचा आणि अगदी ऐरणीवरचा प्रश्न असतानाही तो काहीसा मागे पडत गेला. त्यामुळे आफ्रिकेमध्ये 'ग्रेट ग्रीन वॉल' उभारावी असा जो संकल्प जागतिक पातळीवर झालेला होता त्यालाच तडे गेल्याचे वास्तव आजघडीला अगदी स्पष्टपणे दिसते आहे. हवामानबदलाच्या समस्येवरचे आफ्रिकी उत्तर म्हणून ज्या पर्यायाकडे मोठ्या गांभीर्याने पाहिले गेले होते त्याची कार्यवाही मात्र तितक्या प्रभावी रीतीने झाली नाही हे वास्तव नाकारता येत नाही.

दुष्काळासारखी गंभीर परिस्थिती तिथे दिसू लागल्याने आणि येणाया काळात ही परिस्थिती आणखीन तीव्र होत जाणार आहे हे लक्षात आल्याने आफ्रिकेतील Sahel प्रदेशावर प्रथमत: लक्ष केंद्रित करण्यात आले. नैसर्गिक आपत्तीचे हे आव्हान मोठेच होते. कारण, वर्षाला दोन सेंटिमीटर अशा वेगाने सहारा वाळवंट या भागात पुढे सरकत असल्याचे अभ्यासातून समोर आले. वाढते वाळवंटीकरण रोखण्यासाठी तातडीने पावले उचलणे त्यामुळेच गरजेचे होते. सुरुवातीच्या काळात या समस्येवरचे उत्तर अगदी सहज आणि सोपे वाटले होते. परंतु, प्रत्यक्षात जेव्हा कामाला सुरुवात झाली तेव्हा मात्र त्यातील अनेक अडचणी समोर येत गेल्या. हा वाळवंटी प्रदेश खूप मोठा असून या सगळ्याच भागामध्ये भौगोलिक आणि सांस्कृतिक विविधताही मोठी आहे असे लक्षात आले. हजारो किलोमीटर क्षेत्रांत वाळवंट पसरलेले आहे. या परिसरात असलेल्या सगळ्याच देशांना तीव्र स्वरूपाच्या नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागतो आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती घटल्यामुळे निर्माण होणारे लोकजीवनातील संघर्ष, कुपोषणाची गंभीर समस्या या प्रदेशांमध्ये गंभीर स्वरूप धारण करते आहे. त्यामुळे किमानपक्षी जगता यावे म्हणून स्थलांतर करणाऱ्यांची संख्या मोठी आहे.

परंतु, कमी अधिक फरकाने परिस्थिती सगळीकडे सारखी असल्याने या आव्हानांचे स्वरूपही साधारणत: तसेच आहे. या संकटांचा परिणाम लोकांवर होताना अगदी स्पष्टपणे दिसू लागल्याने पर्यावरण आणि समाजशास्त्राचे अभ्यासकही या विषयी सातत्याने चिंता व्यक्त करीत आहेत. लाखो लोकांनी आपापली गावे सोडून शहरांकडे धाव घेतलेली आहे. मायदेश सोडून इतर देशांमध्ये आश्रय घेणायांचीही संख्या वाढत असल्याचे अभ्यासातून समोर येते आहे. जीव धोक्यात टाकून आफ्रिकेतील अनेक असहाय, अगतिक आणि हतबल झालेले लोक भूमध्य समुद्रात बोटींतून

प्रवास करतात आणि जिथे मिळेल तिथे आश्रय घेऊ पाहतात. त्यामुळे या विस्थापितांचीही एक नवीच समस्या आता अनेक देशांसाठी डोकेदुखी ठरू लागली आहे. एक चांगले, नवे आयुष्य सुरू करण्याच्या आशेने ही सारी धडपड सुरू असली तरी अनेकांना या प्रयत्नांत यश येतेच असे नाही. अनेकजण देशोधडीला तर कित्येकजण मृत्यूपंथाला लागले आहेत. त्यामुळेच 'ग्रेट ग्रीन वॉल' सारखा प्रकल्प या सगळ्या प्रश्नांवरचे उत्तर ठरू शकतो आणि त्याचे यश म्हणूनच महत्त्वाचे आहे, अशी भूमिका अभ्यासक व्यक्त करतात.

आफ्रिकेतील 'ग्रेट ग्रीन वॉल' प्रकल्पाच्या आफ्रिकी युनियनचे समन्वयक Dr. Elvis Paul Tangem यांच्या मते, हवामानबदलाचा सामना करण्यासाठी हा प्रकल्प पूर्णत्वास जाणे खरोखरीच गरजेचे आहे. आफ्रिकेचा ५० टक्के भाग हा कोरड्या हवामानाचा आहे. वाळवंटीकरणाचा सामना करण्यासाठी आणि भविष्यातील आव्हानांची जाणीव करून देऊन त्यांना सक्षम बनवणे हा या प्रकल्पाचा एक मुख्य हेतू होता. हवामानबदलाचा सामना करण्याच्या दृष्टीने या दिशेने टाकली जाणारी सर्व पावले महत्त्वाची ठरतील ही जाणीव लोकांच्या मनात निर्माण होणे गरजेचे आहे. सुरुवातीला ही योजना अगदीच साधी होती. आफ्रिकेतील Dakar पासून Djibouti पर्यंत हिरव्यागार वृक्षराजींची एक भिंत उभी करण्याचा विचार होता. परंतु जेव्हा प्रत्यक्षात काम सुरू केले तेव्हा लक्षात आले की कोरड्या हवामानाच्या प्रदेशात झाडे लावणे हेच मुळात आव्हान आहे. तेवढे करून भागत नाही तर ती जगण्यासाठी मेहनत घ्यावी लागते आणि त्यांचे जतन करण्यासाठीही विशेष प्रयत्न करावे लागतात. नवीन झाडे लावण्यासाठी सर्वाधिक गरज असते ती पाण्याची. जिथे पाण्याचेच दुर्भिक्ष्य असते तिथे झाडे लावण्यासाठी वेगळे पाणी कुठून आणणार? उपलब्ध असणाऱ्या पाण्याचाच वापर करायचे ठरवले तर आधीच टंचाईचा सामना करणाया लोकांच्या शेतीसाठीच्या आणि इतर वापराच्या पाण्यावर ते अतिक्रमण ठरते. या प्रदेशात वन्यजीवही मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यांच्या चायाची व्यवस्था कशी लावणार हाही एक मोठा प्रश्न होताच. या शिवाय, शेतकऱ्यांची गुजराणही शेतीवरच होत असल्याने शेतीसाठीच्या पाण्यावर मर्यादा आणून चालणार नव्हते. नव्याने पाण्याचे स्रोत उपलब्ध होऊ शकणार नव्हते. कमी-अधिक फरकाने सर्व भागांत अशीच परिस्थिती होती. त्यामुळे कागदावर ही योजना जेवढी आकर्षक आणि सोपी वाटत होती त्याहीपेक्षा किती तरी मोठ्या प्रमाणात व्यावहारिक अडचणी समोर येऊ लागल्या.

असे असूनही ही योजना कार्यान्वित करण्यासाठी पावले उचलण्यात आली. पश्चिम आफ्रिकेतील Senegal प्रांतामध्ये तब्बल १ कोटी ८० लाख झाडे लावण्यात आली. या मोहिमेतून २०३० सालापर्यंत १० कोटी हेक्टर जमिनीचे पुनरु ज्जीवन करण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले होते. ही योजना राबवण्यासाठी १९ अब्ज अमेरिकी डॉलर्स इतका खर्च करण्यात येणार होता. या मोहिमेचा शुभारंभ अगदी धडाक्यात करण्यात आला. त्याचे परिणाम आश्वासक असल्याने या प्रयत्नानंतर चांगले यश मिळेल असा विश्वास अनेकांना होता. कोरड्या प्रदेशात इतक्या मोठ्या प्रमाणावर झाडे लावण्याचा एक विक्रमच ठरावा इतकी झाडे लावण्यात आली. परंतु, ही झाडे लावल्यानंतर प्रतिकूल हवामान आणि पुरेशा पाण्याचा अभाव या कारणाने झाडे मरण्याचेही प्रमाण मोठे होते हे लक्षात येत गेले. शुष्क प्रदेशांत मोठ्या प्रमाणावर झाडे लावून ही समस्या अशी सुटणार नाही तर संपूर्ण देशभरात झाडे लावली गेली तरच संतुलन राखले जाऊ शकेल, हे अभ्यासकांच्या लक्षात येत गेले. तरीही ही योजना अपयशी ठरू शकते हे सुरुवातीच्या काळात कुणी बोलले नाही. कारण ही योजना अफलातून असल्याचे सांगत अनेकांनी त्या संकल्पनेची पाठराखण केलेली होती. त्यामुळे अनेकांना परीकथेसारखी तिची भुरळ पडलेली होती. 'ग्रेट ग्रीन वॉल' हीच परिवर्तनाची नांदी आहे आणि तेच हवामानबदलावरचे उत्तर आहे, असा अनेकांचा त्या काळात समज झालेला होता. परंतु, जगभरातील मोजके संशोधक मात्र याकडे चिकित्सक आणि अभ्यासू दृष्टीने पाहत होते. त्यांच्या दृष्टीने ही योजना यशस्वी होणे तसे अवघड होते.

अमेरिकेतील World Resources Institute मध्ये वरिष्ठ संशोधक असणारे Chris Ray यांच्या मते, आफ्रिकेतील आठ हजार किलोमीटर भागामध्ये अशी एखादी 'ग्रीन वॉल' उभारण्याची संकल्पना म्हणजेच अपयशाची हमी होती. कारण पावसाचे अत्यल्प प्रमाण असणाऱ्या ठिकाणी झाडे लावून ती वाढवण्याचा विचार केला जात होता. वर्षाला जेमतेम ३०० ते ४०० मिलिमीटर पाऊस जिथे पडतो, त्या कोरड्या हवामानाच्या ठिकाणी झाडे जगण्याचे प्रमाण कमी असते हे प्राथमिक भान योजनेची सुरूवात करतानाच संबंधितांना असायला हवे होते. आफ्रिकेतील Sahel प्रदेशात लोकसंख्येचे प्रमाण मुळातच कमी असल्याने या झाडांची निगा राखली जाण्याचे प्रमाणही कमी राहणार हे उघड होते.

काही संशोधकांनी मूळ योजनेतील त्रुटी प्रारंभीच उघडपणे मांडल्या असल्या तरीही योजना राबवली गेली. फक्त सरकारने योजना राबवण्यासाठी पुढाकार घेण्यापेक्षा

स्थानिक लोकसहभातून, शेतकऱ्यांच्या प्रयत्नांतूनच ही योजना यशस्वी होऊ शकते असेही या अभ्यासकांनी सुचवले होते. स्थानिक शेतकयांनी त्यांच्या शेतासाठी लागणारे पाणीसाठे कसे केले आहेत त्याचा अभ्यास करून छोट्या प्रयत्नांना मिळालेले मोठे यश लक्षात घ्यावे, याकडे काही अभ्यासक लक्ष वेधू पाहत होते. नेमके काय करायला हवे याची जाणीव पिढ्यानपिढ्या तिथे राहणाऱ्या लोकांनाच असल्याने त्यांना अशा योजनांमध्ये सहभागी करून घेणे गरजेचे आहे, त्यांची स्थानिक तंत्रे मोठ्या पातळीवर यशस्वी होऊ शकतात हा मुद्दा Chris Ray यांच्यासारख्या अभ्यासकांनी अगदी आग्रहाने मांडला.

आजघडीला हे लक्ष्य साधायचे तर आता वर्षाला एक कोटी हेक्टर जमीन पुनरुज्जीवीत होणे गरजेचे आहे. त्यासाठी आणखी वेगाने काम करण्याची गरज आता निर्माण झालेली आहे. लोकसहभाग, पुरेसा निधी आणि कल्पक अंमलबजावणी यावर या योजनेचे यश अवलंबून असणार आहे. आजही ही कल्पना यशस्वी व्हावी असे अनेकांना वाटते. अद्याप त्यात यश आलेले नसले तरी पश्चिम आशिया, सौदी अरेबियासुद्धा अशी 'ग्रीन वॉल' उभारण्यासाठी पुढाकार घेऊ लागले आहे. हवामानबदलावरचे हे प्रभावी उत्तर ठरावे, ही अपेक्षावजा आस सर्वांनाच आहे. त्या दृष्टीने जगभरात पावले पडत गेली तर निश्चितच काही सकारात्मक बदल घडू शकतील.

पर्यावरण

‘प्रोजेक्ट टायगर’ : नियोजनबद्ध प्रयत्नांचे यश

भारताचा राष्ट्रीय प्राणी म्हणजे वाघ. भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर वनप्रदेश असतानादेखील दुर्दैवाने वाघांची संख्या झपाट्याने कमी होत चालली होती. त्यामुळे ही प्रजातीच कालौघात नष्ट होईल की काय अशी भीती पर्यावरण संरक्षक व निसर्गप्रेमी अभ्यासकांना वाटू लागली होती. वाघांची दरवर्षी घटणारी संख्याही त्या शोषणाकडे निर्देश करत होती. त्यामुळे वाघांची संख्या कमी होण्याची कारणे लक्षात घेऊन त्याबाबत तातडीने उपाययोजना करणे ही काळाची गरज होती. वाघ वाचवण्यासाठी या पूर्वीही वनविभागाच्या पुढाकाराने काही मोहिमा हाती घेण्यात आलेल्या होत्या. परंतु, त्या सगळ्याच मोहिमांमध्ये यश मिळाले असे नाही. त्यामुळे सर्वतोपरी प्रयत्न करू न वाघ वाचवायला हवेत यासाठी बरोबर २५ वर्षांपूर्वी ‘प्रोजेक्ट टायगर’ या नावाने एक मोहिम हाती घेण्यात आली होती. Wildlife Conservation of Tiger in India अंतर्गत ही मोहीम हाती घेण्यात आली.

माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळामध्ये त्यासाठी प्रथमत: पावले उचलण्यास सुरुवात झाली. ‘रॉयल बेंगॉल’ वाघ वेगाने कमी होत चालले होते हे लक्षात घेऊन त्यांना वाचवण्यासाठी प्रामुख्याने या मोहिमेअंतर्गत प्रयत्न सुरू करण्यात आले. उत्तराखंडमधील ‘जिम कार्बेट नॅशनल पार्क’मधून त्याची सुरु वात करण्यात आली. त्यासाठी सर्वाधिक गरज होती ती म्हणजे वाघांचे जंगलातील अधिवास व्यवस्थित करण्याची आणि तेथील मानवी हस्तक्षेप कमी करण्याची. कारण वाघांची संख्या कमी होण्याचे तेच प्रमुख कारण होते. त्यामुळे प्रथमत: वाघांचे अधिवास असणारे क्षेत्र माणसांपासून मुक्त करण्यात आले. जंगलातील ज्या भागांत वाघांचे अस्तित्व होते तो परिसर सुरक्षित कसा राहील याकडे विशेषत्वाने लक्ष देण्यात आले.

याचपद्धतीने सर्व ठिकाणच्या जंगलांमध्ये सुनियोजित प्रयत्न सातत्याने करण्यात आल्यामुळे हळूहळू वाघांची संख्या वाढू लागल्याचे चांगले चिन्ह दिसून येते आहे.

त्यांची संख्या गेल्या २५ वर्षांत १२०० वरू न आता पाच हजारांवर गेली आहे. या प्रकल्पात सहभागी सर्व वनसंरक्षकांनी खूप मनापासून प्रयत्न केल्याने हे यश मिळू शकले. देशभरातील ५० राष्ट्रीय वनक्षेत्रे या प्रकल्पात सहभागी झाल्यानेच वाघांची संख्या वाढवण्यात यश मिळू शकलेले आहे. जिम कॉर्बेट, बंदीपूर, रणथंभोरे, नागझिरा, गीर, कान्हा, सुंदरबन, पेंच, काझिरंगा, दांडेली, मदुमलाई अशी सर्व राष्ट्रीय स्तरावरची जंगले या प्रकल्पात सहभागी झालेली आहेत.

अर्थात, सातत्याने २५ वर्षे केलेल्या प्रयत्नांनंतर आज हे यश दिसून येत असले तरीदेखील वाघांची संख्या वाढवणे हे तसे आव्हानात्मक काम होते. १९७० मध्ये वाघांची संख्या जेव्हा केवळ एक हजारावर आली तेव्हा सगळ्यांकडूनच चिंता व्यक्त केली जाऊ लागली होती. 'राष्ट्रीय प्राणी' म्हणून मानबिंदू असणाया जंगलातील या महत्त्वाच्या प्राण्याची प्रजातीच नष्ट होईल की काय अशी भीती अनेकांनी त्या काळात वर्तवण्यास सुरुवात केलेली होती. परंतु त्या नंतरच्या सुनियोजित प्रयत्नांनी वाघांची संख्या वाढत जात आज पाच हजारांवर पोहोचलेली आहे. विशेष म्हणजे गेल्या आठ वर्षांत वाघांच्या एकूण संख्येत ३० टक्क्यांची लक्षणीय वाढ झालेली आहे.

वाघांची तस्करी व शिकार रोखण्यासाठी प्रयत्न

वाघांची घटणारी संख्या ही अवघ्या जगापुढील समस्या असल्याकारणाने जगभरातील पर्यावरणरक्षक या समस्येवर उत्तर शोधत असताना भारताने या समस्येवर मात करत उत्तम यश संपादन केले आहे. विसाव्या शतकामध्ये जगभरात वाघांची संख्या सुमारे एक लाख होती. ती संख्या झपाट्याने कमी होत केवळ पाच हजारांवर आली. वाघांची केली जाणारी शिकार, वाघाच्या अवयवांची मोठ्या प्रमाणावर होणारी तस्करी, त्यांचे अधिवास नष्ट होणे, माणसांनी जंगलांत केलेले अतिक्रमण आणि वातावरणात होत असलेले बदल या प्रमुख कारणांमुळे वाघांची संख्या लक्षणीयरीतीने कमी कमी होत गेली. सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे वाघांची मोठ्या प्रमाणावर होणारी शिकार आणि त्यांच्या अवयवांची केली जाणारी तस्करी. वाघांची कातडी, नखे, दात आणि हाडे यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खूप मागणी आणि मोठी किंमत असल्याकारणाने वाघांची शिकार मोठ्या प्रमाणावर केली जात होती. आजही अनेकांसाठी वाघाची शिकार हे शौर्याचे लक्षण आणि प्रतिष्ठेचे प्रतीक असल्यानेदेखील वाघांची शिकार केली जाते. आजही जगातील अनेक भागांमध्ये जिथे वैद्यकीय सुविधांचा पुरेसा विकास झालेला नाही तिथे वाघाच्या अवयवांचा

वापर औषधे तयार करण्यासाठी केला जातो. वाघांच्या अवयवांना असलेली मागणी लक्षात घेऊन काही प्रमाणात वाघांना जपण्याचे प्रयत्न झाले परंतु नंतर त्याच ठिकाणांवरून मोठ्या प्रमाणावर तस्करीही सुरू झाली. ही रोखण्यासाठी भारताने विशेषत्वाने प्रयत्न केले. ज्या ठिकाणी ही तस्करी प्रामुख्याने होत होती त्या ठिकाणी कारवाई करून त्याला चाप बसवण्यात आला. तसेच शिकारीवर कठोर निर्बंध लादले आणि शिकारीसारख्या गैरप्रकारांनाही योग्य रीतीने आळा घातला. शिकार आणि तस्करीसाठी वाघांना मारले जात होते ते प्रमाण या कठोर निर्बंधांमुळे चांगल्या रीतीने रोखले गेले.

वाघांचे अधिवास सुरक्षित करण्यावर भर

वाघांचे अधिवास हा अतिशय कळीचा मुद्दा होता. कारण वाघांना शिकार करण्यासाठी आणि फिरण्यासाठी जंगलाचा खूप मोठा परिसर लागतो. मोठ्या झुडुपांमध्ये आणि गवतांमध्ये वाघ दबा धरून बसतात आणि सावज टप्प्यात आले की झेप घेतात. परंतु, अधिवासातून याच गोष्टी जेव्हा कमी होत जातात तेव्हा त्या परिस्थितीत जगणे वाघांनाखूप अवघड होऊन जाते. अधिवास नष्ट होणे, वातावरणातील मोठे बदल आणि माणसांनी केलेली घुसखोरी या प्रमुख कारणांमुळे वाघांचे नैसर्गिक अधिवास कमी झालेले आहेत. एकीकडे माणसांची लोकसंख्या झपाट्याने वाढत गेल्याने जंगलांचे क्षेत्र कमी होत गेले आणि माणसांच्या या अतिक्रमणाचाही परिणाम वाघांच्या संख्येवर होत गेला. अभ्यासकांच्या मते, वाघांना पूर्वी उपलब्ध असलेल्या नैसर्गिक अधिवासांपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक क्षेत्र आज त्यांच्यापासून दुरावलेले आहे. त्यामुळेच यासाठी जागतिक स्तरावर पुढाकार घेतला जातो आहे. World Wildlife Fund च्या माध्यमातून जगभरातील वनसंपदा आणि तेथील वाघांचे संरक्षण, जतन आणि संवर्धन करण्यासाठी विशेषत्वाने निधी उपलब्ध करून दिला जातो. वाघांचे अधिवास चांगल्या रीतीने निर्माण व्हावेत आणि जंगलातील अवघड रस्त्यांना जोडण्यासाठी आवश्यक तिथे पूल, रस्ते किंवा सहजतेने प्रवासाचे मार्ग निर्माण करणे यावर प्रामुख्याने भर दिला जातो. या माध्यमातून वाघांना जंगलात मुक्तपणाने राहता यावे आणि संख्या वाढण्यासाठी त्यांना पोषक वातावरण निर्माण व्हावे म्हणून जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यावर भर दिला जावा अशी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने भारतातील राष्ट्रीय प्राणी संग्रहालये आणि वनक्षेत्रांमध्ये अतिशय नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात आले. वाघांच्या फिरण्यावर बंधने येणार नाहीत आणि मानवी हस्तक्षेपांमुळे त्यांचे जीवन धोक्यात येणार नाही याची सर्वतोपरी

काळजी घेण्यात आली. त्यामुळे वाघांच्या प्रजोत्पादनासाठी आवश्यक असणारे सुरक्षित वातावरण वाघांना आपसूकच प्राप्त झाले आणि त्यामुळे त्यांची संख्या वाढू लागली. या प्रयत्नांमध्ये सातत्य आणि नियोजन असल्याकारणानेच हे साध्य होऊ शकले, असे जाणकारांचे मत आहे.

व्याघ्ररक्षणाच्या इतर उपाययोजना

जंगलात असणाऱ्या वाघांचा योग्य रीतीने मागोवा घेत राहण्यासाठी त्यांचे 'ट्रॅकिंग' करणे गरजेचे असते. ते जितक्या प्रभावी पद्धतीने होत राहील तेवढ्या प्रमाणामध्ये वाघांचे नेमके स्थान आणि त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवता येते. म्हणूनच भारतामध्ये जिथे जिथे वाघांचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी वाघांचे 'ट्रॅकिंग' करण्यावर विशेषत्वाने भर देण्यात आला. तसेच ठिकठिकाणी कॅमेरे बसवून आवश्यक तिथे अन्य तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली. वाघांच्या पावलांच्या ठशांचे निरीक्षण करून सातत्याने माग घेण्यात आला.

या आणि अशा प्रयत्नांतूनच गेल्या काही वर्षांत वाघांची संख्या पुन्हा वाढवण्यात यश मिळाले आहे. वाघांचे अस्तित्वच नष्ट होईल अशी भीती जिथे सातत्याने वर्तवली जात होती तिथे 'प्रोजेक्ट टायगर' सारख्या मोहिमांतील प्रयत्नामुळे वाघांचे संरक्षण करून त्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढवण्याचे लक्ष्य साध्य करता आले आहे, ही खरोखरीच उल्लेखनीय अशी बाब म्हणावी लागेल. येणाया काळात हा आलेख पुन्हा खाली येणार नाही याची दक्षता मात्र घ्यावी लागेल.

पर्यावरण

जपानी पाऊले सोसायटी ५.० कडे...

अवघे जग सध्या एका मोठ्या स्थित्यंतराच्या काळातून जाते आहे. आपल्या एकूणच जीवनव्यवहारामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, माहिती तंत्रज्ञान आणि रोबोटिक्स या तंत्रज्ञानांचा प्रभाव वाढतो आहे. त्यामुळे समाज आणि अर्थकारण अगदी झपाट्याने बदलताना दिसते आहे. तेव्हा अशा या नव्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत नव्या समाजाची निर्मिती करण्याचे प्रयत्न म्हणून 'सोसायटी ५.०' अशी संकल्पना जपानच्या क्षितीजावर उदयास आलेली आहे. अद्ययावत अशा तंत्रज्ञानाच्या मदतीने 'सुपर स्मार्ट सोसायटी' साकारणे हे प्रमुख लक्ष्य 'सोसायटी ५.०' मध्ये डोळ्यासमोर ठेवण्यात आलेले आहे. सगळ्या जगामध्ये तंत्रज्ञानामुळे सामाजिक आणि आर्थिक पातळीवर अनेक बदल होत असताना या नव्या समाजाच्या उभारणीतून आपण एक वेगळे 'मॉडेल' जगासमोर उभे करू शकू असा विश्वास जपानला वाटतो आहे.

राखेतून उभारी घेत हिंमतीने नवे विश्व साकारणारा देश म्हणून जपानकडे पाहिले जाते. तंत्रज्ञानाचा विकास करून सातत्याने नवनवीन शोध लावण्याच्या बाबतीत जपान आज अग्रेसर आहे. हाच जपान सध्या 'सोसायटी ५.०' चे लक्ष्य नजरेसमोर ठेवून वेगाने वाटचाल करीत आहे. त्या दृष्टीने या देशाने विविध क्षेत्रे आणि त्यांत करावयाचे काम निश्चित करत येणाऱ्या काळात भरीव संशोधन करून त्यात प्रगती साध्य करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. जपानच्या दृष्टीने 'सोसायटी ५.०' हा मानवी उत्क्रांतीचा सर्वांत मोठा टप्पा असणार आहे.

Internet of Things (IOT) या तंत्रज्ञानाने पुढील काळातील समाज जोडलेला असणार आहे. इतर सर्व तंत्रज्ञाने ही या तंत्रज्ञानाशी जुळवून घेत माणसाची जीवनशैली अधिक सुलभ कशी होऊ शकेल यादृष्टीने कार्यरत असणार आहेत. त्या दृष्टीने भविष्याचा वेध घेऊन जपानने आतापासूनच कंबर कसलेली आहे. नवे काही तरी साकारण्याची ऊर्मी असणाऱ्या 'स्टार्ट अप्स'ना प्रोत्साहन देण्याबरोबरच लघु व

मध्यम उद्योजकांमधील सुप्त किंवा अद्याप प्रगट न झालेले कौशल्य व कल्पना विकसित करण्यावर जपानने विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. अवघ्या जगासाठी नवे पर्याय ठरू शकतील अशा चौकटीबाहेरच्या नाविन्यपूर्ण कल्पना समूर्त व्हाव्यात आणि त्या कल्पनांना मूर्त रूप देऊन काही नवे साकारावे यासाठी जपान सातत्याने प्रयत्नशील आहे.

जपानने ज्या क्षेत्रांमध्ये संशोधनावर लक्ष केंद्रित केलेले आहे ते पाहता माणसाचे दैनंदिन जीवनमान सुलभ करण्याच्या जोडीला विविध क्षेत्रांतील उद्योगक्षेत्रांचा विकास चांगल्या रीतीने व्हावा व त्या सगळ्याचा आधार नवे तंत्रज्ञान असावे या दिशेने जपानी संशोधक व अभ्यासक प्रयत्न करीत आहेत, असे स्पष्ट दिसते.

आपले शरीर जेव्हा हालचाल करीत असते तेव्हा कोणत्याही अवयवाला ती हालचाल करण्यासंबंधातील संदेश मेंदूच्या माध्यमातून दिला जात असतो. परंतु, अनेकदा वयामुळे किंवा शारीरिक अक्षमतेमुळे हा संदेश पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात तेव्हा तो अवयव पूर्ण क्षमतेने काम करणे बंद करतो. अशा वेळी ही प्रक्रिया थांबू नये आणि शरीराच्या हालचाली व अवयव योग्य रीतीने कार्यरत राहावेत म्हणून आता Cybernic Treatment या नव्या तंत्रज्ञानाचा विकास केला जातो आहे. वयपरत्वे आपली केंद्रिय मज्जासंस्था हळूहळू कमी क्रियाशील होऊ लागते. त्यामुळे लोकांना उतारवयातदेखील अधिक निरोगी जीवन जगता यावे म्हणून तंत्रज्ञानाची आवश्यक तिथे मदत घेण्याचा विचार रुजतो आहे. Cybernic Treatment मध्ये स्नायू मजबूत होत नाहीत तर केंद्रिय मज्जासंस्थेशी असणारा त्यांचा संपर्क अधिक सक्षम करण्यावर भर दिला जातो.

मेंदुला जे संदेश शरीराकडून पाठवले जात असतात त्यामुळे मेंदू कायम क्रियाशील राहतो. परंतु, वयपरत्वे येणारे आजारपण, एखादी गंभीर दुखापत यामुळे अवयवांच्या हालचालींवर मर्यादा येतात आणि मेंदुला पाठवले जाणारे संदेशही कमी होत जातात. Cybernic Treatment मध्ये शरीरात खास 'सेन्सर' बसवले जातात. मेंदूशी होणारे संदेशवहन सुलभ व्हावे यासाठी हे 'सेन्सर' काम करतात Neuromuscular disorder सारख्या आजारांनी त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी ही उपचारपद्धती वरदान ठरू शकते. म्हणूनच जपानने त्या विषयीच्या संशोधनावर विशेष लक्ष केंद्रित केलेले आहे. जपानमधील रुग्णालयांमध्ये HAL Robot Suit System ही 'रोबोटिक' यंत्रणा प्रस्थापित केली जाते आहे. 'सोसायटी ५.०'च्या दिशेने जाताना या आणि अशा तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आपल्याला मानवी जीवन अनेक प्रकारांनी सुलभ

करता येऊ शकेल. वाढत्या वयामध्ये शरीरावरील नियंत्रण चांगल्या पद्धतीने राखता यावे या दृष्टिकोनातून Cybernic Treatment मध्ये जपानी संशोधक सातत्याने नवनवीन संशोधने करीत आहेत.

चांगले नवे तंत्रज्ञान जसजसे विकसित होत जाते त्या प्रमाणात उत्पादकतेचाही विकास होत जातो. Radio-Frequency Identification (RFID) या नव्या तंत्रज्ञानाचा वापर सध्या जगभरातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर होऊ लागलेला आहे. त्याचा प्रभाव लक्षात घेता जपानने त्यामध्ये विशेष संशोधन करण्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. धातूच्या वस्तूंची देखभाल व देखरेख करण्यासाठी RFID या नव्या तंत्रज्ञानाचा वापर होऊ शकणार नाही असे म्हटले जात होते. परंतु जपानी संशोधक त्यावर सातत्याने संशोधन करीत असून त्यांना यश मिळू लागलेले आहे. जपानमधील Kanazawa या कंपनीने मात्र हा समज दूर केला असून धातूच्या वस्तूंसाठीही हे नवे तंत्रज्ञान वापरात येऊ शकते हे त्यांनी दाखवून दिलेले आहे.

'डिजिटल' पायाभूत सुविधा :

जपानमध्ये कोट्यवधी लोक दररोज रेल्वेसेवेचा लाभ घेतात आणि प्रवास करतात. पहाटेच्या वेळी सुरू होणारी रेल्वेसेवा रात्री उशीरापर्यंत सुरू असते. रेल्वेसेवा खंडीत होऊ न देता योग्य रीतीने देखभाल करणे हे खरोखरीच आव्हानात्मक असते. IOT Technology चा वापर करून रेल्वेशी संबंधित अचूक माहिती संकलित करणे आणि तिचे विश्लेषण करणे खूप सोपे झाले आहे. त्यामुळे अशा 'डिजिटल' सुधारणांचा लाभ घेत आता अधिक सक्षमतेने पायाभूत सुविधांची देखभाल करता येऊ शकते हे लक्षात आल्याने जपान सरकारने त्यावर विशेष भर देण्यास सुरुवात केलेली आहे. येणाऱ्या-जाणाऱ्या सर्व रेल्वेगाड्यांवर लक्ष ठेवण्यासाठी रेल्वेरुळांवर 'सेन्सर्स' बसवण्यात आलेले आहेत. त्याद्वारे सर्व माहिती मिळत राहते. रेल्वेरुळांची सद्य:स्थिती, रेल्वेगाड्यांची अवस्था याची पूर्वसूचना मिळून पायाभूत सार्वजनिक वाहतूक सुविधांची यंत्रणा अद्ययावत राखणे या सगळ्यांच्या माध्यमातून शक्य होणार आहे. Smart Digital Maintenance सुविधेचा विकास करीत राहून भविष्यात या सुविधा जगभरात प्रदान करण्याचा जपानचा विचार आहे.

समाजाच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन दर्जेदार आणि परिणामकारक औषधनिर्मिती करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यावर जपानने लक्ष केंद्रित केलेले आहे. सद्य:स्थितीत कर्करोग आणि इतर अनेक रोग असे आहेत ज्यांची औषधे खूप महाग आहेत आणि अनेक औषधांचे सेवनपश्चात दुष्परिणाम भोगावे

लागतात. त्यासाठी जपानने आता Peptide Discovery Platform System ही एक नवीन यंत्रणा प्रस्थापित करण्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. रोगाच्या पेशी मारण्यासाठी औषध घेतले जाते तेव्हा चांगल्या पेशींवरही हल्ला होतो आणि त्यातूनच औषधांचे सेवनपश्चात दुष्परिणाम सहन करावे लागतात. त्यामुळे औषधांचे सेवनपश्चात दुष्परिणाम होऊच नयेत अशी औषधे भविष्यात कशी विकसित करता येतील या दिशेने संशोधन करण्यावर भर देण्यात येणार आहे. जपानला या संशोधनात यश आले आणि त्या पद्धतीची औषधे तयार करता आली तर वैद्यकशास्त्रातील ती एक मोठी क्रांती ठरणार आहे आणि अवघ्या विश्वासाठी ही उपकारक अशी बाब ठरणार आहे.

उद्योगविश्वासाठी अत्याधुनिक 'रोबॉट' :

उत्पादननिर्मितीच्या क्षेत्रामध्ये आता अधिकाधिक आधुनिकता येऊ लागलेली असून त्यामध्ये 'रोबॉट'चा वापर वाढू लागलेला आहे. अत्याधुनिक व नवीन क्रांती घडवू पाहणारे 'रोबॉट' तयार करणे ही जपानची नेहमीच खासियत राहिलेली आहे. 'रोबोटिक्स'च्या तंत्रज्ञानात नवनवे संशोधन करण्याच्या दिशेने जपानने कंबर कसलेली आहे. उत्पादन केंद्रांवर 'रोबॉट'चा वापर आता जगभरात सगळीकडे सुरू झालेला आहे. परंतु, Deep Learning Technology च्या माध्यमातून या 'रोबॉट'ची क्षमता एका वेगळ्याच पातळीवर घेऊन जाण्याचा जपानचा विचार आहे. कामाचा वेग, गुणवत्ता आणि परिणामकारकता या तिन्ही बाबींचा विचार करता सध्याच्या उत्पादननिर्मिती क्षमतेत काही पटींनी वाढ करता येणे शक्य होईल, असा विश्वास संशोधनकर्त्यांना आहे.

'डिजिटल फार्मिंग' (अंकीय शेती) :

जगभरातील कृषीक्षेत्रात सातत्याने स्थित्यंतरे होत आहेत आणि शेतीच्या पुढ्यातील आव्हानेही वाढत चाललेली आहेत. त्यामुळे कृषी तंत्रांमध्ये बदल करून नव्या पद्धतीने शेती करण्यासाठी जगभरात प्रयोग सुरू आहेत. त्यातीलच एक भाग म्हणजे 'डिजिटल फार्मिंग'. २०३० सालापर्यंत पाण्याची जगभरात सर्वत्रच एकंदरीने भीषण टंचाई निर्माण होईल असा अभ्यासकांचा अंदाज आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पाण्याचा आणि कीटकनाशकांचा वापर अतिशय जबाबदारीने आणि योग्य रीतीनेच करावा लागणार आहे. IOT आणि AI या दोन तंत्रांच्या मदतीने 'डिजिटल फार्मिंग'च्या नव्या पद्धती आता जगभरात विकसित केल्या जात आहेत. या क्षेत्रात पुढील काळामध्ये भरीव संशोधन करण्याचे उद्दिष्ट जपानने ठेवले आहे. ज्या भागांमध्ये

पाण्याची उपलब्धता कमी आहे किंवा खूपच टंचाई आहे अशा भागांतदेखील प्रभावी शेती करण्यासाठी शेतकयांसाठी हा नवीन उपाय महत्त्वाचा ठरू शकतो. भविष्यातील शास्वत शेतीच्या दृष्टिकोनातून 'डिजिटल फार्मिंग' हा अत्यंत प्रभावी मार्ग ठरणार आहे, असा विश्वास संशोधकांना असल्याने जपानने त्या क्षेत्रात कंबर कसून संशोधन करण्यास सुरुवात केलेली आहे.

अवकाशातील नव्या संधींचा शोध :

अवकाशात उपग्रह पाठवून त्याद्वारे माहितीचे संकलन व आदानप्रदान करण्याचे प्रमाण वाढते आहे. त्या दृष्टीने अवकाशातील नव्या संधींचा शोध घेण्यासाठी जगभरातील देश आणि अवकाशसंशोधन संस्थांनी प्रयत्न सुरू केलेले आहेत. जपानने या विषयात खूप महत्त्वपूर्ण संशोधन सुरू केले आहे. माहितीचे संकलन आणि माहितीचे आदानप्रदान करण्यात सध्या ज्या अडचणी येत आहेत त्यावर मात करण्याच्या दिशेने संशोधक कार्यरत आहेत. त्यातून अनेक नवनव्या संधी निर्माण होणार आहेत आणि त्यातून नवनव्या क्षेत्रांचा विकास होऊ शकणार आहे. जगभरातील विविध ग्रहणकेंद्रांशी उपग्रहांना जोडून त्या माध्यमातून अधिक मोठ्या प्रमाणावर सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. त्यासाठी जपानमधील संशोधकांनी पुढाकार घेतलेला आहे.

उद्योगक्षेत्रात 'रोबॉट'चा वापर वाढवण्याच्या बरोबरीनेच व्यक्तिगत पातळीवरसुद्धा माणसांचे आयुष्य सुलभ व्हावे म्हणून येणाऱ्या काळामध्ये 'रोबोटिक्स' तंत्रज्ञान फार महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. त्यामुळे या क्षेत्रात भरीव संशोधनाची गरज आहे. जपानने या क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित केले असून त्यात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवनवीन 'रोबॉट' विकसित करण्यावर भर दिला जातो आहे. जपान सरकारने त्यासाठी विशेष आर्थिक गुंतवणूकही केलेली आहे आणि 'रोबॉटिक्स' तंत्रज्ञानाचा वापर करू न त्यात होत असलेल्या संशोधनांना प्रोत्साहन देण्याचे धोरणही अंगिकारलेले आहे. अलीकडेच जपानमधील एका कंपनीने छोट्या अंतरावर जाण्यासाठी सोयीची ठरतील अशी स्वयंचलित 'रोबॉटिक' वाहने विकसित केलेली आहेत. त्याद्वारे जवळच्या जवळ जाण्यासाठी ही वाहने खूप सोयीची ठरू शकतात. ती किफायतशीर किंमतीत उपलब्ध होऊन खासगी कंपन्या, मोठे 'मॉल्स', फिरण्याच्या जागा या ठिकाणी त्यांचा वापर कशा रीतीने वाढवता येईल या दिशेने संशोधन केले जाते आहे. शारीरिक अपंगत्व आलेल्या व्यक्ती आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी अशा प्रकारची सुविधा उपयुक्त ठरणार आहे. या आणि अशा प्रकारच्या

अनेकानेक सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने 'रोबॉटिक्स' तंत्रज्ञान भविष्यात मोलाची भूमिका बजावणार आहे. 'सोसायटी ५.०' मध्ये प्रवेश करताना हे आणि असे तंत्रज्ञानच सर्वाधिक मोलाचे ठरणार आहे, हे लक्षात घेऊन संशोधनाची दिशा ठरवली जाते आहे. येणाऱ्या काळात लोकांनी कल्पनाही केलेली नसेल असे संशोधन या क्षेत्रात पुढे येणार आहे त्याद्वारे मानवी जीवन एका वेगळ्या टप्प्यावर पोहोचलेले असेल, असा अंदाज अभ्यासक व्यक्त करीत आहेत. जपानमधील लोकसंख्या वेगाने कमी होत असल्याने या देशाच्या पुढ्यात अनेक समस्या आहेत. परंतु त्या समस्यांना धाडसाने तोंड द्यायचे तर तंत्रज्ञानच मदतीला येऊ शकेल हा विश्वास असल्याने संशोधकांनी अपूर्व असे तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांत विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू केलेले आहेत. अवघे जगच आता 'डिजिटल' पर्वातून वाटचाल करीत असताना स्थित्यंतराच्या या उंबरठ्यावर जपानचे सुरू असलेले प्रयत्न दुर्लक्षून चालणार नाहीत.

पुरवणी

कवडसे, प्रा. वि. म. दांडेकर
यांच्या विचारविश्वाचे.

पुरवणी

महाराष्ट्रातील औद्योगिक विकेंद्रीकरण

भारतातील औद्योगिक प्रगतीचा विचार करता महाराष्ट्र राज्य हे एक अग्रेसर राज्य आहे. मात्र महाराष्ट्रातील औद्योगिक विकास बहुतांशी मुंबई शहर व त्याचे अवतीभवतीच झाल्याने महाराष्ट्रातून मुंबई शहर व त्याचा परिसर वगळला तर उर्वरित महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या अविकसित राज्यांच्या ओळीतच बसतो. उद्योगधंद्यांचे भौगोलिक केंद्रीकरण केवळ महाराष्ट्रातच आहे असे नाही. भारतात सर्वत्रच आहे. परंतु आज अनेक वर्षे विकसित होत राहिलेल्या मुंबईसारख्या एका मोठ्या औद्योगिक शहराचे अस्तित्व आणि नव्या उद्योगधंद्यांना आकृष्ट करण्याची या शहराची शक्ती या कारणांनी महाराष्ट्रातील औद्योगिक केंद्रीकरण अधिकच तीव्रतेने झाले आहे. उदाहरणार्थ, १९६२ साली महाराष्ट्रात औद्योगिक कामगारांची संख्या सुमारे आठ लक्ष होती. त्यांपैकी सुमारे पाच लक्ष साठ हजार म्हणजे सत्तर टक्के कामगार बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील मुंबईलगतच्या भागात होते. महाराष्ट्रातील उद्योगधंद्यांचे मुंबई व परिसरात होणाऱ्या अशा केंद्रीकरणामुळे एका बाजूने उर्वरित महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या अविकसित राहतो आणि दुसऱ्या बाजूने मुंबई शहराच्या नागरी समस्या अधिक अवघड होतात. म्हणून एका बाजूने मुंबई शहर व परिसरांतील उद्योगधंद्यांची वाढ निर्बंधित करावी व दुसऱ्या बाजूने महाराष्ट्रातील अविकसित भागात जाण्याकरता उद्योगधंद्यांना प्रोत्साहन द्यावे असे दुहेरी धोरण हळूहळू उदयास आले. हे धोरण व त्याची फलनिष्पत्ति यांचा सविस्तर आढावा महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या अहवालात उपलब्ध आहे. तो सारांशाने सांगून त्यातून उद्भवणारे काही विचार आजच्या निमित्याने आपणांसमोर मांडणार आहे.

बृहन्मुंबईविषयक बर्वे अभ्यासगटाने सन १९५८ साली या प्रदेशात नव्याने येऊ पाहणाऱ्या उद्योगधंद्यावर कडक निर्बंध घालावेत अशी शिफारस केली होती. मुंबई–पुणे या महानगर क्षेत्रासाठी १९६५ साली नेमलेली गाडगीळ समिति आणि मुंबई

महानगर प्रादेशिक नियोजन मंडळ (१९६७) यांनीही मुंबई व परिसरातील औद्योगिक वाढीवर कडक निर्बंध घालावेत असे आग्रहाने सांगितले होते. बृहन्मुंबई क्षेत्रातील उद्योगधंद्यांच्या वाढीवर बरेच निर्बंध घालणारे धोरण शासनाने १९६५ साली जाहीर केले. परंतु १९६८ साली ते बरेच शिथिल करण्यात आले. १९७४ साली महाराष्ट्र शासन आणि शहर व औद्योगिक विकास मंडळ (सिडको) यांनी महाराष्ट्रात उद्योगधंदे कोठे काढावेत, कोठे काढू नयेत याविषयी अभ्यास करून अहवाल देण्याचे काम टाटा कन्सल्टिंग सर्व्हिसेस यांना दिले. त्यांनी ज्या अनेक शिफारसी केल्या त्यामध्ये बृहन्मुंबईत १९६९ साली औद्योगिक कामगारांची जी संख्या होती तीत वाढ होऊ देऊ नये, म्हणजेच असलेल्या उद्योगधंद्यांचा विस्तार वा नव्या उद्योगधंद्यांची उभारणी करण्यास पूर्ण बंदी करावी, फक्त ठाण्याच्या परिसरातील रासायनिक उद्योगधंद्यांतील कामगारांची संख्या फार तर आणखी दोन हजारांनी वाढू द्यावी अशी शिफारस केली होती. तेव्हापासून मुंबई महानगर प्रदेशात अस्तित्वात असलेल्या उद्योगधंद्यांचा विस्तार आणि नव्या उद्योगधंद्यांची उभारणी याबाबत एक सर्वांगीण निर्बंधनात्मक धोरण शासनाने जारी ठेवले आहे.

राज्याचा, विशेषत: राज्यातील विकसनशील व मागास भागांचा औद्योगिक विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने, दरम्यानच्या काळात, राज्य शासनाने दोन प्रमुख संस्थांची निर्मिती केली. १९६२ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्थापन करण्यात आले. राज्यामध्ये वेगाने पण सुव्यवस्थितरीत्या उद्योगधंद्यांची स्थापना व वाढ व्हावी याकरिता सर्व प्रकारे सहाय्य करणे हे या महामंडळाचे उद्दिष्ट आहे.

राज्याच्या वेगवेगळ्या भागांमध्ये हे महामंडळ औद्योगिक क्षेत्र विकसित करते. आणि उद्योगधंदे काढण्यासाठी रस्ते, पाणी, वीज व इतर मूलभूत सोयींसह जागा व छप्पर (शेड) उपलब्ध करून देते.

महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ (सीकॉम) ही दुसरी प्रमुख संस्था होय. राज्याच्या अविकसित प्रदेशांचा औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी खास करून या संस्थेची स्थापना १९६६ साली करण्यात आली. सिकॉमने अविकसित प्रदेशावरच आपली शक्ती पूर्णपणे केंद्रित करावी या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश व पुणे महानगर प्रदेश हे दोन प्रदेश सिकॉमच्या कार्यकक्षेमधून वगळले आहेत. अविकसित भागांमध्ये उद्योगधंदे उभारणाऱ्या उद्योजकांना विविध सोयी व सवलती सिकॉमतर्फे दिल्या जातात. प्रकल्पाची आखणी, प्रकल्पास प्रोत्साहन व साहाय्य, भांडवल गुंतवणुकीबाबत मार्गदर्शन, उद्योग उभारणी सेवा, कर्जाच्या स्वरूपात वित्तसाहाय्य,

भांडवल उभारणी आणि गुंतवणुकीला हमी देण्याची सोय, भागभांडवली सहभाग, व्यापारी बँकिंग आणि औद्योगिक मार्गदर्शक सेवा अशा विविध प्रकारे सिकॉम उद्योजकांना उद्योगांच्या उभारणीत मदत करते. १९६४ साली राज्य शासनाने उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण व्हावे म्हणून प्रोत्साहन देणारी एक 'उत्तेजनाची सामूहिक योजना' लागू केली. एप्रिल १९६९ पासून या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी सिकॉमकडे दिली आहे. केंद्रीय सरकारच्या योजनेनुसार मिळावयाचे भांडवली अर्थसाहाय्यही सीकॉममार्फतच दिले जाते.

महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळाची स्थापना १९६२ मध्ये झाली. ही या क्षेत्रातील तिसरी महत्त्वाची संस्था होय. नोंदणीकृत लघुउद्योगांना लागणारा कच्चा माल संपादित करणे व त्याचे वाटप करणे हे या संस्थेचे मुख्य काम आहे. उत्पादित मालाची विक्री, हप्तेबंदीने यंत्र-सामग्रीची विक्री, मालाची साठवणूक करण्यासाठी गोदामाच्या सोयी इत्यादी कामेही हे महामंडळ करते.

याखेरीज मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या चार प्रदेशांसाठी चार प्रादेशिक विकास महामंडळे स्थापन केली आहेत. पहिले प्रादेशिक विकास महामंडळ मराठवाड्यासाठी १९६७ मध्ये स्थापन झाले. इतर तीन महामंडळे १९७०-७१ मध्ये स्थापन झाली. त्या त्या प्रदेशाच्या सर्वांगीण विकासाकडे महामंडळांनी लक्ष द्यावे अशी कल्पना आहे. राज्यपातळीवरील वेगवेगळ्या संबंधित महामंडळाच्या व शासकीय यंत्रणाच्या कामाचे एकसूत्रीकरण करून प्रादेशिक विकासाच्या प्रक्रियेला अधिक गतिमान करण्यासाठी सर्व प्रकारे चालना देणे हे या महामंडळांचे उद्दिष्ट आहे. त्यात मुख्यत: औद्योगिक विकासावर भर आहे.

व्यापारी बँकांकडून सामान्यत: जे खेळते भांडवल मिळते त्याव्यतिरिक्त उद्योगधंद्यांना दीर्घ मुदतीची भांडवली कर्जे लागतात. इंडस्ट्रियल क्रेडिट ॲण्ड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (आय. सी. आय. सी. आय.) आणि भारतीय औद्योगिक वित्तीय महामंडळ ह्या क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवर शिरस्थ वित्त संस्था आहेत. इमारती, साधनसामग्री इत्यादी स्थावर मालमत्तेमध्ये दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या नव्याने उभारलेल्या मोठ्या उद्योगधंद्यांनाच मुख्यत: या संस्था सरळ वित्त पुरवठा करतात. सामान्यत: या संस्था अशा प्रकल्पांना भागभांडवलाच्या स्वरूपात वित्तसाहाय्य करतात. अशा वित्त साहाय्यामध्ये पुष्कळदा भारतीय आयुर्विमा महामंडळ, भारतीय सर्वसाधारण विमा महामंडळ आणि युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया याही संस्था सहभागी असतात.

दोन कोटी रुपयांपेक्षा कमी गुंतवणूक असलेल्या उद्योगप्रकल्पांना वित्तपुरवठा सामान्यत: सिकॉम आणि महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ यांसारख्या राज्य पातळीवरील संस्थांकडून होतो. ज्यांची एकूण भांडवली गुंतवणूक ५० लाखांहून अधिक नाही अशा लघु व मध्यम उद्योगांना महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ वित्तपुरवठा करते. ५० लाख ते २ कोटीपर्यंतची भांडवली गुंतवणूक असणारे औद्योगिक प्रकल्प जर अविकसित भागांमध्ये (मुंबई व पुणे महानगर प्रदेशाबाहेर) उभारले जात असतील तर सीकॉममार्फत त्यांना वित्तपुरवठा होतो. राज्य वित्तीय महामंडळ जास्तीतजास्त ३० लाखांपर्यंत कर्ज देऊ शकते.

मोठ्या उद्योगधंद्यांना सरळ वित्तपुरवठा करण्याखेरीज भारतीय औद्योगिक विकास बँक, निर्दिष्ट अशा मागास जिल्ह्यांमधील लघु व मध्यम आकाराच्या उद्योगांना, त्यांचे वसूल झालेले भागभांडवल व राखीव निधी एक कोटी रुपयांहून अधिक नसेल, तर ३० लाख रुपयांपर्यंतच्या दिलेल्या मुदत कर्जाच्या पोटी राज्य वित्तीय महामंडळ व व्यापारी बँका यांना सवलतीच्या अटींवर पुनर्वित्तपुरवठा करते. उद्योगधंद्यांच्या विस्तारानंतरही जर वसूल भागभांडवल व राखीव निधी मिळून रक्कम एक कोटी रुपयांपेक्षा कमीच राहणार असेल आणि विस्तार योजनेखाली स्थिर भांडवलात पडणारी भर ही विस्तारापूर्वीच्या चालू उद्योगाच्या स्थिर भांडवलाच्या २५ टक्क्यांपेक्षा कमी नसेल तर सध्या अस्तित्वात असलेल्या उद्योगधंद्यांनाही त्याच्या विस्तारयोजनेसाठी असा वित्तपुरवठा मिळू शकतो. पुनर्वित्तपुरवठ्याच्या सोयी सीकॉमसारख्या राज्य औद्योगिक विकास महामंडळानाही मिळतात. भारतीय औद्योगिक विकास बँक सीकॉमने दिलेल्या ९० लाख रुपयापर्यंतच्या मुदत कर्जापोटी सीकॉमला पुनर्वित्तपुरवठा करते. म्हणून ज्या उद्योग प्रकल्पांना ९० लाखांपेक्षा अधिक मुदत कर्ज आवश्यक आहे त्यांना वित्तसाहाय्य करण्यात सीकॉम व राज्यवित्तीय महामंडळ भागिदारी करतात आणि काही वेळा मुदत कर्जाचा काही भाग व्यापारी बँकाकरवी देऊ करतात.

तात्पर्य, एका बाजूला मुंबई महानगर प्रदेशामध्ये अधिक औद्योगिक वाढ होऊ नये म्हणून निर्बंध आणि दुसरीकडे मुंबई व पुणे महानगर प्रदेशाबाहेर औद्योगिक विकासाला प्रोत्साहन, असे हे दुहेरी धोरण आहे. या दुहेरी धोरणाची फलनिष्पत्ति आता पाहू. याकरिता दोन प्रकारची आकडेवारी उपलब्ध आहे. ३१ मार्च, १९७४ आणि ३१ मार्च, १९८२ या दोन तारखांना नोंदणीकृत लघुउद्योगांची संख्या ही एक आकडेवारी आणि १९६२, १९७४ व १९८३ मधील औद्योगिक कामगारांची संख्या ही दुसरी आकडेवारी.

प्रथम लघुउद्योगासंबंधी, राज्यामध्ये ३१ मार्च, १९७४ रोजी एकूण सुमारे ३४,००० लघुउद्योग नोंदलेले होते. त्यांच्यापैकी सुमारे ७० टक्के लघुउद्योग बृहन्मुंबईच्या बाहेर होते. १९७४–८२ या काळात, आणखी सुमारे ४७,००० उद्योग नोंदले गेले. त्यांच्यापैकी ८६ टक्के बृहन्मुंबईच्या बाहेर होते.

तात्पर्य, १९७४ पासून बऱ्याच अंशी लघुउद्योग बृहन्मुंबई क्षेत्राच्या बाहेर जाऊ लागले आहेत. दर एक लाख लोकसंख्येच्या प्रमाणात पाहिल्यास, १९७४–८२ या काळात नोंदलेल्या लघुउद्योगाची संख्या कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या चार प्रदेशांवर कमी–अधिक सारख्या प्रमाणात विभागली गेली आहे.

आता औद्योगिक कामगारांसंबंधी. १९६२ मध्ये राज्यातील एकूण औद्योगिक कामगारांपैकी सुमारे ७० टक्के बृहन्मुंबईत होते हे सांगितलेच आहे. १९७४ मध्ये हे प्रमाण ५७ टक्क्यांपर्यंत खाली आले. १९८१ मध्ये ते ५० टक्क्यांपर्यंत उतरले. अशा रीतीने जो नवीन औद्योगिक रोजगार निर्माण झाला त्यापैकी बृहन्मुंबईचा वाटा झपाट्याने कमी झाला. १९६२ मध्ये औद्योगिक कामगारांच्या संख्येत बृहन्मुंबईचा वाटा ७० टक्के होता. १९६२–७४ या काळात जो रोजगार निर्माण झाला त्यामध्ये बृहन्मुंबईचा वाटा फक्त २६ टक्के होता तर १९७४–८१ या काळात निर्माण झालेल्या रोजगारात तो फक्त १० टक्के होता. १९६२–७४ या काळात बृहन्मुंबईचा वाटा कमी होत असताना ठाणे व पुणे जिल्ह्यांचा वाटा झपाट्याने वाढला. या काळात जो नवीन रोजगार उत्पन्न झाला त्यामध्ये पुणे जिल्ह्याचा वाटा ३२ टक्के व ठाणे जिल्ह्याचा वाटा २१ टक्के होता. १९७४–८१ या काळात केवळ बृहन्मुंबईच्या वाट्यातच नव्हे तर ठाणे जिल्ह्याच्या वाट्यातही मोठी घट झाली. पुणे जिल्ह्याचा वाटा थोडासा वाढला आणि उर्वरित पश्चिम महाराष्ट्राचा वाटा वेगाने वाढला. १९७४–८१ च्या दरम्यान जो रोजगार निर्माण झाला त्यामध्ये पुणे जिल्ह्यासह पश्चिम महाराष्ट्राचा वाटा ५३ टक्के होता. या काळात मराठवाडा व विदर्भ या दोन्ही विभागांच्या वाट्यामध्ये वाढ झाली. १९६२–८१ हा संपूर्ण काळ विचारात घेतला तर बृहन्मुंबईचा वाटा १६.२८ टक्के फरकाने घटला. यापैकी, ११.७२ टक्के फरक ठाणे व पुणे जिल्ह्यांमध्ये जवळपास सारख्या प्रमाणात वाटला गेला. उरलेल्यांपैकी २.९७ टक्के फरक उर्वरित कोकण व पश्चिम महाराष्ट्र आणि १.५९ टक्के फरक मराठवाडा असा वाटला गेला. विदर्भात मुळीच फरक झाला नाही. परिणामी, १९६२ ते १९८१ या काळात औद्योगिक कामगारांच्या संख्येतील ठाणे जिल्ह्याचा वाटा ४.९९ टक्क्यावरून १०.८३ टक्के झाला. पुणे जिल्ह्याचा वाटा ४.९५ टक्क्यावरून

१०.८३ टक्के झाला. पुणे-ठाणे सोडून उर्वरित कोकण व पश्चिम महाराष्ट्र यांचा वाटा १३.२२ टक्क्यावरून १६.२० टक्के झाला. मराठवाड्याचा वाटा १.९० टक्क्यावरून ३.४९ टक्के झाला. आणि विदर्भाचा वाटा ८.० टक्के होता तो तसाच राहिला. तात्पर्य, बृहन्मुंबईची औद्योगिक वाढ आणखी होऊ न देण्याचे धोरण काही प्रमाणात परिणामकारक ठरले. औद्योगिक विकेंद्रीकरण व्हावे म्हणून दिलेल्या प्रोत्साहनामुळे औद्योगिक विकास पुणे व ठाणे जिल्ह्यांच्या फार पलिकडे गेला नाही.

हीच आकडेवारी काहीशा दुसऱ्या तऱ्हेने मांडता येईल. १९६२ साली महाराष्ट्रात औद्योगिक कामगारांची संख्या ७,७८,००० होती ती १९८१ मध्ये ११,९२,००० झाली. म्हणजे ५६.२६ टक्क्यांनी वाढली. या वीस वर्षांत बृहन्मुंबईत औद्योगिक कामगारांची संख्या ५,२१,००० वरून ६,०४,००० वर म्हणजे फक्त सुमारे १६ टक्क्यांनी वाढली. उलट, बृहनमुंबई वगळता उर्वरित महाराष्ट्रात औद्योगिक कामगारांची संख्या २,५७,००० वरून ५,८८,००० म्हणजे १२८.७६ टक्क्यांनी वाढली. तात्पर्य, नवीन उद्योगधंदे बृहन्मुंबईत न येऊ देता महाराष्ट्रात इतरत्र नेण्यासंबंधी आखलेले धोरण बऱ्याच अंशी यशस्वी झाले असे म्हणता येईल.

परंतु नवीन उद्योगधंदे, बृहन्मुंबईबाहेर महाराष्ट्रात गेले म्हणजे कोठे गेले असे बघता पाचसहा जिल्हेच ठळकपणे दिसतात. १९६२ ते १९८१ या सुमारे वीस वर्षांत मुंबईव्यतिरिक्त महाराष्ट्रात औद्योगिक कामगारांची संख्या १२८.७६ टक्क्यांनी वाढली हे म्हटलेच आहे. या सरासरीपेक्षा अधिक वाढ झालेले जिल्हे म्हणजे ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद व रायगड होत. यांत सर्वात अधिक वाढ झाली ती औरंगाबाद जिल्ह्यात ३९३ टक्के आणि रायगडमध्ये ३१९ टक्के. परंतु हे दोनही जिल्हे मुळांत औद्योगिक विकासांत मागे असल्याने तेथे १९८१ सालीही दर हजारी लोकसंख्येमागे औद्योगिक कामगारांचे प्रमाण सुमारे केवळ दहा एवढेच होते. बीड व रत्नागिरीबाबत अशीच परिस्थिती आहे. १९६२ ते १९८१ या वीस वर्षांत बीडमध्ये औद्योगिक कामगारांची संख्या चौपटीने वाढली परंतु तरीहि १९८१ साली कामगारांचे दर हजारी लोकसंख्येशी प्रमाण दोनच होते. रत्नागिरीत कामगारांची संख्या अडीचपटीने वाढली. परंतु १९८१ साली त्यांचे दरहजारी प्रमाण केवळ तीनच होते.

या उलट ठाणे व पुणे या दोन जिल्ह्यांत १९६२ ते १९८१ या काळात कामगारांची संख्या सुमारे अडीच पटीने वाढली परंतु मुळातच हे दोनही जिल्हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत असल्याने १९८१ साली कामगारांचे दर हजारी प्रमाण ठाणे जिल्ह्यात ३८.५० तर पुणे जिल्ह्यात ते ३१ एवढे होते. नाशिक व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांत

कामगारांची संख्या सुमारे दुपटीने वाढली आणि १९८१ साली कामगारांचे प्रमाण हजारी सुमारे १२-१३ एवढे होते.

बृहन्मुंबईचे खालोखाल ठाणे व पुणे हे दोन जिल्हे औद्योगिकदृष्ट्या सर्वांत प्रगत आहेत. मुंबईच्या सान्निध्यामुळे मुंबईतील औद्योगिक वाढीवरील निर्बंधाचे लाभ या दोन जिल्ह्यांना मिळाले हे उघड आहे. रायगड जिल्ह्याचा औद्योगिक विकासही याच कारणाने झाला. नाशिक व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांतील औद्योगिक विकासही मुंबईशी असलेले त्यांचे सहज व सुलभ दळणवळण यामुळेच झाला असे म्हणता येईल. औरंगाबाद जिल्ह्यात झालेल्या औद्योगिक विकासालाही औरंगाबाद-मुंबई या विमानसेवेचे साहाय्य झाले असे म्हणता येईल, शिवाय या जिल्ह्याला केंद्रीय साहाय्य फार मोठ्या प्रमाणात मिळाले. १९७४ ते १९८३ या काळात महाराष्ट्रातील औरंगाबाद, रत्नागिरी व चंद्रपूर या तीन जिल्ह्यांना अविकसित जिल्हे म्हणून केंद्रीय अर्थसाहाय्य मिळाले. त्यात एकूण ८.७५ कोटी रुपये मिळाले. पैकी सुमारे ५.८८ कोटी रुपये औरंगाबाद जिल्ह्यात, १.९० कोटी रत्नागिरीत आणि ०.९० कोटी चंद्रपूर जिल्ह्यात आले.

तात्पर्य, महाराष्ट्रातील बृहन्मुंबईबाहेरील औद्योगिक विकास हा प्रामुख्याने मुंबईचे सान्निध्य व मुंबईशी असलेले सहज व सुलभ दळणवळण या कारणानेच झाला. त्याव्यतिरिक्त अधिक दूरवर तो जाऊ शकला नाही हे उघड आहे. प्रस्थापित मोठ्या औद्योगिक केंद्रापासून दूर उद्योगधंद्याचे व्यापक विकिरण साधण्याच्या हेतूने आखलेले प्रोत्साहक अर्थसाहाय्य देण्याचे धोरण अयशस्वी किंवा निष्प्रभ ठरल्याचा अनुभव केवळ महाराष्ट्राचाच नाही. बहुतेक इतर राज्यांचाही अनुभव हाच आहे. मागास विभागांच्या विकासाच्या संदर्भात नेमलेल्या नॅशनल कमिटी ऑन डेव्हलपमेंट ऑफ बॅकवर्ड एरिया या राष्ट्रीय समितीने आपल्या औद्योगिक विकिरणविषयक अहवालात म्हटले आहे की, केंद्रीय भांडवली अर्थसहाय्य आणि सवलतीचा वित्तपुरवठा यांच्याद्वारा उद्योगधंद्यांचे विकेंद्रीकरण आणि त्याचे मागास भागामध्ये विकिरण कितपत परिणामकारकरीत्या घडून आले आहे याविषयी शंका व्यक्त केली जाते, काही प्रमाणात विकिरण घडून आले आहे हे खरे, पण हेही स्पष्ट आहे की, प्रस्थापित औद्योगिक वसाहतीमधील गाळ्यांमध्ये तसेच आजच्याच मोठ्या औद्योगिक नागर केंद्रांच्या अवतीभवती उद्योग उभारण्याचीच उद्योजकांची प्रवृत्ती आहे. (परिच्छेद ७.२).

भारतीय औद्योगिक विकास बँकेने मे १९८० मध्ये औद्योगिक विकास या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. त्यातील चर्चेतून नवीन जागी उद्योग

काढण्याकरता उद्योजकांची गरज काय असते ते स्पष्ट झाले आहे. उद्योग उभारावयाच्या जागेविषयी त्यांच्या पुढील अपेक्षा असतात :

(१) वीज, पाणीपुरवठा, व्यापारी व दळणवळणाच्या इत्यादी मूलभूत सोयी. (२) आधुनिक उद्योगांना अनुकूल मनोवृत्ती व शिस्तीचे औद्योगिक वातावरण. (३) औद्योगिक गैरहजेरी व अनियमितता यांमधून निर्माण होणाऱ्या समस्या सुटण्याच्या दृष्टीने कामाच्या शोधात असणाऱ्या बदली कामगारांची पुरेशी उपलब्धता. (४) कामगार व पर्यवेक्षकीय पातळीवरील कर्मचारी वर्ग यांच्यासाठी वाजवी भाड्यात राहण्याची पुरेशी सोय. (५) तंत्रज्ञ, व्यवस्थापकीय कर्मचारी व अधिकारी नोकरवर्ग यांच्या दृष्टीने आवश्यक शिक्षण, औषधपाणी, मनोरंजन इत्यादी सामाजिक सांस्कृतिक सोयी आणि (६) आधुनिक उद्योगधंद्यांना उच्च वेतनश्रेणीवरील अधिकारीवर्ग अत्यावश्यक असल्याने या वर्गाला लागणाऱ्या विविध सेवा. तात्पर्य, आवश्यक ते औद्योगिक वातावरण व सोयी-सुविधा किमान प्रमाणात तरी जेथे उपलब्ध असतील अशा जागाच उद्योजक निवडतात.

थोडक्यात सांगावयाचे तर खाजगी उद्योजक प्रस्थापित औद्योगिक केंद्रापासून दूरच्या अविकसित भागात जाण्यास सहसा तयार नसतात. त्याकरता त्यांना अधिक प्रोत्साहन साहाय्य द्यावे लागेल. राष्ट्रीय समितीने या गोष्टीकडे लक्ष वेधले आहे. ती म्हणते, ''यासंबंधीच्या प्रचलित धोरणात औद्योगिक केंद्राच्या लगतचे मागास भाग आणि दूरवरचे मागास भाग असा भेद केलेला नाही. त्यामुळे लगतच्या मागास भागाकडेच उद्योगधंदे आकृष्ट होत राहिले. वास्तविक आजच्या प्रस्थापित औद्योगिक केंद्राच्या वाढीची प्रक्रिया इतकी बलवत्तर आहे की या लगतच्या मागास भागांमध्ये उद्योगधंदे सहजगत्याच पसरले असते, म्हणून औद्योगिक विकिरण खरोखरच साधावयाचे असेल तर आजच्या औद्योगिक केंद्रापासून पुरेशा दूर असलेल्या भागामध्ये उद्योग काढण्यास अग्रक्रम देणारे धोरण राबविले जाण्याची जरुरी आहे.'' (परिच्छेद ७.८).

महाराष्ट्र शासनाची प्रोत्साहनाची सामूहिक उत्तेजन योजना मुंबई-पुणे महानगर प्रदेशाबाहेर औद्योगिक विकिरण घडवून आणण्यात विशेष परिणामकारक न ठरण्याचे एक कारण, मुंबई-पुण्याच्या जवळचे औद्योगिकदृष्ट्या मागास भाग आणि दूरचे मागास भाग असा भेद या योजनेमध्ये केलेला नाही. अंतराचा हा मुद्दा सामूहिक उत्तेजन योजनेने हिशेबात घेतला पाहिजे. आणि दूर अंतर्भागातील मागास भागामध्ये उद्योगाच्या दृष्टीने जी प्रतिकूल परिस्थिती असते तिची पुरेशी भरपाई केली पाहिजे. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीने हा मुद्दा लक्षात घेऊन काही उपयुक्त शिफारशी केल्या आहेत.

मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक विकास निर्बंधित व्हावा आणि राज्याच्या इतर भागांत नवे उद्योगधंदे काढले जाण्यास चालना मिळावी हे सध्याच्या औद्योगिक वसतिसंबंधी धोरणाचे उद्दिष्ट आहे. त्याबरोबरच मुंबई महानगर प्रदेशात आज असलेले काही उद्योग इतरत्र हलविता येण्याच्या शक्यतेचा विचार करावयास हवा. त्याकरता आवश्यक ते प्रोत्साहन दिले पाहिजे. उदाहरणार्थ, मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक स्थावर मत्ता जर मुंबई महानगर प्रदेशाबाहेर हलविली तर नव्या भांडवल गुंतवणुकीवर आयकरातून दिल्या जाणाऱ्या सुटीच्या धर्तीवर सुट देणे उपयुक्त ठरेल. तसेच मुंबई महानगर प्रदेशातील एखादा उद्योग जर बाहेर हलविला तर मोकळ्या होणाऱ्या जागेवर कोणत्याही नवीन उद्योगाला परवानगी मिळणार नाही असा निर्बंध कटाक्षाने घालून त्या जागेचा अन्य उपयोग, वा हस्तांतर करण्याचा अनिर्बंध मालकी हक्क आजच्या मालकास दिला तर या जमिनीच्या किंमतीतून उद्योगाच्या स्थलांतराचा संपूर्ण खर्च भागून निघणे शक्य आहे. इतरही काही पर्याय निघू शकतील त्यांचा अगत्याने विचार करून मुंबई महानगर प्रदेशातील शक्य तेवढे अधिक उद्योगधंदे या प्रदेशाबाहेर हलविण्याकरता उत्तेजन व प्रोत्साहन दिले पाहिजे. कामगार संघटनांनीही या कामी सहकार्य देणे आवश्यक आहे.

मुंबई-पुण्यापासून दूर, मागास भागामध्ये उद्योगधंदे निघावेत म्हणून खाजगी मालकीच्या उद्योगांना अनुरूप प्रोत्साहक अर्थसाहाय्य देऊ करण्याच्या जोडीला, धोरण म्हणून, शासनातर्फे मागास भागामध्ये सार्वजनिक मालकीच्या क्षेत्रातील उद्योगांची स्थापना करण्याचे प्रयत्न शक्य त्या क्षेत्रामध्ये केले गेले आहेत. ही गोष्ट भारत सरकारच्या तसेच राज्य शासनाच्या संदर्भातही खरी आहे. वरकरणी पाहिल्यास भारत सरकारच्या मालकीचे अनेक उद्योग मुंबईत उभे असलेले आढळतात. परंतु हे लक्षात घ्यावयास हवे की, त्यांपैकी बरेच उद्योग मुळात खाजगी क्षेत्रातील होते जे सरकारने नंतर ताब्यात घेतले. इतर काही उद्योग असे आहेत ज्यांचा संबंध मुख्यत: पेट्रोलियमशी वा पेट्रोरासायनिक पदार्थांशी आहे आणि त्यामुळे ते साहजिकच मुंबईत आहेत. हिंदुस्थान ॲंटि-बायोटिक्सची पुण्याजवळ व हिंदुस्थान अेरोनॉटिक्सची नाशिकजवळ, तसेच अलीकडे हिंदुस्थान ऑरगॅनिकची रसायनी व खोपोली येथे हिंदुस्थान मशीन टूल्सची (दुग्धशाळांसाठी यंत्रसामग्रीचे उत्पादन करणारी), औरंगाबादजवळ आणि मॅगॅनीज ओअर ॲण्ड मायनिंग ॲण्ड अलाईड मशिनरी कॉर्पोरेशनची नागपूर येथे स्थापना ही या संदर्भातील सरकारी धोरणाची दिशा दाखविणारी चांगली उदाहरणे आहेत.

महाराष्ट्र राज्यशासनाच्या मालकीचे उद्योगधंदेही राज्याच्या चार प्रदेशांतच नव्हे तर विविध जिल्ह्यांत सामान्यत: चांगले विखुरले आहेत असे म्हणता येईल. रत्नागिरीतील सह्याद्रि कांच कारखाना, खांडसारी कारखाना तसेच उपकरणे तयार करण्याचा प्रकल्प, जळगावमधील प्रताप कापड गिरणी, अजंठा औषध निर्माण कारखाना आणि खताचा कारखाना, अहमदनगरमधील चितळी आसवानी, साताऱ्यातील शीत अन्न कारखाना, परभणीतील कापूस बी संस्करण उद्योग समूह, बीडमधील मराठवाडा चर्मोद्योग महामंडळ, नांदेडमधील छपरी फरशांचा कारखाना, टेक्सकॉम आणि मृत्तिका शिल्प प्रकल्प, अकोल्यातील कीटकनाशकांचा कारखाना, अमरावतीतील विजय गिरणी, तेलगिरणी आणि विद्रावक उतारा करण्याचा कारखाना, वर्ध्यातील पुजगाव कापड गिरणी, खांडसारी कारखाना आणि खतांचा कारखाना, भंडाऱ्यातील खांडसारी कारखाना, चंद्रपूरमधील विदर्भ चर्मसंस्करणी इत्यादि उदाहरणे देता येतील. तथापि, महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक महामंडळाने मुंबईत नव्याने सुरू केलेल्या दृकश्रृतिविभागावरून ही गोष्टही स्पष्ट होते की, या संदर्भात सतत दक्षता बाळगण्याची गरज आहे. मेल्ट्रॉनचा दृकश्राव्य विभाग मुंबई महानगर प्रदेशांतर्गत अंधेरीमध्ये काढला गेला ही गोष्ट औद्योगिक विकिरणाच्या धोरणाच्या विरोधी तर झालीच पण मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक निर्बंधाचाही भंग करणारी आहे.

मागास प्रदेशामध्ये औद्योगिक विकासास चालना देण्याची शासनाची विशेष जबाबदारी आहे हे खरे. परंतु एक गोष्ट ध्यानात घेण्याची गरज आहे की, वाटेल तेथे नवे उद्योगधंदे काढण्यास शासन सर्वस्वी मोकळे नसते. काही पथ्ये शासनासही सांभाळावी लागतात हे समजून घेतले पाहिजे. स्थानिक कच्च्या मालावर आधारित उद्योग त्या कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या आसपासच स्थापन करावे लागतात. आणि पुष्कळदा असा कच्चा माल हा अविकसित भागामध्येच मिळत असतो. या उद्योगाचे निमित्ताने नवी स्वयंपूर्ण शहरे उभी राहू शकतील एवढे मोठे हे उद्योग असतील तर असे उद्योग अगदी अविकसित प्रदेशातही काढता येतात कारण आवश्यक त्या सर्व सुविधा नव्या शहरात निर्माण करता येतात. मात्र पुष्कळ वेळा यासाठी करावा लागलेला खर्च जबर डोईजड ठरलेला आहे हे विसरता कामा नये. आवश्यक त्या सर्व सुविधा स्वत:च्या ऐपतीवर पुरवण्यास समर्थ नाहीत अशा लहान उद्योगांची स्थापना मागास भागात करणे तितके सोपे नाही. असे उद्योग स्थापन करताना खाजगी क्षेत्रातील उद्योगाबाबत जो विचार करावा लागतो तो सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाबाबतही करावा लागतो. मागास भागांच्या विकासाच्या विचारार्थ नेमलेली

राष्ट्रीय समिती म्हणते, पोलाद आणि सिमेंटसारखे मोठे उद्योग अविकसित भागांमध्ये काढण्याचा अनुभव आता जमेस आहे. या कारखान्यांची स्थापना विवक्षित कच्च्या मालाच्या पुरवठ्याच्या जवळच करावी लागली. परंतु त्याकरताही एका सर्वस्वी नव्या जागी आवश्यक त्या सुविधा उभ्या करणे जबर खर्चाचे ठरते हे लक्षात आले. सर्वसाधारण उद्योगही अविकसित भागांमध्ये स्थापन करण्याचा आग्रह धरला तर असे औद्योगिकरण खर्चाच्या दृष्टीने किती डोईजड होईल याची कल्पना करता येण्यासारखी आहे. बहुतेक सर्व आर्थिक क्षेत्रांमध्ये वेगाने विकास साधण्याच्या मार्गात भांडवलाची कमतरता येते हे लक्षात घेऊन एतद्‌विषयक धोरण आखले पाहिजे (रिपोर्ट ऑन इंडस्ट्रियल डिस्पर्सल, परिच्छेद ७.७).

महाराष्ट्रातील बृहन्मुंबईबाहेरील औद्योगिक विकास हा प्रामुख्याने मुंबईचे सान्निध्य व मुंबईशी असलेले सहज व सुलभ दळणवळण या कारणानेच झाला असे म्हटले तरी त्याला अपवाद आहेत ते नमूद करावयास हवेत. कोल्हापूरचा औद्योगिक विकास मुंबईशी असलेल्या सहज व सुलभ दळणवळणामुळे झाला असे म्हटले तर सांगली व साताऱ्याचा तसा विकास का झाला नाही? १९६२ ते १९८१ या सुमारे वीस वर्षात कोल्हापुरात कामगारांची संख्या १९० टक्क्यांनी वाढली परंतु सांगलीत मात्र ती फक्त ११४ टक्क्यांनी आणि साताऱ्यांत तर फक्त ६५ टक्क्यांनीच वाढली. १९८१ साली कोल्हापुरात औद्योगिक कामगारांचे प्रमाण हजारी ११.७५ होते, सांगलीत मात्र ते फक्त ६.५, साताऱ्यात तर फक्त ५.२५ होते. ते कां? कोल्हापूरचे मुंबईशी सहज दळणवळण आहे. पण सांगली व साताऱ्याचे काय कमी आहे? मराठवाड्यातील औरंगाबाद-जालना जिल्हे सोडले तर बीड, परभणी, नांदेड आणि उस्मानाबाद, लातूर या जिल्ह्यांना मुंबईशी सुलभ विशेषेकरून लोहमार्गाने दळणवळण नाही म्हणून त्यांचा औद्योगिक विकास झाला नाही असे म्हणता येईल, परंतु नागपूर व सोलापूरचे काय? हे दोनही जिल्हे आजही तुलनेने औद्योगिकदृष्ट्या प्रगतच मानावे लागतील. १९८१ साली औद्योगिक कामगारांचे दर हजारी प्रमाण औरंगाबाद जिल्ह्यांत १०.२५ होते तर सोलापुरात ते ११.२३ व नागपुरात १५.३१ होते. परंतु १९६२ ते १९८१ या काळात कामगारांची संख्या औरंगाबाद जिल्ह्यात चौपटीने वाढली पण नागपुरात मात्र ती केवळ ५० टक्क्यांनी आणि सोलापुरात तर फक्त दोन टक्क्यांनीच वाढली. असे का? मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाकरता तो मुंबईस लोहमार्गाने जोडणे आवश्यक आहे हे खरे. परंतु मुंबई-कलकत्ता या जुन्या लोहमार्गाने काय साधले? नाशिक सोडता खानदेश आणि संपूर्ण नागविदर्भ यांचा औद्योगिक विकास का झाला नाही?

या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत. परंतु एक गोष्ट स्पष्ट आहे की, मुंबईचे सान्निध्य आणि मुंबईशी सहज, सुलभ विशेषत: लोहमार्गाने दळणवळण औद्योगिक विकासास उपयुक्त किंवा आवश्यक असले तरी तेवढ्याने भागत नाही. लोहमार्ग हे विकासाचे केवळ एक अंग आहे. विकासाची इतर अनेक व विविध अंगे आहेत. रस्ते, पाणी व वीजपुरवठा, सामान्य व तांत्रिक शिक्षण, आरोग्य सेवा अशी विकासाची अनेक अंगे आहेत. या बहुविध अंगांचा विकास औद्योगिक विकासास आवश्यक असतो. कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक विकासाची सुरुवात सहसा औद्योगिक विकासाने होत नाही तर इतर बहुविध अंगाचा विकास होईल तशी औद्योगिक विकासास चालना मिळते. महाराष्ट्रातील जे जिल्हे औद्येगिक विकासाबाबत फार मागे आहेत ते बहुधा विकासाच्या इतर अंगांबाबतही मागे आहेत. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या अहवालावरून हे स्पष्ट होते.

सत्यशोधन समितीने विकासाच्या विविध सुमारे पंचवीस-तीस अंगांचा जिल्हानिहाय शोध घेतला आहे. प्रत्येक विषय वेगवेगळा घेऊन त्याबाबत जो जिल्हा राज्याच्या सरासरी विकासाच्या मागे असेल त्याला राज्यसरासरीला आणण्याकरता जो खर्च करावा लागेल तो त्या विषयाबाबत त्या जिल्ह्याचा अनुशेष मानला आहे. अशा रीतीने प्रत्येक जिल्ह्याचा प्रत्येक विषयाबाबतचा अनुशेष मानला आहे. अशा रीतीने प्रत्येक जिल्ह्याचा प्रत्येक विषयाबाबतचा अनुशेष काढला आहे. रत्नागिरी, धुळे, पुणे, सोलापूर, बीड, उस्मानाबाद, अकोला, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर हे जिल्हे समितीने संशोधन केलेल्या प्रत्येक विषयाबाबतच राज्यसरासरीच्या कमी-अधिक मागे आहेत. कोणत्याच विषयात राज्यसरासरीच्या मागे नाही असा कोणताच जिल्हा नाही. म्हणून समितीने प्रत्येक जिल्ह्याचा प्रत्येक विषयाबाबत जो असेल तो अनुशेष काढून तो एकत्रित केला आणि तो त्या जिल्ह्याचा एकूण विकासाबाबतचा अनुशेष मानला आहे. सर्व जिल्ह्यांच्या अशा एकूण अनुशेषांची बेरीज केली तर ती सुमारे तीन हजार कोटी रुपये होते. त्याचा अर्थ असा की, समितीने संशोधन केलेल्या विषयाबाबत जे जिल्हे १९८२ साली राज्य सरासरीच्या मागे होते त्यांना त्या वेळच्या राज्यसरासरीबरोबर आणावयाचे तर सुमारे तीन हजार कोटी रुपये जातील. हे अर्थातच १९८२ च्या किंमतीनुसार.

समितीने आपल्या अहवालात एका स्वतंत्र प्रकरणात औद्योगिक विकासाचा सविस्तर ऊहापोह केला आहे. निरनिराळ्या जिल्ह्यांच्या औद्योगिक विकासाचे एक गमक म्हणून दर हजारी लोकसंख्येमागे औद्योगिक कामगारांचे प्रमाणही दिले आहे.

परंतु इतर अनेक विषयांबाबत असा जिल्हावार अनुशेष काढला आहे तसा तो औद्योगिक विकासाबाबत काढला नाही. उदाहरणार्थ, बृहन्मुंबई वगळता महाराष्ट्रात १९८१ साली औद्योगिक कामगारांचे प्रमाण दर हजारी १०.७९ होते. उस्मानाबाद जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे फक्त १.१२ एवढेच होते. औद्योगिक विकासात उस्मानाबाद जिल्हा राज्य सरासरीला आणावयाचा तर तेथे कामगारांची संख्या दर हजार लोकसंख्येमागे ९.६७ ने वाढविली पाहिजे. उस्मानाबादची १९८१ ची लोकसंख्या २२,३१,००० होती म्हणजे औद्योगिक विकासाबाबत त्यास राज्य सरासरीला आणावयाचे तर त्या जिल्ह्यात १९८१ साली जे फक्त २,४८८ औद्योगिक कामगार होते त्यांत नव्याने २१,५७४ कामगारांची भर झाली पाहिजे. एका औद्योगिक कामगाराकरता सरासरी एक लक्ष रुपये औद्योगिक भांडवल लागते. या हिशेबाने औद्योगिक विकासाबाबत उस्मानाबाद जिल्हा राज्य सरासरीला आणावयाचा तर २१५.७४ कोटी रुपयांचे औद्योगिक भांडवल लागेल. हा या जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाबाबतचा अनुशेष मानता येईल.

औद्योगिक विकासाबाबत प्रत्यके जिल्ह्याचा असा अनुशेष काढता येईल. दर हजारी लोकसंख्येमागे औद्योगिक कामगारांचे प्रमाण हा गमक मानला तर ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर व सोलापूर हे सहाच जिल्हे राज्य सरासरीच्या वर आहेत. १९८१ सालच्या पंचवीस जिल्ह्यांपैकी बाकीचे १९ जिल्हे राज्य सरासरीच्या खालीच आहेत. त्या सर्वांचा औद्योगिक विकासाबाबतचा अनुशेष काढला तर त्यांची बेरीज सुमारे दोन हजार कोटी रुपये होईल. महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीने असा अनुशेष काढला नाही याचे कारण असे दिसते की, औद्योगिक विकासाकरता लागणारे औद्योगिक भांडवल बहुतांशी खाजगी उद्योजकांचे असते. हे भांडवल अविकसित भागात आणावयाचे तर प्रथम या भागात औद्योगिक विकासास आवश्यक रस्ते, पाणी व वीजपुरवठा, सामान्य व तांत्रिक शिक्षण, आरोग्यसेवा इत्यादि सुविधा निर्माण झाल्या पाहिजेत. या बाबींचा विकास पूर्णपणे शासनाच्या अखत्यारीत आहे, म्हणूनच सत्यशोधन समितीने या बाबींवर लक्ष केंद्रित करून त्याबाबतचा जिल्हानिहाय अनुशेष काढला आहे.

या बाबींवरील सर्व जिल्ह्यांचा एकूण अनुशेष सुमारे तीन हजार कोटी रुपये आहे हे सांगितलेच आहे. बृहन् मुंबई वगळून महाराष्ट्राची १९८१ सालची लोकसंख्या सुमारे साडेपाच कोटी आहे म्हणजे दरडोई सरासरी अनुशेष सुमारे ५८० रुपये निघतो. १९८१ साली असलेल्या पंचवीस जिल्ह्यांपैकी अकरा जिल्ह्यांत हा अनुशेष

राज्य सरासरीपेक्षा जास्त आहे. त्यात कोकणातील रत्नागिरी, पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर, मराठवाड्यातील परभणी, बीड व उस्मानाबाद आणि विदर्भातील नागपूर व भंडारा सोडून इतर सहा जिल्ह्यांचा समावेश आहे. सोलापूर सोडून या सर्व जिल्ह्यांत दर हजारी औद्योगिक कामगारांचे प्रमाण ६ पेक्षा कमी आहे. राज्याची ही सरासरी १०.७९ आहे हे सांगितले आहेच. म्हणजेच हे सर्व जिल्हे औद्योगिक विकासाबाबत राज्य सरासरीच्या बरेच खाली आहेत. इतर अनेक बाबींतील अविकसितपणा हेच त्यांच्या औद्योगिक अविकासाचे कारण मानावे लागेल. सोलापुरात औद्योगिक कामगारांचे प्रमाण दर हजारी ११.३३ म्हरजे राज्यसरासरीपेक्षा थोडेसे अधिक असले तरी गेल्या वीस वर्षांत सोलापुरातील औद्योगिक कामगारांची संख्या फक्त दोन-अडीच टक्क्यांनीच वाढली हे सांगितलेच आहे. तात्पर्य, एकेकाळी औद्योगिकदृष्ट्या प्रगत असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील औद्योगिक प्रगती गेल्या वीस वर्षात खुंटलेलीच आहे. इतर अनेक बाबींतील अविकसितपणा हेच या खुंटित औद्योगिक प्रगतीचे कारण म्हणावे लागेल. तात्पर्य, औद्योगिक विकासाकरता इतर अनेक बाबींतील विकास प्राथमिक आहे. त्याकडे अगत्याने लक्ष दिले पाहिजे.

रस्ते, पाणी व वीजपुरवठा, शिक्षण व आरोग्य सेवा इत्यादींबाबतचा दरडोई अनुशेष राज्यसरासरीपेक्षा जास्त नसूनही औद्योगिक विकासाबाबत राज्यसरासरीपेक्षा बरेच खाली असलेले चार जिल्हे आहेत. ते म्हणजे सातारा, नांदेड, धुळे आणि भंडारा. यांपैकी साताऱ्याचा दरडोई अनुशेष २९० रुपये आणि भंडाऱ्याचा ३२० रुपये आहे. म्हणजे राज्यसरासरी ५८० रुपयाच्या मानाने पुष्कळच कमी आहे. नांदेड व धुळ्याचा अनुशेष राज्यसरासरीपेक्षा कमी परंतु फार कमी नाही. नांदेडचा ४६० रुपये आणि धुळ्याचा ४८० रुपये आहे. परंतु हे चारही जिल्हे औद्योगिक विकासात मागे राहण्याचे दुसरे एक कारण संभवते. हे चारही जिल्हे किंवा ही चार शहरे दुसऱ्या चार औद्योगिक केन्द्रांपासून, जी स्वत: फार मोठी नाहीत अशा केन्द्रापासून जवळ आहेत. सातारा कोल्हापूरपासून जवळ आहे. नांदेड औरंगाबादपासून जवळ आहे. धुळे नाशिकपासून जवळ आहे आणि भंडारा नागपूरपासून जवळ आहे. महाराष्ट्रात ठाणे आणि पुण्याच्या खालोखाल नागपूर, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर व औरंगाबाद हीच औद्योगिक केन्द्रे आहेत. पैकी सोलापूरचा विकास खुंटित असल्याचे म्हटलेच आहे. नागपूरचाही विकास मंदगतीचा आहे. नाशिक, कोल्हापूर आणि औरंगाबाद ही औद्योगिक केंद्रे वर्धिष्णू असली तरी ती अजून एवढी मोठी झाली नाहीत की, त्यांच्या सान्निध्याचा लाभ नजीकच्या केन्द्रांना मिळावा. ही केन्द्रे पुरेशी मोठी होईपर्यंत आसपासच्या औद्योगिक केंद्रांचा विकास होणे अवघड आहे.

नव्या उद्योगाकरता जागा निवडताना उद्योजकांच्या काही किमान गरजा असतात. एखादे नवे औद्योगिक केन्द्र वृद्धिंगत होते ते याच कारणाने की ते या किमान गरजा भागवू शकते. ते जसे वाढेल तसे ते उद्योजकांना अधिक सोईचे वाटू लागते. ते सोडून उद्योजक सहसा नजीकच्या दुसऱ्या केंद्रात जात नाही. ते पुरेसे मोठे झाले म्हणजे त्याचे सान्निध्यही उपयोगी वाटू लागते आणि नजीकच्या केंद्रात इतर सुविधा असल्या तर उद्योजक नव्या केंद्रात जाऊ लागतात. मग यथावकाश ते नवे केंद्र वृद्धिंगत होते. औद्योगिक विकिरणाची ही प्रक्रिया आहे. ती लक्षात न घेता, प्रत्येक डोंगरावर महादेवाचे किंवा मारुतीचे देऊळ बांधावे तसे प्रत्येक तालुक्यात एक कारखाना काढू पहाणे अव्यवहार्य ठरेल. उद्योगांचे विकिरण झाले पाहिजे. पण ते टप्प्याटप्प्यानेच होते. विकिरणाची ही प्रक्रिया नीट समजावून घेऊन तिला पूरक असे शासकीय धोरण असावयास हवे. नाहीतर पुष्ळसे प्रयत्न व खर्च निष्फळ ठरण्याचा संभव आहे.

■■

(प्रा. वा. गो. काळे व्याख्यानमाला, १९८६, बहिःशाल शिक्षण मंडळ, पुणे विद्यापीठ, पुणे-७. १९८६)

पुरवणी

भारतीय अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे एक वर्ष पूर्ण होऊन आज तिचे दुसरे वार्षिक अधिवेशन भरत आहे. म्हणजे परिषद प्रस्थापित झाली हे निश्चित. परिषदेचे त्रैमासिक 'अर्थसंवाद' नियमित निघत आहे हीही मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. परिषदेच्या स्थापनेत आपणा अनेकांचा सहभाग आहे. मनात असूनही त्यात माझा व्यक्तिगत भाग फारच थोडा आहे हे मला प्रांजलपणे कबूल केले पाहिजे. परिषदेच्या पहिल्या अधिवेशनासही मी उपस्थित राहू शकलो नाही. असे असूनही, माझ्या अनुपस्थितीत परिषदेच्या या दुसऱ्या अधिवेशनाचा अध्यक्ष म्हणून माझी निवड करून आपण माझा जो बहुमान केलात त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी, नव्हे ऋणी आहे. परिषदेच्या कार्याला माझा थोडातरी हातभार लागावा या आशेने मी हे अध्यक्षपद नम्रतापूर्वक स्वीकारले आहे.

सहाव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा नुकताच प्रसिद्ध झाला आहे त्यासंबंधी चार शब्द मी बोलावेत अशी आपली अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. चालू वर्ष म्हणजे सन १९७७-७८ हे सहाव्या पंचवार्षिक योजनेचे पहिले वर्ष आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे हे एकतिसावे वर्ष आहे. नियोजित आर्थिक विकासाचे हे अठ्ठाविसावे वर्ष आहे. साहजिकच नव्या योजनेचा आराखडा मांडण्यापूर्वी योजनाकारांनी गेल्या तीस वर्षांतील आर्थिक प्रगतीचा, आर्थिक विकासातील यशापयशाचा आढावा घेतला आहे. हा आढावा अगदी त्रोटकच असला तरी मर्मग्राही आहे.

योजनाकार म्हणतात : गेल्या तीस वर्षांत झालेली आर्थिक प्रगती अनेक दृष्टींनी अभिमानास्पद आहे. एक अवगुंठित आणि परावलंबी असलेली अर्थव्यवस्था आज आधुनिक आणि बहुतांशी स्वावलंबी झाली आहे. लोकसंख्या अधिकाधिक वेगाने वाढत असूनही दरडोई राष्ट्रीय उत्पादन अल्प प्रमाणात का होईना परंतु सतत वाढत राहिले आहे. बागायती क्षेत्र दुप्पट झाले आहे. गव्हाच्या उत्पादनात वैज्ञानिक क्रांती झाली असून अन्नधान्याची सुबत्ता झाली आहे. औद्योगिक उत्पादन वाढले असून ते

अनेक विविध क्षेत्रांत विस्तारले आहे. जीवनोपयोगी वस्तूंच्या उत्पादनात, तसेच पोलाद, सिमेंट इत्यादी मौलिक वस्तूंच्या उत्पादनात देश आज स्वयंपूर्ण आहे. रासायनिक खतांचे उत्पादन झपाट्याने वाढत आहे. यंत्रसामग्रीच्या उत्पादनातील प्रगती तर अधिकच नेत्रदीपक आहे. कापड, अन्नप्रक्रिया, सिमेंट, रासायनिक, धातुसंबंधित, अभियांत्रिक, ऊर्जा, वाहनव्यवहार इत्यादी नानाविध औद्योगिक क्षेत्रांत लागणाऱ्या यंत्रसामग्रीबाबत देश आज जवळजवळ स्वयंपूर्ण झाला आहे. कोळशाच्या बहुतेक खाणींचे आधुनिकीकरण झाले असून कोळशाचे उत्पादन तिपटीपेक्षा अधिक झाले आहे. इंधनतेल व इंधनवायू यांच्या शोधाला यश येऊन तेलाच्या खाणी सापडल्या आहेत. तेलशुद्धीच्या गिरण्या, तेलवाहतुकीकरिता नळ, तसेच तेलाची साठवणूक व वितरण यांकरिता आवश्यक ती देशव्यापी यंत्रणा निर्माण झाली असून पेट्रोलियमआधारित रासायनिक उद्योगयुगात देश प्रवेश करीत आहे.

आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताची निर्यात झपाट्याने वाढली असून आयातीवरील अवलंबन कमी झाले आहे. शिवाय अनेक भारतीय यंत्रज्ञ, तंत्रज्ञ, व्यावसायिक व कुशल कारागीर परदेशात कामे करून स्वदेशी परकीय चलन पाठवीत आहेत. परिणामी ज्या परकीय चलनाच्या अभावी आजवर आर्थिक विकास योजनांना मर्यादा पडल्या होत्या त्या परकीय चलनाबाबतही आज देश समृद्ध आहे.

बहुतेक सर्व साथींचे रोग जवळजवळ नाहीसे झाले आहेत. सामान्य रोगांवर औषधपाण्याची व्यवस्था झाली आहे. मृत्यूंचे प्रमाण कमी होऊन आयुर्मान वाढत आहे. शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणात झाला आहे. सन १९५०-५१ साली सुमारे चार लक्ष विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतला होता; आज त्यांची संख्या तीस लक्षांच्या पुढे गेली आहे. मूलभूत भौतिक व जीवशास्त्रात, तसेच तंत्र व यंत्रविज्ञानाच्या विविध शाखांत व क्षेत्रांत अनेक भारतीय शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, व यंत्रज्ञ काम करीत असून याबाबतही देश आता बहुतांशी स्वावलंबी झाला आहे.

अशा या वृद्धिंगत आधुनिक अर्थव्यवस्थेत आवश्यक व पूरक सेवासुविधांचे जाळे आज सर्वत्र पसरले आहे. शेतीस पाणीपुरवठा करणारे लहानमोठे जलाशय आणि त्यातून निघणारे पाट, जलविद्युत आणि औष्णिक विद्युत निर्माण करणारी केंद्रे आणि त्यातून विविध प्रदेशांस वीजपुरवठा करणारी वितरणयंत्रणा, बहुतांशी विद्युत्शक्ती आणि डिझेल तेलावर चालणारी जलद गतीची रेल्वेयंत्रणा, राष्ट्रीय व राज्य महामार्ग आणि त्यावर प्रवासी व मालाची अव्याहत वाहतूक करणारी बस व ट्रकव्यवस्था, बहुतेक सर्व नगरांना जोडणारी आणि भारताचा आंतरराष्ट्रीय संपर्क साधणारी दूरध्वनी,

तारायंत्र आणि बिनतारी संदेशव्यवस्था, शेती व उद्योगव्यवसायास भांडवल व पतपुरवठा करणारी यंत्रणा, विमा आणि व्यापारी संस्था, आधुनिक सोयींनी सुसज्ज बंदरे आणि विमानतळ, सागरसंचार करणारी जहाजे, आंतरदेशीय व आंतरराष्ट्रीय वाहतूक करणारी विमानव्यवस्था इत्यादी नानाविध सेवासुविधांनी आज अर्थव्यवस्था सुसज्ज आहे.

आर्थिक प्रगतीचे हे यश खरोखरीच अभिमानास्पद आहे. परंतु त्या यशालाच चिकटून आलेले अपयशही तेवढेच चिंताजनक आहे. नियोजनकार म्हणतात : देशातील बेकारी व दारिद्र्याचे निर्मूलन करून समाजातील आर्थिक विषमता सुसह्य करणे हे नियोजित आर्थिक विकासाचे उद्दिष्ट सत्तावीस वर्षांपूर्वी होते तेवढेच आजही दूर क्षितिजावर आहे. अजूनही बेकारी फार मोठ्या प्रमाणात अस्तित्वात असून चाळीस टक्क्यांपेक्षा अधिक जनता दारिद्र्यात आहे. मागणीअभावी अन्नधान्याचे साठे वाढत आहेत. रोगराई कमी झाली, आयुर्मान वाढले, परंतु उपासमार कमी झाली नाही. सुशिक्षित बेकारांचे प्रमाण वाढत असून उच्च शिक्षणावरील बराच खर्च अनाठायी ठरत आहे. परंतु त्याचबरोबर अजूनही २० कोटी प्रौढ निरक्षर आहेत.

औद्योगिक विकासात विशेषत: मौलिक उद्योगात सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजेच सार्वजनिक मालकीचे उद्योग आघाडीवर आहेत. असे असूनही खाजगी क्षेत्रात औद्योगिक साधनसंपत्तीचे केंद्रीकरण वाढले आहे. औद्योगिक उत्पादनाच्या प्रमाणात औद्योगिक रोजगारी वाढली नाही. किंबहुना काही क्षेत्रांतील आधुनिक औद्योगिक प्रगतीमुळे त्या क्षेत्रातील पारंपारिक औद्योगिक रोजगारी कमी होऊन नवी बेकारी निर्माण झाली आहे.

समाजातील आर्थिक विषमता कमी झाल्याची लक्षणे दिसत नाहीत. समाजाच्या विविध वर्गात क्रयशक्तीचे वाटप अत्यंत विषम आहे. परिणामी गेल्या तीस वर्षांतील आर्थिक विकास प्रामुख्याने अगदी अल्पसंख्य, मध्यम व उच्च वर्गाच्या गरजा भागविण्याकरता खर्ची पडला आहे आणि बहुसंख्य जनतेच्या प्राथमिक गरजाही अपुऱ्याच राहिल्या आहेत. उदाहरणच द्यावयाचे तर बहुसंख्य जनतेच्या डोक्यावर धड छप्परही नसताना शहरातील विलासी जीवनाकरिता अलिशान इमारती व प्रासाद उभे राहात आहेत. अर्थव्यवस्था नानाविध सेवासुविधांनी सुसज्ज आहे. परंतु बहुसंख्य जनतेचा या सुविधांशी संबंधही येत नाही.

योजनाकार म्हणतात : कोठेतरी काहीतरी चुकले आहे हे निश्चित. म्हणून गेली तीस वर्षे अवलंबवलेली आर्थिक धोरणे आणि पाठपुरावा केलेली अर्थनीती यांचा पुनर्विचार करणे आज आवश्यक आहे.

एवढ्या प्रांजल कबुलीजबाबानंतर सहाव्या पंचवार्षिक योजनेत अर्थव्यवस्थेला काहीतरी मूलभूत कलाटणी मिळणार अशी अपेक्षा निर्माण होणे स्वाभाविक आहे. म्हणून आजवर काय म्हटले, काय केले, आणि काय झाले याचा सारांशाने विचार करू म्हणजे सहाव्या पंचवार्षिक योजनेत वेगळे काय म्हटले आहे आणि वेगळे काय होण्याचा संभव आहे याचा अंदाज लागेल.

बेकारी वा दारिद्र्य यांचे निर्मूलन आणि समाजातील आर्थिक विषमता कमी करणे ही आर्थिक विकासाची प्रमुख उद्दिष्टे म्हणून भारतातील आर्थिक धोरणकर्त्यांनी प्रथमपासून मानली आहेत. पैकी बेकारी व दारिद्र्याचे निर्मूलन आधुनिक आर्थिक विकासानेच होऊ शकेल अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. जेवढ्या अधिक वेगाने आर्थिक विकास साधेल तेवढ्या लवकर बेकारी व दारिद्र्याचा प्रश्न सुटेल, या अपेक्षेने शक्य तितका वेगवान आर्थिक विकास हे आर्थिक नियोजनाचे उद्दिष्ट त्यांनी मानले होते. बेकारी व दारिद्र्याचा प्रश्न सोडवावयाचा तर निदान लोकसंख्येच्या वाढीच्या वेगापेक्षा अधिक वेगाने आर्थिक विकास होणे आवश्यक होते. उदाहरणार्थ, लोकसंख्या दरसाल दोन-सव्वादोन टक्के वेगाने वाढली तर आर्थिक विकासाचा वेग निदान दरसाल पाच-सव्वापाच टक्के असावयास हवा. सुरुवाती सुरुवातीस आर्थिक विकास याहीपेक्षा अधिक वेगाने होईल अशी अपेक्षा होती. परंतु अनुभवाअंती चवथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनांत आर्थिक विकासाचा वेग दरसाल साडेपाच टक्केच धरला होता. प्रत्यक्षात गेल्या सत्तावीस वर्षात आर्थिक विकासाचा दीर्घकालीन वेग केव्हाही दरसाल तीन-साडेतीन टक्क्यांपेक्षा जास्त लाभला नाही. सन १९६९-७० ते १९७६-७७ या चवथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनांच्या काळात तर आर्थिक विकासाचा वेग दरसाल केवळ २.७७ टक्के एवढाच होता. परिणामी गेल्या तीस वर्षांत बेकारी व दारिद्र्याचा प्रश्न सुटण्याऐवजी अधिकच गंभीर होत गेला.

अपेक्षित वेगाने आर्थिक विकास न होण्याचे कारण भांडवलाचा तुटवडा. अपेक्षित आर्थिक विकासास आवश्यक तेवढे भांडवल उभे करावयाचे तर अर्थव्यवस्थेत त्या प्रमाणात बचत झाली पाहिजे. ती झाली नाही आणि भांडवल कमी पडले. आर्थिक विकास अपेक्षित वेगाने झाला नाही. भांडवलप्रधान आर्थिक विकासास भांडवलाअभावी अशा मर्यादा पडतात. शिवाय भांडवलप्रधान आर्थिक विकासात उत्पादनवाढीच्या प्रमाणात रोजगार वाढत नाही. त्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रमाणातही रोजगाराचा प्रश्न सुटत नाही. उदाहरणार्थ, सन १९६१ ते १९७६ या पंधरा वर्षांच्या काळात आधुनिक कारखानदारीचे उत्पादन १६१ टक्के वाढले. मात्र

त्यातील रोजगार फक्त ७१ टक्क्यांनीच वाढला. या समस्येची जाणीव योजनाकारांना प्रथमपासून होती. त्यामुळे भांडवलप्रधान तंत्राऐवजी श्रमप्रधान उत्पादनतंत्र म्हणजेच साध्या भाषेत ग्रामोद्योग व हस्तव्यवसाय-यांचा अवलंब केला तर कमी भांडवलात आर्थिक विकास साधेल आणि बेकारी व दारिद्र्याचा प्रश्न सुलभ रीतीने सुटू शकेल हा विचार प्रथमपासूनच घोटाळत होता. पहिल्या पंचवार्षिक योजनेत हा विचार प्रामुख्याने गांधीवादी विचारपरंपरेतून मांडला गेला. स्वतंत्र भारताचा आर्थिक विकास आधुनिक, भांडवलप्रधान उत्पादनतंत्राने करावयाचा का पारंपारिक श्रमप्रधान उत्पादनतंत्राने करावयाचा असा मूलभूत प्रश्न उपस्थित झाला. असा मूलभूत प्रश्न उपस्थित करणे गांधीवादी परंपरेस धरून असले तरी व्यवहार्य नव्हते. तसा तो उपस्थित करून श्रमप्रधान उत्पादनतंत्राचे समर्थन करणे अवघड होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अर्थशास्त्रज्ञांनी या प्रश्नाला व्यवहाराची मुरड घातली. देशातील बेकारीच्या संदर्भात श्रमप्रधान उत्पादनतंत्रास अर्थशास्त्राची बैठक दिली आणि त्यायोगे अर्थव्यवस्थेच्या काही क्षेत्रांत आधुनिक भांडवलप्रधान उत्पादनतंत्र, इतर क्षेत्रांत पारंपरिक श्रमप्रधान उत्पादनतंत्र असा दोन्ही उत्पादनतंत्रांचा समन्वय मोठ्या कौशल्याने साधला. पोलादासारख्या आधुनिक अवजड उद्योगांच्या विकासाकरिता आधुनिक भांडवलप्रधान उत्पादनतंत्र आणि दैनंदिन जीवनोपयोगी वस्तूंच्या पुरवठ्यांकरिता उपलब्ध पारंपारिक उत्पादनाची साधने व श्रमप्रधान तंत्र असे प्रमेय मांडले गेले. उदाहरणार्थ, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत एका बाजूला अमाप भांडवल लागणाऱ्या पोलादाच्या गिरण्या होत्या आणि त्याचबरोबर कापड उत्पादनात करावयाची सर्व भावी वाढ हातचरखा आणि हातमाग या साधनांनीच करावी अशी कल्पना होती. या धोरणाला अनुसरून दुसऱ्या, तिसऱ्या, चवथ्या व पाचव्या योजनांत खादी व ग्रामोद्योग यांच्या विस्ताराकरिता पुष्कळ तरतूद करण्यात आली. ठोकळमानाने सांगावयाचे तर त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. काही अपवाद वगळता बहुतेक सर्व ग्रामोद्योगांचे उत्पादन व त्यातील रोजगार वाढण्याऐवजी कमीच झाला.

तात्पर्य, आधुनिक उद्योगधंद्यांत पुष्कळसे भांडवल गुंतवले गेले. या उद्योगांचे उत्पादनही वाढले. उत्पादनाच्या प्रमाणात नाही परंतु काही कमी प्रमाणात या उद्योगांतील रोजगारही वाढला. परंतु त्याचबरोबर पारंपारिक ग्रामोद्योगांतील रोजगार कमी झाला. या दोघांची बेरीज केली तर असे दिसते की, उद्योगातील एकूण रोजगारी जेमतेम लोकसंख्येच्या प्रमाणातच वाढली. त्या अनुषंगाने इतर व्यवसाय, व्यापार, शासन व इतर सेवा यांतील रोजगारही जेमतेम लोकसंख्येच्या प्रमाणातच

वाढला. बाकीच्या सर्व लोकसंख्येचा भार शेतीवर पडला. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात नमूद केले आहे की, सन १९२१ पासून सन १९७१ पर्यंतच्या पन्नास वर्षांत भारतात शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे प्रमाण यत्किंचितही कमी झालेले नाही. कदाचित ते काकणभर वाढलेलेच असेल. सन १९२१ साली शेती, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय आणि जंगले या प्राथमिक उद्योगांवर एकूण ७३.१ टक्के लोकसंख्या अवलंबून होती. सन १९७१ मध्ये ते प्रमाण ७३.८ टक्के होते. गेल्या सात-आठ वर्षात ते विशेष कमी झालेले असण्याचा संभव नाही. आर्थिक विकासाचे असे एक गमक आहे की, त्यायोगे शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या उत्तरोत्तर कमी होत जावी. भारतात गेल्या पन्नास वर्षांत शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या कमी होण्याचे तर बाजूलाच राहो, परंतु शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाणही कमी होण्याची लक्षणे दिसत नाही. या काळात झालेली लोकसंख्येची वाढ लक्षात गेता १९२१ च्या मानाने १९७१ साली शेतीवरील लोकसंख्येचा भार दुप्पट झाला होता. गेल्या सात-आठ वर्षात हा भार असाच वाढत असणार. तात्पर्य, शेतीवर असणारी लोकसंख्या नव्हे, निदान शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण तरी कमी झाले पाहिजे. या प्राथमिक निकषासही भारतातील गेल्या तीस वर्षांतील विकास उतरत नाही. असे असूनही झालेला आर्थिक विकास सकृत्दर्शनी अभिमानास्पद वाटावा, क्वचित तो नेत्रदीपकही भासावा, ते कसे याचे रहस्य उलगडणे आवश्यक आहे.

शेतीवरील वाढत्या लोकसंख्येचा भार लक्षात घेऊन येतील त्या साऱ्यांना आहे-नाही त्या जमिनीवर वसविण्याकरता शेतजमिनीच्या फेरवाटपाची कल्पना निघाली. समाजवादी व साम्यवादी पक्षांनी त्यांच्या ध्येयधोरणानुसार तिचा पुरस्कार केला. सर्वोदयवाद्यांनी 'सब भूमि गोपालकी' म्हणून जाहीर केले. अर्थशास्त्रज्ञांनी जमिनीच्या फेरवाटपाने रोजगार वाढेल म्हणून सांगितले. प्रत्यक्षात हाती फार लागले नाही. डोंगर पोखरून उंदीर काढण्याचा प्रकार झाला. जे फेरवाटप झाले त्यामुळे अधिक रोजगार उपलब्ध झाल्याचा स्पष्ट पुरावा नाही.

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यानुसार सन १९७७-७८ साली देशात २६.५३ कोटी काम करणारे किंवा काम करू इच्छिणारे लोक होते. त्यापैकी ४३.७ लक्ष लोक जवळजवळ पूर्णपणे बेकार होते. म्हणजे बेकारीचे प्रमाण दोन टक्क्यांपेक्षाही कमी म्हणजे तसे फार नव्हते. परंतु बाकीच्या २६.०९ कोटी लोकांना सर्वांना पुरेसे काम नव्हते. काही थोड्या लोकांना पूर्ण वेळ काम होते. बाकीच्यात उपलब्ध काम कमीअधिक प्रमाणात वाटले गेले होते.

रोजगारीच्या वा बेकारीच्या या स्वरूपामुळे या प्रश्नाची चर्चा करताना माणसांची मोजदाद न करता आज अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेले काम किती लोकांना पूर्ण वेळ पुरणारे आहे आणि सर्वांना पूर्ण वेळ काम द्यावयाचे म्हटले तर आणखी किती कामाची गरज आहे अशी कामाच्या हिशेबात चर्चा करणे सोईचे होते. त्याकरिता सर्वांना पूर्ण वेळ काम म्हणजे काय ते प्रथम ठरविले पाहिजे. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात असे मानले आहे की, पंधरा वर्षे व त्यावरील वयाच्या सर्व पुरुषांना पूर्ण वेळ म्हणजे वर्षातून २७३ दिवस रोजचे आठ तास काम मिळावयास हवे. पंधरा वर्षे व त्यावरील वयाच्यां स्त्रियांच्याबाबत असे मानले आहे की, त्यांना सरासरीने पुरुषांच्या निम्मे काम मिळाले तरी पुरेसे आहे. आजच्या परिस्थितीत हे संयुक्तिक दिसते. म्हणजेच पंधरा वर्षे व त्यावरील वयाचे सर्व पुरुष आणि पंधरा वर्षे व त्यावरील वयाच्या निम्म्या स्त्रिया यांना पूर्ण वेळ पुरेल एवढे काम अर्थव्यवस्थेत असले पाहिजे. या हिशेबाने सन १९७७-७८ साली २०.७८ कोटी लोकांना पूर्ण वेळ पुरेल एवढ्या कामाची गरज होती. उलट, त्या वर्षी अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेले एकूण काम फक्त १६.७१ कोटी जणांना पुरेल एवढेच होते. म्हणजे सर्वांना पूर्ण वेळ काम द्यावयाचे तर आणखी ४.०७ कोटी लोकांना पुरेल एवढ्या जादा कामाची, रोजगाराची गरज होती. सारांश, सन १९७७-७८ साली अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेल्या कामाच्या मानाने निदान पंचवीस टक्के अधिक कामाची गरज होती.

भारतातील बेकारीच्या प्रश्नाचे हे स्वरूप आहे. आता दारिद्र्याच्या प्रश्नाकडे वळू. बेकारी व दारिद्र्य हे दोन स्वतंत्र प्रश्न आहेत, असे प्रस्थापित अर्थशास्त्रज्ञ मानतात. एका अर्थाने ते खरे आहे. ज्या कुटुंबात कर्ती माणसे नाहीत किंवा कर्त्या माणसांवर मुले अथवा म्हाताऱ्या वा दुबळ्या माणसांचा भार फार आहे अशा कुटुंबाचा प्रश्न केवळ कर्त्या माणसांना पूर्ण वेळ रोजगार देऊन सुटणार नाही. त्यांच्या दारिद्र्याचे निराकरण सामाजिक साहाय्याशिवाय होणार नाही. हे उघड आहे. त्यांचा प्रश्न समाजाच्या आजच्या कुवतीबाहेरचा म्हणून त्याचा आजवर फारसा विचार झाला नाही. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यातही तो नाही. सबब आपण तो तूर्त बाजूस ठेवू.

परंतु ज्या कुटुंबात कर्ती माणसे आहेत, जेथे त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्यांचा भार अवास्तव नाही तेथे रोजगाराचा प्रश्न आणि दारिद्र्याचा प्रश्न परस्परांशी निगडितच नव्हे तर एकरूप आहे असे मी मानतो. प्रस्थापित अर्थशास्त्रज्ञ तसे मानीत नाहीत. वर सांगितल्याप्रमाणे सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यातही पंधरा वर्षे व त्यावरील वयाच्या पुरुषास वर्षातील २७३ दिवस रोजचे आठ तास काम आणि पंधरा वर्षे व

त्यावरील वयाच्या स्त्रीस सरासरी पुरुषाच्या निम्म्याने काम असले म्हणजे सर्वांना पूर्ण वेळ रोजगार मिळाला असे मानले आहे. अशा या पूर्ण रोजगारातून त्या माणसांना दिवसाकाठी, महिन्याकाठी, वर्षाकाठी काय मिळते आणि अशी ही पूर्ण रोजगार असलेली माणसे आणि त्यांच्या कुटुंबातील माणसे वर्षातून किती दिवस दोन वेळ पोटभर जेवतात हा प्रश्न नियोजन मंडळ विचारीत नाही. तो प्रश्न स्वतंत्र आहे, तो श्रमाच्या उत्पादकतेचा किंवा श्रमाच्या मूल्याचा प्रश्न आहे, तो रोजगाराच्या प्रश्नापासून वेगळा ठेवावा असे प्रस्थापित अर्थशास्त्रज्ञ मानतात. साहजिक आहे, कारण रोजगाराचा म्हणजे वर्षाचे किती दिवस रोज किती तास श्रम करतो आणि दारिद्र्याचा म्हणजे त्या श्रमाचे मोल काय हे दोन प्रश्न वेगळे ठेवले नाहीत तर आहे त्या जमिनीचे फेरवाटप करून किंवा खादी ग्रामोद्योगांचा विस्तार करून जादा रोजगार उपलब्ध करण्याच्या योजना कागदावरही आखता येणार नाहीत.

अशा रीतीने बहुसंख्य जनतेच्याबाबत रोजगार आणि निर्वाह हे दोन प्रश्न विचारातही स्वतंत्र ठेवले असले तरी अर्थव्यवस्थेच्या एका मर्यादित क्षेत्रात मात्र ते विचारातच नव्हे तर आचारातही पूर्णपणे निगडित केले आहेत. या क्षेत्रास अर्थव्यवस्थेतील संघटित क्षेत्र म्हणतात. त्यात ठोकळमानाने खाजगी क्षेत्रातील सर्व उद्योग-व्यवसाय ज्यात प्रत्येकी किमान दहा कामगार वा कर्मचारी आहेत आणि सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजेच सार्वजनिक मालकीचे सर्व उद्योगव्यवसाय तसेच शासकीय, बिनशासकीय सर्व सेवासुविधांचा अंतर्भाव होतो. सन १९७७-७८ साली या क्षेत्रात काम करणाऱ्या कामगार-कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे २.५ कोटी होती. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यानुसार सन १९७७-७८ साली देशात एकूण काम करणाऱ्या व काम करू इच्छिणाऱ्यांची संख्या २६.५३ कोटी होती हे आधी सांगितलेच आहे. म्हणजे एकूण कर्त्या लोकांपैकी दहा टक्क्यांपेक्षाही कमी लोक अर्थव्यवस्थेच्या संघटित क्षेत्रात काम करीत होते. महिन्याच्या महिन्याला पगार व महागाई भत्ता घेणारी ही माणसे आहेत. त्यांच्याबाबत रोजगार व निर्वाह यांची सांगड घालणे प्रस्थापित धोरणाचा भाग आहे.

याचे कारण असे की, ज्याला आपण अर्थव्यवस्थेतील संघटित क्षेत्र म्हटले ते ठोकळमानाने कार्ल मार्क्स यांना अभिप्रेत असलेले अर्थव्यवस्थेतील भांडवलशाही क्षेत्र आहे. या क्षेत्रात पूर्ण वेळ रोजगार करणाऱ्या कामगाराला निर्वाहापुरते वेतन मिळत नसेल तर मार्क्स यांच्या सिद्धान्ताप्रमाणे त्याचे कारण भांडवलशाहीकडून होणारी कामगाराची पिळवणूक हे आहे. ही पिळवणूक थांबवून कामगारांच्या श्रमाचे पूर्ण मूल्य भांडवलदाराकडून घेणे हे कामगार चळवळीचे उद्दिष्ट आहे. कामगारांची

प्रत्येक मागणी ही भांडवलशाहीविरोधी वर्गयुद्धाचा भाग असल्याने कामगारांच्या कोणत्याही मागणीला पाठिंबा देणे हा पुरोगामी धोरणाचा गाभा मानला गेला आहे. त्यामुळे गेली तीस वर्षे कामगार चळवळीचा पाठपुरावा केला गेला. त्यातून कामगार चळवळीचे सामर्थ्य वाढले, परंतु त्यामुळे भांडवलशाहीला कोठे धक्का लागल्यासारखे दिसत नाही. भांडवलशाहीत ज्या मानाने मक्तेदारी अधिक त्या मानाने संघटित कामगारांच्या मागण्या सहज मान्य होऊ शकतात. त्यामुळे ज्या त्या कारखान्यातील कामगार-संघटना आपापला स्वार्थ साधण्याकरता भांडवलशाहीशी हातमिळवणी करून नफेबाजीत भागीदारी करीत आहेत असे दिसते. परिणामी संघटित कामगारवर्गाच्या सामर्थ्यामुळे भांडवलशाही नष्ट वा खिळखिळीत होण्याचे बाजूलाच राहो, उघड भांडवलशाहीतील मक्तेदारी वाढत जाऊन ती दृढ होण्यास साहाय्य होत आहे.

या संघटित क्षेत्रातील कामगार-कर्मचाऱ्यांचा लढा भांडवलशाहीविरोधी म्हणून म्हटले. परंतु प्रत्यक्षात या क्षेत्रात काम करणाऱ्या एकूण २.५ कोटी कामगार-कर्मचाऱ्यांपैकी सुमारे फक्त एकतृतीयांश कामगार-कर्मचारीच खाजगी भांडवलशाही क्षेत्रात काम करीत आहेत. गेल्या तीस वर्षांत सार्वजनिक मालकीचे मोठे उत्पादनक्षेत्र निर्माण झाले आहे. आकाराने हे खाजगी क्षेत्राएवढे किंवा काकणभर मोठेच आहे. उत्पादनाची साधने शक्यतर सार्वजनिक मालकीची असावीत या समाजवादी तत्त्वानुसार गेल्या तीस वर्षांत वृद्धिंगत झालेले सार्वजनिक उद्योगक्षेत्र हे समाजवादी समाजरचनेच्या प्रस्थापनेतील महत्त्वाचे पाऊल मानावयास हवे. परंतु या क्षेत्राबाबत कामगार आपली काही वेगळी जबाबदारी मानीत नाहीत. खाजगी भांडवलशाही क्षेत्राप्रमाणे सार्वजनिक क्षेत्रातीलही आपला लढा भांडवलशाहीविरोधीच आहे असे मानून किंवा म्हणून आपल्या मागण्या रेटीत असतात. सार्वजनिक क्षेत्रात कामगारांच्या मागण्याही अधिक सहजपणे मान्य होतात, कारण सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांत मक्तेदारी तर मोठ्या प्रमाणात आहेच, शिवाय त्यातील व्यवस्थापनावर नफातोट्याची अंतिम जबाबदारी नाही. परिणामी सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे सामाजिक मालकीचे राहिले नसून त्यातील कामगारांच्या मालकीचे असल्यासारखे झाले आहेत.

सार्वजनिक औद्योगिक क्षेत्रातील कामगारांशिवाय शासकीय कर्मचाऱ्यांचा एक फार मोठा वर्ग गेल्या तीस वर्षांत निर्माण झाला आहे. काही अंशी नियोजित अर्थव्यवस्थेचा तो अपरिहार्य परिणाम आहे. संख्येने हा वर्ग जवळजवळ संघटित खाजगी उद्योगक्षेत्रातील वा सार्वजनिक उद्योगक्षेत्रातील कामगारवर्गाएवढाच आहे. कोण्यातरी समाजवादाच्या आधारे शासकीय कर्मचारी आपला लढाही

भांडवलशाहीविरोधी आहे असेच मानतात. सारे शासनच कर्मचाऱ्यांच्या अधीन असल्याने त्यांच्या मागण्याही सहज मान्य होतात.

तात्पर्य, देशातील खाजगी आणि सार्वजनिक उद्योगधंद्यांतील संघटित कामगार तसेच शासकीय कर्मचारी समाजवादाच्या घोषणा देत आपापला स्वार्थ साधीत आहेत. महिना दोन हजार रुपये पगार घेणाऱ्यांनीही हातात लाल झेंडा घेऊन पंचवीसशे मागावेत अशी परिस्थिती आहे. परिणामी अर्थव्यवस्थेच्या या संघटित क्षेत्रात नोकरी वा रोजगार मिळाला की निर्वाहाचा तर प्रश्नच नाही, परंतु साऱ्या संसाराचे भले होईल या अपेक्षेने कमीअधिक शिक्षण झालेला तरुणवर्ग या क्षेत्रात प्रवेश मिळविण्याकरता नाना खटपटी लटपटी करीत आहे. या क्षेत्रातील नोकरी वा रोजगार हेच शिक्षणाचे उद्दिष्ट असल्याने शिक्षणाचा प्रसार झपाट्याने होत आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याप्रमाणे सन १९७८ साली देशात एकूण २२.२० कोटी लोक साक्षर होते. पैकी १८.५१ कोटी उच्च शालेय शिक्षण अपुरे असलेले, २.९१ कोटी उच्च शालेय शिक्षण पूर्ण झालेले आणि ७८.५ लक्ष पदवी वा डिप्लोमा असणारे होते. पुढील पाच वर्षात यामध्ये निदान ५.९२ कोटी शालेय शिक्षण अपुरे असलेले, १.२० कोटी उच्च शालेय शिक्षण पूर्ण झालेले आणि ३१.३ लक्ष पदवी व डिप्लोमा असलेल्यांची भर पडेल असा अंदाज आहे. सर्व पदवीधर आणि स्थापत्यशास्त्रातील डिप्लोमा असणाऱ्या सुशिक्षितांतील बेकारीसंबंधी सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात माहिती दिली आहे ती अशी : सन १९७७-७८ साली अशा सुशिक्षितांची संख्या ६८.१ लक्ष होती आणि त्यांपैकी ७.० लक्ष बेकार होते. सन १९८२-८३ साली या सुशिक्षितांची संख्या ९४.९ लक्ष होईल आणि त्यांपैकी १४.३ लक्ष बेकार असतील असा अंदाज आहे. म्हणजे पुढील पाच वर्षांत पदवीधर व स्थापत्य डिप्लोमा असणाऱ्या सुशिक्षित बेकारांची संख्या दुपटीपेक्षा जास्त होईल. यापेक्षा कमी शिक्षण झालेल्या असंख्य तरुणांचे काय होणार त्याचा अंदाज न केलेला बरा.

पूर्वी सांगितल्याप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या या संघटित क्षेत्रात केवळ दहा टक्के लोकसंख्या गुंतली आहे. उलट, राष्ट्रीय उत्पादनाच्या जवळजवळ तीस टक्के उत्पादन या क्षेत्रात होते. बाकीची नव्वद टक्के लोकसंख्या उरलेल्या सत्तर टक्के राष्ट्रीय उत्पादनावर गुजराण करते. म्हणजे अर्थव्यवस्थेच्या संघटित आणि असंघटित क्षेत्रांतील दरडोई उत्पादनात जवळजवळ ४:१ एवढी तफावत आहे. गेल्या तीस वर्षांच्या आर्थिक धोरणात समाजवादाचा, सामाजिक न्यायाचा वेळोवेळी विचार झाला,

वेळी अवेळी उच्चार झाला, परंतु दहा टक्के संघटित वर्ग आणि नव्वद टक्के असंघटित समाज या दोहोतील विषमता, त्यांमधील सामाजिक न्याय व अन्याय यांचा ना कोणी उल्लेख केला ना कोणीही विषमता कमी करण्याकरिता तत्त्वत: का होईना काही उपाययोजना सुचविली.

सारांश, गेल्या तीस वर्षांतील आर्थिक धोरणाची त्रिसूत्री सांगावयाची तर ती अशी आहे. एका लहानशा संघटित क्षेत्रात आधुनिक भांडवलप्रधान तंत्रावर आधारित आर्थिक विकास आणि त्याबरोबर येणारा संघटित कामगार व कर्मचाऱ्यांचा समाजवाद, इतरेजनांना शक्यतर पारंपारिक ग्रामीण उद्योगव्यवसायात जिवंत ठेवण्याचा गांधीवाद, आणि बाकी साऱ्यांना उण्यापुऱ्या शेतजमिनीवर बसविण्याकरता शेतजमीन–वाटपाचा साम्यवाद. हेतू हा की, प्रामुख्याने नागरी संघटित क्षेत्राला, त्यातील उद्योगव्यवसायांना, त्यातील भांडवलदारांना तसेच कामगारांना, त्यातच वावरणाऱ्या शासनाला आणि शासकीय कर्मचाऱ्यांना दुसऱ्या दोन दरिद्री ग्रामीण वर्गांचा उपद्रव न होवो. गेल्या तीस वर्षांतील आर्थिक धोरणाची जी त्रिसूत्री सांगितली तिला बांधणारे हे मुख्य सूत्र आहे.

आर्थिक विषमता म्हटली म्हणजे भांडवलदार, व्यापारी, आणि बडा शेतकरी यांचे चित्र आपणां पुष्कळांच्या मनात येते आणि इतरांच्या मनात ते उभे केले जाते. आपणांस सोईचे असले तरी ते केवळ अर्धसत्य आहे. आज समाजात वरच्या पंधरा टक्के वर्गात कोण कोण आहे याचा तपास केला तर असे दिसून येईल की, त्यात दोन टक्के बडा शेतकरी, दोन टक्के भांडवलदार, कारखानदार, व्यापारी, लहानमोठे उद्योजक, एक टक्का डॉक्टर, वकील इत्यादी व्यावसायिक आणि महिन्याच्या महिन्याला पगार व महागाईभत्ता घेणारा दहा टक्के कामगार व कर्मचारीवर्ग यांचा समावेश होतो. या सभागृहात बसलेले तुम्ही–आम्ही सारे त्यात अंतर्भूत आहोत. हे रुचत नसले तरी पूर्ण सत्य आहे. या अल्पसंख्य वर्गाच्या गरजा भागविण्याकरिता, त्याचे चोचले पुरे करण्याकरिता अर्थव्यवस्थेतील उत्पादनशक्ती कार्यरत आहे. सेवासुविधा सेवेस हजर आहेत. त्यातून देशातील बेकारीचा, दारिद्र्याचा, आणि आर्थिक विषमतेचा प्रश्न न सुटला तर आश्चर्य कसले!

सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या प्रारंभी नियोजन मंडळाने गेल्या तीस वर्षांतील आर्थिक विकासाचा जो आढावा घेतला, आर्थिक विकासातील मूलभूत अपयशाबद्दल जो खेद व्यक्त केला त्याचा हा मथितार्थ आहे. आता सहाव्या पंचवार्षिक योजनेकडे वळू.

अधिकतम वेगाने आर्थिक विकासाचे उद्दिष्ट गेल्या पाच योजनांत होते तसेच ते सहाव्या योजनेतही आहे. परंतु सहाव्या योजनेच्या आराखड्यात योजनेतील उद्दिष्टित

विकासवेग वास्तव असावा असे आग्रहाने म्हटले आहे. गेल्या सत्तावीस वर्षात विकासाचा दीर्घकालीन वेग तीन-साडेतीन टक्क्यांपेक्षा केव्हाही अधिक नव्हता हे लक्षात घेतले म्हणजे चवथ्या व पाचव्या पंचवार्षिक योजनांत उद्दिष्टिलेला साडेपाच टक्क्यांचा वेग अवास्तव म्हणावा लागेल. अशा अवास्तव विकासवेगाचे उद्दिष्ट ठेऊन बेकारी व दारिद्र्याचा प्रश्न तर सुटत नाहीच, परंतु अर्थव्यवस्थेतील उत्पादनास अनिष्ट वळण लागते आणि योजनेची उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या प्रयत्नात तुटीच्या अंदाजपत्रकाचा आश्रय घेण्याने चलनवृद्धी आणि भाववाढीचा धोका निर्माण होतो. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात या धोक्याची स्पष्ट दखल घेतली आहे आणि विकासवेगाचे उद्दिष्ट वास्तव असले पाहिजे असे म्हणनू दरसाल ४.७ टक्के एवढेच विकासवेगाचे उद्दिष्ट ठेवले आहे. साडेपाच टक्क्यांपेक्षा ४.७ टक्के कमी म्हणून अर्थातच ते अधिक वास्तव आहे. परंतु ते तीन-साडेतीन टक्क्यांपेक्षा बरेच वर आहे. शिवाय सन १९६९-७० ते १९७६-७७ या सात वर्षांत राष्ट्रीय उत्पादन दरसाल सरासरी केवळ २.७७ टक्के एवढ्यानेच वाढले हे लक्षात घेतले म्हणजे पुढील पाच वर्षात ते दरसाल ४.७ टक्के एवढ्या वेगाने वाढेल याविषयी शंका येते. कितीही म्हटले तरी नियोजनमंडळाच्या वास्तववादाला मर्यादा आहेतच. सहाव्या पंचवार्षिक योजनेत विकासवेगाचे उद्दिष्ट दरसाल ४.७ टक्के एवढेच ठेवावे हे म्हटल्यानंतर सातव्या पंचवार्षिक योजनेत ते दरसाल ५.५ टक्के करता येईल, असेही म्हणणे नियोजन मंडळास गरजेचे वाटले. सातव्या योजनेत विकासाचा वेग दरसाल ५.५ टक्के कसा होईल याचा थोडासा तपशीलही सहाव्या योजनेच्या आराखड्यात दिला आहे. दरसाल साडेपाच टक्के विकासवेगाचे उद्दिष्ट दृष्टिपथात कोठे ना कोठे तरी ठेवणे ही अर्थव्यवस्थेची असो वा नसो परंतु नियोजनमंडळाची नितान्त गरज आहे असे दिसते. असो.

घटकाभर आपण असे धरून चालू की, सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात अपेक्षेप्रमाणे दरसाल ४.७ टक्के वेगाने राष्ट्रीय उत्पादन वाढले. मग पुढचा प्रश्न हा की, त्यायोगे रोजगार किती वाढेल? त्यामुळे बेकारी किती कमी होईल? सन १९७७-७८ साली अर्थव्यवस्थेत फक्त १६.७१ कोटी लोकांना पुरेल एवढेच काम उपलब्ध होते आणि सर्व कर्त्या लोकांना पूर्ण वेळ काम द्यावयाचे तर ४.०७ कोटी लोकांना पुरेल एवढ्या जादा कामाची गरज होती हे आधी सांगितलेच आहे. पुढील पाच वर्षांत होणारी लोकसंख्येची वाढ लक्षात घेतली तर यात आणखी २.४० कोटी लोकांना पुरेल एवढ्या जादा कामाची व्यवस्था करावी लागेल. तात्पर्य, सन १९८२-

८३ साली सर्व कर्त्या माणसांना पूर्ण वेळ काम द्यावयाचे तर सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात ६.४७ कोटी लोकांना पुरेल एवढा नवा रोजगार निर्माण करावा लागेल. सन १९७७-७८ साली फक्त १६.७१ कोटी लोकांना पुरेल एवढेच काम उपलब्ध होते. पुढील पाच वर्षांत त्यात आणखी ६.४७ कोटी लोकांना पुरेल एवढ्या जादा कामाची भर घालावयाची तर रोजगाराची वाढ दरसाल ६.७६५ टक्के वेगाने व्हावयास हवी. राष्ट्रीय उत्पादन दरसाल केवळ ४.७ टक्के वेगाने वाढणार. राष्ट्रीय उत्पादन वाढते त्यापेक्षा काहीशा कमीच वेगाने रोजगार वाढतो असा आजवरचा अनुभव. मग राष्ट्रीय उत्पादन दरसाल केवळ ४.७ टक्क्यानेच वाढणार असले तर रोजगार दरसाल ६.७६५ टक्के वेगाने कसा वाढणार? या कोड्याची उकल हे सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याचे नावीन्य आणि वैशिष्ट्य मानता येईल.

रोजगाराचा विचार करू लागलो म्हणजे पुष्कळांच्या मनात संघटित क्षेत्रातील नोकऱ्या येतात. सन १९७७-७८ साली या क्षेत्रात फक्त २.५० कोटीच नोकऱ्या होत्या हे मागे सांगितलेच आहे. नियोजनमंडळाच्या अंदाजाप्रमाणे पुढील पाच वर्षांत अशा तऱ्हेच्या फार तर ३० लक्ष नव्या नोकऱ्या निर्माण होतील. तात्पर्य, ६.४७ कोटी लोकांना पुरेल एवढा रोजगार निर्माण करावयाचा तर केवळ संघटित क्षेत्राच्या विस्तारावर अवलंबून राहून चालणार नाही. संघटित क्षेत्राचा विस्तारही होईल. परंतु त्यात अगदी थोड्यांचीच, फार तर ३० लक्ष लोकांचीच नव्याने सोय होईल. बाकी बहुसंख्यांकरिता प्रामुख्याने शेती, श्रमप्रधान ग्रामोद्योग, लघुउद्योग आणि त्यांच्या अनुषंगाने येणाऱ्या व्यवसाय व सेवा यांचाच आश्रय घ्यावा लागेल. सहाव्या पंचवार्षिक योजनेचा हा दृष्टिकोन भारतातील आर्थिक नियोजनास अपरिचित नाही.

अशा रीतीने प्रामुख्याने शेती व श्रमप्रधान उद्योगांवर भर देऊन ६.४७ कोटी लोकांना पुरेल एवढा नव्हे, परंतु ४.९२ कोटी लोकांना पुरेल एवढा नवा रोजगार निर्माण करण्याची योजना सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात तपशीलवार मांडली आहे. ती फलद्रूप झाली तर सन १९८२-८३ साली फक्त १.५५ कोटी लोकांना पुरेल एवढ्याच कामाची तूट अर्थव्यवस्थेत राहील. एवढे झाले तरी याविषयी मोठीच प्रगती झाली आणि हा बिकट प्रश्न सुटण्याच्या मार्गाला लागला. असे म्हणावे लागेल.

पुढील पाच वर्षांत ४.९२ कोटी लोकांना पुरेल एवढा नवा रोजगार निर्माण करावयाचा तरी दरसाल ५.३ टक्के वेगाने रोजगाराची वाढ करावी लागेल. म्हणजे आर्थिक विकासाच्या अपेक्षित दरसाल ४.७ टक्के वेगापेक्षा रोजगार अधिक वेगाने

वाढेल ही अपेक्षा आहेच. अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांतील उत्पादनवाढीचे आणि रोजगारवाढीचे अपेक्षित वेग पुढील तक्त्यात दिले आहेत. तुलनेकरिता १९६९-७० ते १९७६-७७ या सात वर्षातील विविध क्षेत्रांतील उत्पादनवाढीचे वेगही दिले आहेत.

	१९६९-७० ते १९७६-७७ या काळातील उत्पादनवाढीचा प्रत्यक्ष वेग दरसाल दर शेकडा	१९७७-७८ ते १९८२-८३ या काळातील उत्पादनवाढीचा अपेक्षित वेग दरसाल दर शेकडा	रोजगारवाढीचा अपेक्षित वेग दरसाल दर शेकडा	नवीन रोजगार लक्ष माणसांना पुरेल इतका
शेती व संलग्न व्यवसाय	१.२८	२.७६	४.२२	२२७.६८
खाणी	४.७४	९.०७	८.४१	४.४७
उद्योग	३.६०	४.६७	६.८४	८९.१८
वीज	५.२०	९.५५	१०.८१	५.५४
बांधकाम	१.८९	१०.०९	११.५४	२२.६०
वाहन-व्यवहार	५.१७	४.६५	६.०३	२०.६८
सेवा	४.८६	५.६१	६.३१	१२२.४६
एकूण	२.७७	४.७०	५.३०	४९२.६१

यावरून हे लक्षात येईल की, आर्थिक विकासाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत गेल्या सात वर्षांत प्रत्यक्ष लाभलेल्या विकासवेगापेक्षा पुष्कळच जास्त विकासवेग सहाव्या पंचवार्षिक योजनेत अभिप्रेत आहे. हे वाढीव विकासवेग प्रत्यक्षात उतरले नाहीत तर मागील अनुभवाचीच पुनरावृत्ती होऊन बेकारीचा प्रश्न आहे तेथेच राहण्याचा धोका आहे. उदाहरणादाखल शेती व उद्योग या दोन महत्त्वाच्या क्षेत्रांतील योजनांचा थोडासा तपशील पाहू.

नियोजनमंडळाच्या आकडेवारीप्रमाणे सन १९७७-७८ साली शेती व संलग्न उद्योगांत फक्त ९.९२ कोटी लोकांना पुरेल एवढे काम होते. त्यात आणखी २.२८ कोटी लोकांना पुरेल एवढे म्हणजे जवळजवळ २५ टक्के अधिक काम पुढील पाच वर्षांत निर्माण करण्याची कल्पना आहे. त्याकरिता शेतीतील बागायती क्षेत्र वाढविण्याचा फार मोठा कार्यक्रम योजनेत अंतर्भूत आहे. पुढील पाच वर्षात १.७० कोटी हेक्टर जादा जमिनीस पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट आहे. सन १९७४-७५ ते १९७७-७८ या चार वर्षात केवळ सुमारे ४० लक्ष हेक्टर जमिनीलाच नवा पाणीपुरवठा करता

आला हे लक्षात घेतले तर पुढील पाच वर्षांत १.७० कोटी हेक्टर जमिनीला नवा पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट अवास्तव वाटते. ते पूर्ण झाले तर शेती व संलग्न उद्योगांतील विकासाचा वेग सहाव्या पंचवार्षिक योजनेत दरसाल २.७६ टक्के राहील असा अंदाज आहे. सन १९६९-७० ते १९७७-७८ या सात वर्षात या क्षेत्रातील विकासाचा वेग दरसाल फक्त १.२८ टक्के एवढाच होता हे लक्षात ठेवले पाहिजे. उद्दिष्टित विकासाचा वेग प्रत्यक्षात सफल झाला तर शेती व संलग्न उद्योगांतील रोजगारी पुढील पाच वर्षे दरसाल सरासरी ४.२२ टक्के वेगाने वाढेल आणि पाच वर्षांत या क्षेत्रात २.२८ कोटी लोकांना पुरेल एवढा जादा रोजगार निर्माण होईल असे नियोजनाचे अंकगणित आहे. त्याकरिता आवश्यक तर शेतीच्या यांत्रिकीकरणावर काही निर्बंध घालावेत असेही नियोजनमंडळाने सुचविले आहे. शेतीस पाणीपुरवठ्याची, शेतीउत्पादनाची आणि या क्षेत्रातील रोजगाराची ही सारी उद्दिष्ट्ये पूर्ण झाली तर आनंदच आहे. परंतु ती अवास्तव ठरून पूर्ण न झाली तर रोजगारीचा प्रश्न गेली तीस वर्षे लोंबकळत राहिला तसाच राहण्याचा धोका आहे.

शेतीनंतर उद्योगधंदे. यात पुढील पाच वर्षांत ८९.१८ लक्ष लोकांना पुरेल एवढा नवा रोजगार निर्माण करावयाचा आहे. १९७७-७८ साली औद्योगिक उत्पादनात एकूण २२७.३६ लक्ष लोक गुंतले होते. त्यात ८९.१८ लक्ष लोकांची म्हणजे सुमारे ४० टक्क्यांची भर पुढील पाच वर्षांत घालावयाची आहे. आधुनिक भांडवलप्रधान उद्योगधंद्यांची वाढ करून हे साधणार नाही. म्हणून ते ग्रामोद्योग, हस्तव्यवसाय व लघुउद्योग यांनी साधण्याचा पुनश्च प्रयत्न करावयाचा आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याप्रमाणे पुढील पाच वर्षांत ग्रामोद्योग व लघुद्योगांत जादा ६८ लक्ष लोकांना पूर्ण वेळ रोजगार मिळणार आहे. त्याची फोड अशी : हातमाग ३५ लक्ष, यंत्रमाग ३ लक्ष आणि लघुउद्योग ३० लक्ष, खेरीज खादी व ग्रामोद्योगांत ४८.९ लक्ष लोकांना, हस्तव्यवसायात ५.८ लक्ष लोकांना, व रेशीम धंद्यात ८.० लक्ष लोकांना अशा एकूण ६२.७ लक्ष लोकांना पूर्ण वेळ नाही, परंतु अर्धवेळ रोजगार मिळेल अशी अपेक्षा आहे. रोजगाराची ही उद्दिष्ट्ये साधण्याकरिता हातमागाचे उत्पादन ६० टक्क्यांनी, यंत्रमागाचे उत्पादन ३५ टक्क्यांनी, हस्तव्यवसायांचे उत्पादन ४५ टक्क्यांनी, रेशीमउत्पादन ७५ टक्क्यांनी, लघुउद्योगांचे उत्पादन चौपट आणि खादी व ग्रामोद्योगांचे उत्पादन जवळजवळ दसपट करण्याची योजना आहे. हे सगळे झाले म्हणजे त्याच्या अनुषंगाने अनेक किरकोळ व्यवसाय, व्यापार व सेवा यांत अपेक्षित आणखी कोटी-दीड कोटी लोकांना पुरेल एवढा जादा रोजगार निर्माण होणार आहे.

खादी-ग्रामोद्योग, हातमाग, हस्तव्यवसाय इत्यादींच्या विकासासंबंधीची ही शेखमहंमदी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेपासून चालू आहे. सहाव्या पंचयवार्षिक योजनेत त्याकरिता सुमारे एक हजार कोटी रुपये खर्चही पडावयाचे आहेत ते पडोत. परंतु बेकारी व रोजगाराचा प्रश्न त्यातून सुटणार आहे या भरवंशाने ही सारी योजना होत असल्याने चिंता वाटते.

हे झाले रोजगाराचे. दारिद्र्याचे काय? पूर्वी सांगितल्याप्रमाणे रोजगार हा निर्वाहक्षम असला पाहिजे हे तत्त्व फक्त अर्थव्यवस्थेच्या संघटित क्षेत्रातील रोजगारासच लागू आहे. ते असंघटित क्षेत्रास लागू नाही. सहाव्या पंचवार्षिक योजनेत नव्याने निर्माण होणारा रोजगार बहुतांशी असंघटित क्षेत्रातच होणार असल्याने ज्या कुटुंबाला पूर्ण रोजगार मिळेल अशा कुटुंबात न मिळवित्यांचा भार अवास्तव नसला तरी त्यातील सर्वांना किमान निर्वाह मिळून त्याचे दरिद्र्य नष्ट होईलच असे सांगता येत नाही. उदाहरणार्थ, सहाव्या पंचावार्षिक योजनेच्या आराखड्यानुसार सन १९८२-८३ साली अर्थव्यवस्थेत एकूण २३.१८ कोटी लोकांना पुरेल एवढ्या रोजगाराची गरज राहील. सहावी योजना फलद्रूप झाली तर त्या वर्षी एकूण २१.६३ कोटी लोकांना पुरेल एवढे काम उपलब्ध होईल, म्हणजे ९३.३ टक्के रोजगाराचा प्रश्न सुटेल. असे असूनही नियोजनमंडळाच्या अपेक्षेप्रमाणेही सन १९८२-८३ साली ३७.९५ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खालीच राहील. त्यापैकी काहींच्या दारिद्र्याचा प्रश्न रोजगाराने सुटणार नाही हे मान्य केले तरी बऱ्याच जणांना पूर्ण रोजगार मिळूनही त्यांच्या कुटुंबांचा निर्वाह भागत नाही असा त्याचा अर्थ होतो. दारिद्र्याची व्याख्या करताना नियोजनमंडळाने सन १९७६-७७ सालातील बाजारभाव लक्षात घेऊन किमान निर्वाहाकरिता दरमहा दर माणशी ग्रामीण भागात ६१.८ रुपये व नागरी भागात ७१.३ रुपये पाहिजेत असे ठरविले. घरातील १५ वर्षे व त्यावरील वयाच्या सर्व स्त्रियांनी घरकामाशिवाय सरासरी त्याच्या निम्म्याने काम करूनही जर सरासरी कुटुंबाचा आपणच ठरविलेला किमान निर्वाह भागत नसेल तर त्या पूर्ण रोजगाराचा अर्थ काय? आणि असला रोजगार निर्माण करण्याकरता नियोजनमंडळ कशाला हवे? पारावर बसून आकाशाकडे बघणारी माणसेही कामातच आहेत असे मानले म्हणजे झाले.

मात्र दारिद्र्यनिर्मूलनाबाबत नियोजनमंडळाने एक आश्वासन दिले आहे त्याचा उल्लेख केला पाहिजे. सहावी पंचवार्षिक योजना तिच्या आराखड्याप्रमाणे फलद्रूप झाली तर नियोजनमंडळ म्हणते की, जरी ३७.९५ टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेच्या खाली राहिली तरी ती फार खाली राहणार नाही. किमान निर्वाहाला जेवढे लागते

तेवढे जरी नाही तरी त्याच्या ७५ टक्के सर्वांना मिळेल. किमान निर्वाहाला दर माणशी दररोज दोन रुपये लागत असतील तर निदान दीड रुपया तरी सर्वांना मिळेल. तो कोण, कसा व केव्हा देणार ते नियोजनमंडळच जाणे. परंतु त्याबाबत नियोजनमंडळाची एवढी खात्री आहे की, ज्यांना आज दिवसाच्या निर्वाहाला दीड रुपयाही मिळत नाही त्यांना तो मिळू लागला म्हणजे या गरिबांच्या गरजा कोणत्या ते लक्षात घेऊन त्यांच्या उत्पादनाची योजनाही सहाव्या पंचवार्षिक योजनेत करून ठेवली आहे. शेतीचे विशेषत: अन्नधान्याचे जादा उत्पादन, खादी, ग्रामोद्योग, लघुउद्योग यांचा अनेकपटींनी विस्तार हे सारे प्रामुख्याने गरिबांना लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनाकरिता आहे. त्यातच गरिबांच्या रोजगाराचाही प्रश्न सुटतो हे सहाव्या पंचवार्षिक योजनेतील नियोजनाचे मुख्य सूत्र आहे.

हे सूत्र थोडेसे समजावून घेतले पाहिजे. बेकारीचा प्रश्न सोडवावयाचा तर भांडवलप्रधान उत्पादनतंत्रावर अवलंबून चालणार नाही. कारण एकतर अर्थव्यवस्थेत भांडवलाचा तुटवडा आहे आणि शिवाय भांडवलप्रधान उत्पादनतंत्राने उत्पादन वाढते त्या प्रमाणातही रोजगार वाढत नाही. तात्पर्य, बेकारीचा प्रश्न सोडवावयाचा तर श्रमप्रधान उत्पादनतंत्राची कास धरली पाहिजे. शेतजमिनीवर लोकसंख्येचा भार जेवढा जास्त, या सर्व लोकांत शेतजमिनीवर जेवढे समान वाटप तेवढे शेतीतील उत्पादनतंत्र श्रमप्रधान राहते. एवढ्याने भागले नाही तर शेतीच्या यांत्रिकीकरणावरही निर्बंध घालून उत्पादनतंत्र शक्य तेवढे श्रमप्रधान ठेवावे. औद्योगिक क्षेत्रात खादी, ग्रामोद्योग, हस्तव्यवसाय इत्यादी पारंपारिक श्रमप्रधान उद्योग आहेतच. काही आधुनिक उद्योग निर्माण करावयाचेच झाले तर ते लघू असावेत, म्हणजे त्यातील उत्पादनतंत्रही शक्य तेवढे श्रमप्रधान राहील. अशा रीतीने श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब केला म्हणजे उत्पादनवाढीच्या वेगापेक्षाही अधिक वेगाने रोजगार वाढतो. सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात आर्थिक विकासाचा म्हणजेच उत्पादनवाढीचा वेग दरसाल ४.७ टक्के ठेवूनही रोजगार दरसाल ५.३ टक्के वेगाने वाढेल अशी जी अपेक्षा केली आहे ती याच भरवशावर.

अशा रीतीने श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब करून रोजगाराचा प्रश्न सुटला. परंतु या श्रमप्रधान उत्पादनतंत्रातून जे उत्पादन होईल त्याला बाजारात मागणी राहीलच हे कशावरून? त्याला तशी मागणी राहिली नाही तर योजनेत कितीही घातले तरी ते उत्पादन होणार नाही. म्हणून याविषयी खात्री करून घेण्याकरिता नियोजनमंडळाने बरीचशी आकडेमोड करून असे शोधून काढले की, गरिबांच्या

दैनंदिन गरजांचे उत्पादन मध्यम व श्रीमंत वर्गाच्या गरजांच्या उत्पादनापेक्षा अधिक श्रमप्रधान असते. त्यात अधिक रोजगार मिळतो.

सहाव्या पंचवार्षिक नियोजनाचे मूलभूत सूत्र पूर्ण करण्याकरिता आता फक्त एकाच दुव्याची गरज राहिली. ती अशी की, पूर्ण रोजगार मिळाला तरी माणसे गरीबच राहिली पाहिजेत तरच श्रमप्रधान उत्पादन बाजारात खपेल. सुदैवाने श्रमप्रधान उत्पादनतंत्राने हेही आपोआपच साधते. श्रमप्रधान उत्पादनतंत्राचे हे वैशिष्ट्य आहे की, त्याने रोजगार मिळतो; परंतु त्या प्रमाणात उत्पादन होत नाही. त्यामुळे निर्वाहाकरिता श्रमप्रधान उत्पादनावरच अवलंबून असणारी माणसे गरीबच राहतात, दारिद्र्यरेषेच्याही खालचे जीवन जगतात. परंतु म्हणूनच या वर्गाने केलेले उत्पादन या वर्गातच खपते आणि नियोजनाचा प्रश्न सुटतो.

सहाव्या पंचवार्षिक योजनेतील नियोजनास मूलभूत असलेले हे सूत्र काहीशा विस्ताराने सांगितले, याचे कारण नियोजनमंडळासही ते बऱ्याच दीर्घ प्रवासानंतर सापडल्यासारखे दिसते. वास्तविक ते सोपे व सुपरिचित आहे ते असे. अविकसित अर्थव्यवस्थेत जेथे भांडवलाचा व उत्पादनाच्या साधनसंपत्तीचा तुटवडा आहे, लोकसंख्येचा भार फार आहे तेथे श्रमप्रधान उत्पादनतंत्राचा अवलंब करून म्हणजे साध्या भाषेत वर्षाचे ३६५ दिवस अहोरात्र कष्ट करून माणसे जगतात. परस्परांच्या गरजा भागवितात. या अर्थव्यवस्थेत प्रश्न रोजगाराचा नसतो, उदरनिर्वाहाचा असतो. येथे माणसे चोवीस तास खपतात, पण दोन वेळ पोटभर जेवत नाहीत.

अविकसित अर्थव्यवस्थेचे हे मर्म लक्षात घेऊन सहाव्या पंचवार्षिक योजनेची आखणी झाली आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत एक विकसित, विकसनशील संघटित क्षेत्र आणि दुसरे अविकसित, असमर्थ, लोकसंख्वेच्या वाढत्या बोजामुळे दारिद्र्याच्या गर्तेत अधिकाधिक खाली जाणारे असंघटित क्षेत्र असे दोन स्पष्ट विभाग आहेत. पैकी संघटित क्षेत्र आज लोकसंख्येच्या प्रमाणात फक्त दहा टक्के आहे. ते वाढले तरी लोकसंख्येची वाढ लक्षात घेता नजीकच्या भविष्यकाळात ते लोकसंख्येच्या प्रमाणात फारसे वाढण्याची शक्यता नाही. सबब आणखी कित्येक वर्षे बाकीची सुमारे नव्वद टक्के लोकसंख्या अविकसित, असंघटित क्षेत्रात बंदिस्त करून ठेवणे याखेरीज गत्यंतर नाही. या क्षेत्रात रोजगाराची व्यवस्था करता येईल. परंतु किमान निर्वाहाची हमी देता येणार नाही. कारण अविकसित अर्थव्यवस्थेत ते बसत नाही. विकसित, संघटित क्षेत्राची गोष्ट वेगळी आहे. तेथे रोजगार हा निर्वाहक्षम असलाच पाहिजे. इतकेच नव्हे तर या क्षेत्रातील भांडवलदार, कामगार, कर्मचारी व अन्य सारे

भागीदार या साऱ्यांचे राहणीमान उत्तरोत्तर सुधारले पाहिजे; कारण आर्थिक विकासाची ती प्रेरणा आहे. अर्थव्यवस्थेतील संघटित व असंघटित या दोन क्षेत्रांबाबत स्वीकारलेले हे दुटप्पी धोरण हा गेल्या तीस वर्षातील आर्थिक धोरणाचा, आर्थिक नियोजनाचा आशय आहे. सहाव्या पंचवार्षिक योजनेत त्याच धोरणाची 'री' पुढे ओढली आहे.

हा अर्थव्यवस्थेतील अंतर्गत वसाहतवाद आहे. हा वसाहतवाद गेली तीस वर्षे कमीअधिक सुप्त स्वरूपात अस्तित्वात होताच. सहाव्या पंचवार्षिक योजनेचे नावीन्य, वैशिष्ट्य आणि कौतुक हे की, या योजनेत या वसाहतवादाला आधुनिक अर्थशास्त्राचे अधिष्ठान देऊन, आकडेमोडीचे अवडंबर चढवून, नवे आर्थिक धोरण म्हणून त्याचा प्रच्छन्न पाठपुरावा केला आहे. म्हणून अर्थव्यवस्थेतील या अंतर्गत वसाहतवादाला तेवढ्याच स्पष्टपणे विरोध करण्याची वेळ आली आहे.

बेकारी व दारिद्र्य याचे निर्मूलन करून आर्थिक विषमता शक्य तितकी कमी करणे ही भारतीय आर्थिक नियोजनाची उद्दिष्टे प्रथमपासून आहेत. त्यात दारिद्र्याचे निर्मूलन हे प्रमुख उद्दिष्ट मानले पाहिजे. बेकारी नष्ट करणे, रोजगार देणे हे दारिद्र्यनिर्मूलनाचे साधन आहे, स्वतंत्र उद्दिष्ट नव्हे. आर्थिक विषमता कमी करणे हे आर्थिक विकासाचे स्वतंत्र उद्दिष्ट मानता येईल. परंतु आज तरी तेही दारिद्र्यनिर्मूलनाचे साधन आहे, मार्ग आहे. समाजातील दारिद्र्याच्या प्रश्नाला खरोखरी हा घालावयाचा असेल तर आजची विषमता बऱ्याच अंशी कमी करण्याखेरीज दुसरा मार्ग नाही. ही विषमता अर्थव्यवस्थेच्या असंघटित क्षेत्रात आहे तशीच संघटित क्षेत्रातही आहे. परंतु त्याहीपेक्षा संघटित क्षेत्र आणि असंघटित क्षेत्र या दोहोंमधली विषमता फारच विदारक आहे. ती कमी केल्याखेरीज दारिद्र्याचे निर्मूलन नजीकच्या भविष्यकाळात तरी शक्य नाही. गेल्या तीस वर्षात संघटित व असंघटित क्षेत्रांतील विषमता कमी न करता, किंबहुना संघटित क्षेत्राला यत्किंचितही धक्का न लावता दारिद्र्याचा सारा बोजा असंघटित क्षेत्रावरच टाकल्याने हा प्रश्न कायम क्षितिजावरच राहिला आहे, आणि सहाव्या पंचवार्षिक योजनेच्याही क्षितिजावरच राहणार आहे. आणि सहाव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात सरकत्या योजनेची एक कल्पना मांडली आहे. तिचा पुष्कळसा उपहास झाला. परंतु ती अगदीच अर्थशून्य नाही. दारिद्र्याच्या प्रश्नाच्या संदर्भात मात्र गेल्या तीस वर्षातील धोरणच पुढे चालू राहणार असेल तर हा प्रश्न कायमचाच या सरकत्या योजनेच्या सरकत्या क्षितिजावर राहील असे वाटते.

क्षणभर संघटित क्षेत्र, असंघटित क्षेत्र हा भेदाभेद बाजूस ठेवून सारी अर्थव्यवस्था, तिची उत्पादनक्षमता आणि तिजवरील लोकसंख्येचा एकूण भार याचा आपण विचार

करू. नियोजनमंडळाच्या अंदाजाप्रमाणे सन १९७७-७८ साली भारताची लोकसंख्या ६३.४२ कोटी होती. त्या सालचा राष्ट्रीय उत्पादनाचा अंदाज अजून प्रसिद्ध झालेला नाही. परंतु ते दरडोई एक हजार रुपये म्हणजे सुमारे ६३,४२० कोटी रुपये असा माझा अंदाज आहे. म्हणजे राष्ट्रीय उत्पादन दरडोई एक हजार रुपये आहे असे धरून चालू. ही झाली सरासरी. आता दारिद्र्यनिर्मूलनाचा प्रश्न काय आहे ते पाहू. नियोजनमंडळाने केलेल्या दोरिद्र्याच्या व्याख्येप्रमाणे किमान निर्वाहास १९७७-७८ च्या बाजारभावाप्रमाणे दरडोई दरमहा ग्रामीण भागात ६१.८ रुपये आणि नागरी भागात ७१.३ रुपये लागतात हे आधी सांगितलेच आहे. हिशेबाच्या सोईकरता ते महिना ६२.५ रुपये किंवा वार्षिक ७५० रुपये असे धरून चालू. नियोजनमंडळाच्या अंदाजाप्रमाणे सन १९७७-७८ साली ४६.३३ टक्के लोकसंख्या या दारिद्र्यरेषेच्या खाली होती. दारिद्र्यनिर्मूलनाकरिता या सर्व लोकसंख्येला आणि त्यावरच्या तीन-चार टक्के लोकसंख्येलाही म्हणजे थोडक्यात एकूण ५० टक्के लोकसंख्येला केवळ किमान निर्वाहाकरिता आवश्यक ते आर्थिक दरडोई फक्त ७५० रुपयेच द्यावयाचे म्हटले तर उरलेल्या ५० टक्के लोकसंख्येचे वार्षिक दरडोई उत्पादन फक्त १२५० रुपये राहते. आर्थिक विकासाकरिता जी काय लागते म्हणतात ती आर्थिक विषमता या पन्नास टक्के लोकसंख्येतच राहू शकेल. त्यांचे सरासरी वार्षिक उत्पन्न फक्त १२५० रुपये आहे हे लक्षात ठेवले म्हणजे अगदी वरच्या दहा टक्के लोकांचेही दरडोई वार्षिक उत्पन्न तीन हजारांच्या पुढे असू शकणार नाही हेही लक्षात येईल. तात्पर्य, देशातील ज्या कुटुंबांचे दरडोई वार्षिक उत्पन्न तीन हजार रुपयांच्या पुढे आहे ती सारी कुटुंबे देशातील दारिद्र्यास कमीअधिक प्रमाणात जबाबदार आहेत असे म्हटले पाहिजे. आर्थिक विकासाच्या वावड्या उडवून दारिद्र्याचा प्रश्न दृष्टीआड करावयाचा नसेल, तो निकडीने निकालात काढावयाचा असेल तर आवश्यक तर उत्पादनाच्या साधनसंपत्तीचे, परंतु निदान उत्पन्नाचे एवढ्या मोठ्या प्रमाणात फेरवाटप करावे लागेल.

हे फेरवाटप करण्याचा एक मार्ग म्हणजे, निर्वाहक्षम रोजगाराची हमी. नियोजनमंडळानेच ठरविल्याप्रमाणे १५ वर्षे व त्यावरील वयाचे सर्व पुरुष व १५ वर्षे व त्यावरील वयाच्या सरासरीने निम्म्या स्त्रिया कार्यक्षम समजल्या तर एकूण एकतृतीयांश लोकसंख्या कार्यक्षम ठरते. म्हणजेच सरासरीने एका कर्त्या माणसावर स्वत:सह तीन माणसांची जबाबदारी पडते. निर्वाहक्षम रोजगार द्यावयाचा तर त्याला मासिक ६२.५ x ३ = १८७.५ रुपये किंवा वार्षिक ७५० x ३ = २२५० रुपये उत्पन्न मिळाले पाहिजे. नियोजनमंडळाच्या निकषाप्रमाणे हे उत्पन्न २७३ दिवस रोजचे आठ

तास काम करून मिळवायचे असेल तर रोज आठ तास मजुरीचा दर आठ रुपयांच्या पुढे जातो. काही दिवसांपूर्वी राज्यशासनाने शेतमजुरीचे व रोजगारहमीच्या कामावरील मजुरीचे दर काहीतरी चार, साडेचार, पाच म्हणून जाहीर केले. त्याचे पुष्कळांना आश्चर्य वाटले. त्यांनी संघटित अर्थव्यवस्थेतील किती कामगारांना व कर्मचाऱ्यांना आठ रुपये रोजापेक्षा कमी मजुरी वा वेतन पडते याची चौकशी करावी. मग ग्रामीण भागात पाच रुपये देऊ केले तर आश्चर्य का वाटते?

शेतीपुरते बोलावयाचे तर शेतीवर एक कर्ता पुरुष आणि निम्मा वेळ काम करणारी एक कर्ती स्त्री आहे असे धरले तर अशा दीड मिळवत्या माणसांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २२५० x १.५ = ३३७५ रुपये झाले तर ते निर्वाहक्षम म्हणता येईल. महाराष्ट्रातील जिरायत जमिनीतून एवढे उत्पन्न काढण्याकरिता पंचवीस-तीस एकर जमीन असावी लागते, याची पुष्कळांस माहिती नाही. महाराष्ट्रात असे किती शेतकरी आहेत याची माहिती काढावी. खेरीज जिरायती शेतीचे हे उत्पन्न पाऊसपाण्यावर किती अवलंबून आणि त्यामुळे किती अनिश्चित आहे आणि साऱ्याच शेतमालाची बाजारात शेवटी काय किंमत होते याची कल्पना भांडवलदारांना नाही; तशीच पाऊस पडो न पडो महिन्याच्या महिन्याला पगार आणि भाववाढीनुसार महागाईभत्ता घेणाऱ्या कामगार, कर्मचारी आणि नोकरदारांना नाही. आज ९५ टक्के शेतकरी संघटित क्षेत्रातील सर्वात कनिष्ठ कामगार-कर्मचाऱ्यांपेक्षाही कनिष्ठ जीवन जगत आहे ही वस्तुस्थिती आहे.

या विषमतेविरुद्ध, या अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आजची गरज आहे. त्याखेरीज देशातील दारिद्र्याचा प्रश्न मार्गी लागणार नाही. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या या व्यासपीठावरून सर्व मराठी अर्थशास्त्रज्ञांना, अध्यापक-प्राध्यापकांना, आचार्य-प्राचार्यांना मी नम्रतापूर्वक आव्हान करतो की, त्यांनी या कामी सहकार्य द्यावे. पाश्चात्त्य इंग्रजी अर्थशास्त्राच्या मराठी भाषांतरात मराठी अर्थशास्त्रीय परिषद अडकून पडता कामा नये. तिने जिवंत मराठी अर्थशास्त्रीय लिखाणाने अवतीभोवतीच्या महाराष्ट्रातील आर्थिक प्रश्न मराठी माणसापर्यंत पोहोचविले पाहिजेत. तसे झाले तर या मराठी लिखाणाचे पडसाद इतर सर्व भारतीय भाषांतून उमटल्याखेरीज राहणार नाहीत.

(नागपूर येथे दि. २६ ऑक्टोबर १९७८ रोजी झालेल्या मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या दुसऱ्या वार्षिक अधिवेशनातील अध्यक्षीय भाषण)

(पूर्वप्रसिद्धी : अर्थसंवाद : ऑक्टोबर-डिसेंबर १९७८.)

पुरवणी

नव्या आर्थिक धोरणाची रूपरेखा

गेली चाळीस वर्षे अंगीकारलेले व प्रस्थापित झालेले आर्थिक धोरण आपण जसेच्या तसे ठेवणार नाही हे नव्या सरकारने सत्तेवर आल्याआल्याच स्पष्ट केले व या धोरणास मूलत: नवी दिशा देण्याचा इरादा प्रकट केला. नवीन धोरणाची दोन अंगे जाणवतात. एक म्हणजे अधिक मोकळीकीचे मुक्त औद्योगिक धोरण व दुसरे म्हणजे सर्रासपणे उच्च तंत्रज्ञानावर भर. पहिल्या धोरणाबद्दल एका गटाकडून नापसंती व्यक्त केली गेली तर एका गटाने या उदारमतवादाचे उत्साहाने व जल्लोषाने स्वागत केले हे समजण्यासारखे आहे. तंत्रज्ञानविषयक धोरणाच्या परिणामांच्या शक्याशक्यता अद्याप पुरेशा स्पष्ट झालेल्या नाहीत आणि औद्योगिक धोरणाच्या इतर अंगांचाही अद्याप उलगडा झालेला नाही. तरीही बाजारात्मक अर्थव्यवस्थेवरील श्रद्धा पुनरूज्जीवित करणारे नवे उदारमतवादी धोरण असा या बदलाचा अर्थ समर्थक व विरोधक दोन्ही गटांकडून लावला जात आहे.

२. जुने धोरण सोडताना एक गोष्ट नव्या सरकारला उपकारक ठरणारी आहे. धोरण आखणाऱ्यांपैकी बहुतेक (किमानपक्षी त्यांच्यातील प्रमुख लोक) तरुण आहेत, जुने धोरण तयार करणाऱ्यात ते नव्हते आणि त्या धोरणाच्या नंतरच्या जडण-घडणीतही त्यांचा वाटा नव्हता. त्यामुळे जुन्या धोरणात ते कुणाची भीड न बाळगता व बिनधास्तपणे बदल करू शकतील, जुने धोरण निकालात काढू शकतील. याहूनही महत्त्वाची गोष्ट म्हणजे जगभरच आज अशा प्रकारच्या बदलाचे वारे वाहात आहे.

३. हे वारे पूर्वेकडून वाहू लागले आणि तेथे स्थिरावले. ''महान कर्णधार'' माओच्या मृत्युनंतर चिनी नेतृत्वाने जुन्या धोरणास कौशल्याने नवे वळण दिले व चिनी अर्थव्यवस्थेची साचेबंदपणातून मुक्तता केली. चिनी नेते नवे नाहीत व तरूणही नाहीत हेच त्यांच्या विश्वासार्हतेचे गमक आहे. जुन्या धोरणाचे ते अंगभूत भाग होते. आणि जुन्या धोरणाची जडण-घडण आणि वळसे-वळणे या नेतृत्वाने जवळून

पाहिली आहेत. जुन्या धोरणाच्या बाबतीत सगळे आलबेल नव्हते व प्रतिक्रिया व फेरमांडणीस वस्तुनिष्ठ आधार व वाव होता एवढे निश्चित.

४. चीनमधील बदल प्रक्रिया सुरू झाल्यानंतरही बराच काळ सोविएट रशिया आपल्या परिस्थितीबद्दल चकार शब्द काढत नव्हता. या गुप्ततेमागे, खरी परिस्थिती उघड केल्यास पूर्व युरोपीय राष्ट्रांत काय प्रतिक्रिया होतील याबद्दलची साधार भीती असावी. ब्रेझनेव्ह यांच्या मृत्यूनंतर ही अळीमिळी गुपचिळी संपली. म्हाताऱ्या व आजारी आंद्रोपोव्ह यांनी जे दबल्या सुरात, सावधपणे म्हटले तेच आता तरुण गोर्बाचेव उघडपणे व स्पष्टपणे सांगत आहेत. गोर्बाचेव तरुण असले तरी सोविएट व्यवस्थेस उपरे खचितच नाहीत. त्यांनी ही व्यवस्था आतून व जवळून, शास्त्याच्या दृष्टिकोनातून पाहिली आहे. त्यांच्या राजकीय पालकांनी व्यवस्थाबदलाचे बाळकडू देऊनच देशातील सर्वोच्च पदाधिकारी होण्यासाठी त्यांना तयार केले आहे. यामुळेच, रशियातही, वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले असता बदलास वाव होता हे स्पष्ट आहे. याआधी, सोविएट पद्धतीच्या विकासामध्ये असमाधानकारकच नव्हे तर ईप्सिताच्या उलटच परिणाम करणाऱ्या (counter-productive) काही गोष्टीबद्दल पूर्व युरोपातून नाराजीचे सूर उमटले होते. पण या विरोधाची निष्ठुरपणे मुस्कटदाबी केली गेली होती. आता मात्र, हंगेरीसारख्या पूर्व युरोपीय देशांनी गेल्या पंधरा वर्षात विशेष गाजावाजा न करता घडवून आणलेल्या सुधारणांना पुष्टी मिळत आहे, त्यांचा उघड पुरस्कार केला जात आहे.

५. पश्चिम युरोपातील लोकशाही-समाजवादी व साम्यवादी गटांनी पश्चिमेतील खुल्या वातावरणात राहून सुरक्षित अंतरावरून या बदलांचा मागोवा घेतला. तेही आता डाव्यांच्या अत्याग्रही व हटवादी भूमिकेपासून दूर जात आहेत. इंग्लंडमधील प्रतिक्रिया तीव्रतर आहे. थॅचरबाईंचे अति उजवे सरकार ही त्याची साक्ष आहे. अमेरिकेतही रेगन यांच्या ध्येयधोरणांच्या बाजूने जनतेने पुन: कौल दिलेला आहे.

६. थोडक्यात सांगायचे झाल्यास, नियोजित अर्थव्यवस्था विरुद्ध बाजारात्मक अर्थव्यवस्था या सतत चालत आलेल्या वादात सध्यातरी, जगभरच बाजारात्मक अर्थव्यवस्थेकडे झुकते माप आहे. भारताच्या नव्या सरकारच्या नव्या धोरणाला हा वैश्विक संदर्भ प्रेरणादायी ठरला आहे असे दिसते. उदा. आपल्या रशिया-भेटीसंबंधी वार्ताहरांशी बोलताना पंतप्रधानांनी बोलून दाखवले की, मागास तंत्रज्ञान व जखडून टाकणारी नोकरशाही या दोन्ही अर्थव्यवस्थांना भेडसावणाऱ्या सामायिक प्रश्नांवर गोर्बाचेव व आपण चर्चा केली. त्या आधी, नवीन उदारमतवादी धोरणांच्या पुष्ट्यर्थ अर्थमंत्र्यांनी चिनी नेत्यांच्या विधानांचा आश्रय घेतला.

७. हा जागतिक संदर्भ जरी अगदीच अप्रस्तुत नसला तरी, आपल्या व जागतिक परिस्थितीतील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. नियोजित अर्थव्यवस्था विरुद्ध बाजारात्मक अर्थव्यवस्था या वादाच्या मुळाशी 'काय उत्पादन करायचे हे कुणी ठरवयायचे' हा प्रश्न आहे. बाजारात्मक अर्थव्यवस्थेमध्ये कशाचे आणि किती उत्पादन करायचे हे 'बाजार' (म्हणजेच एका विशिष्ट पद्धतीने वितरित समग्र क्रयशक्ती) ठरवतो. आणि ज्यांच्याकडे आवश्यक ती क्रयशक्ती आहे त्यांच्याकडून या मालाचा उठाव होतो. खरे तर, त्यांच्या सौद्याबरहुकूमच उत्पादन झालेले असते. तत्त्वत: स्पर्धेचे राज्य असते. स्पर्धात्मक व्यवस्थेत उत्पादनातील कार्यक्षमतेस वाव असतो आणि कमी कार्यक्षम उत्पादक उत्पादनचक्राबाहेर फेकले जातात. मात्र याचाच पूरक सिद्धांत (corollary) म्हणजे ज्यांच्याकडे क्रयशक्ती आहे त्या ग्राहकांना स्पर्धात्मक व्यवस्थेत अग्रक्रम मिळतो व ज्यांच्याकडे क्रयशक्ती नाही ते अक्षरश: खड्यासारखे बाहेर फेकले जातात.

८. समाजवादी देशांचा आपल्या नियोजित अर्थव्यवस्थेविषयी भ्रमनिरास झालाय हे निर्विवाद. परंतु सुदैवाने ह्या देशांच्या अर्थव्यवस्था आज विकासाच्या ज्या टप्प्यावर उभ्या आहेत त्या टप्प्यात 'नियोजित अर्थव्यवस्थेकडून बाजारात्मक अर्थव्यवस्थेकडे' अशा संक्रमणाची कल्पना करणे शक्य आहे. आपल्या अर्थव्यवस्थेचे काटेकोर व प्रसंगी निष्ठुर व्यवस्थापन करून समाजवादी देशांनी क्रयशक्ती विभागणीचा प्रश्न सोडवलेला आहे. समाजवादी देशातील प्रत्येक माणसाकडे आज स्वत:च्या मूलभूत गरजा भागविण्याइतकी क्रयशक्ती आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर अर्थव्यवस्थेचे बाजारीकरण करून उत्पादनक्षमता वाढवण्याच्या प्रयत्नात कुणावरही उपाशी मरायची पाळी येणार नाही. तरीही अर्थव्यवस्थेच्या बाजारीकरणामुळे चालू उत्पन्न-विभागणीचा विपर्यास होत नाही ना अगर उत्पन्न-विभागणीच्या सध्याच्या साच्याची उलटापालट होत नाही याकडे त्यांनी लक्ष पुरवले पाहिजे. पश्चिमेतील लोकशाही देशांनी समृद्धी व कल्याणकारी राज्य संकल्पनेच्या आधारे क्रयशक्ती वितरणाचा/विभागणीचा प्रश्न सोडवला आहे. त्यांच्याकडेही सर्वांच्या किमान गरजा पुरवल्या जाण्याची शाश्वती आहे. म्हणून आपल्या अर्थव्यवस्थांमध्ये बाजारावर अधिक भर देण्याने काही चांगले निष्पन्न होईल का याचा पश्चिमी देश आज विचार करू शकतात.

९. दुर्दैवाने आपली गोष्ट वेगळी आहे. सर्वांच्या किमान गरजा पुरवल्या जाव्यात यासाठी आवश्यक ती उत्पन्न-विभागणी तयार होण्यासाठी जी कडक धोरणे

अवलंबायला हवी ती आपण अवलंबिली नाहीत. उदार धोरणांचा अवलंब करून व सामाजिक सुरक्षेचा (Social security) वापर करून सर्वांच्या किमान गरजा भागवणेदेखील आपल्याला परवडणार नाही. समाधानाची बाब एवढीच की आपण आज जे काही मिळवले आहे ते आपल्या राज्ययंत्राचे लोकशाही ताणेबाणे (Fabric) अबाधित राखून. ही अर्थातच क्षुल्लक बाब नव्हे. परंतु बाजारात्मक अर्थव्यवस्थेवर कुठलेही नियंत्रण न ठेवल्यास, सर्वांकडे आपल्या किमान गरजा भागवण्याइतकी क्रयशक्ती राहील अशी उत्पन्न-विभागणी आपण आजमितीला घडवू शकलेलो नाही ही गोष्ट तितकीच खरी आहे. किंबहुना आपल्या जनतेपैकी एक मोठा गट निरंकुश बाजारात्मक अर्थव्यवस्थेत उपाशी मरेल हे उघड आहे. बाजारात्मक अर्थव्यवस्था उत्पादनातील कार्यक्षमता कदाचित वाढवेलही, पण स्पर्धेला तोंड देण्याची क्षमता नसलेल्या मोठ्या गटाचे खूपच नुकसान होईल. 'आपण अधिक उदार धोरण अवलंबणे व बाजारात्मक अर्थव्यवस्था स्वीकारणे अपरिहार्य असेल तर तसे केलेच पाहिजे; परंतु समाजवादी व पश्चिमी अर्थव्यवस्थाही हाच मार्ग चोखाळत आहेत' अशी स्वत:ची पाठ थोपटून घेण्यात अर्थ नाही. त्यांच्या व आपल्या संदर्भात्मक परिस्थितीत प्रचंड फरक आहे.

१०. आपल्या बाबतीत नियोजित अर्थव्यवस्थेकडून बाजारात्मक अर्थव्यवस्थेकडे जाण्याची कारणे वेगळी आहेत. नियोजनामुळे बाजारात्मक अर्थव्यवस्थेकडे जाण्याजोगी परिस्थिती निर्माण झालेली आहे. याउलट, ह्या संक्रमणाची पूर्वतयारी करण्यात नियोजन अपयशी ठरले आहे. किंबहुना, त्याचा उलटाच परिणाम होत आहे. नव्या सरकारचा ज्याच्यावर भर आहे त्या औद्योगिक धोरणाचेच बघा ना! जुने औद्योगिक धोरण दुपदरी/दुहेरी (two-pronged) होते. पहिले, सार्वजनिक क्षेत्राचे वर्चस्व निर्माण करणे व दुसरे म्हणजे खाजगी क्षेत्राचे नियंत्रण. सार्वजनिक क्षेत्राने अर्थव्यवस्थेच्या मोक्याच्या वा निर्वाणीच्या जागा (commanding heights) काबीज कराव्यात अशी अपेक्षा होती. याबरोबरच, या उद्योगांमधून जो वाढावा निर्माण होईल तो विकासकार्यात गुंतवता येईल अशीही कल्पना होती. यामुळे करांमध्ये फार वाढ न करता विकासाचा वेग वाढवता आला असता. या दुसऱ्या आघाडीवर तर कामगिरी फारच निराशाजनक आहे.

११. सध्या २००च्या वर उद्योग सार्वजनिक क्षेत्रात आहेत. एकूण भांडवली गुंतवणूक ४०,००० कोटी रुपयांच्यावर आहे. ८३-८४ मध्ये त्यांचा कर-पूर्व नफा १५०० कोटी रु. म्हणजे एकूण गुंतवणुकीच्या चार टक्क्यांपेक्षाही कमी होता.

याहून महत्त्वाचे म्हणजे एकट्या, तेल व नैसर्गिक वायु महामंडळाने १६०० कोटी रु. फायदा मिळवला. नऊ इतर उद्योग फायद्याचे होते. ते म्हणजे ऑईल इंडिया इंडियन ऑईल, भेल, राज्य व्यापार महामंडळ, न्येवेली लिग्नाईट, सेंट्रल कोलफील्डस, राष्ट्रीय केमिकल्स, एअर इंडिया व इंडियन एअरलाईन्स. या नऊ उद्योगांचा एकूण करपूर्व नफा सुमारे १००० कोटी रु. होता. या सर्व उद्योगांना नियंत्रित किमतीचा फायदा मिळतो. उरलेले सर्व उद्योग (१९०) तोट्यात होते. त्यांचा तोटा सुमारे ११०० कोटी रु. होता. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना येणाऱ्या तोट्याची आतापावेतो वेगवेगळ्या पद्धतीनी मीमांसा झाली आहे आणि बऱ्याच सबबीही सांगितल्या गेल्या आहेत. त्या पटण्यासारख्या नाहीत. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांच्या व्यवस्थापनात काहीतरी हुकते आहे नक्की.

१२. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करावे असा एक विचारप्रवाह आहे. सरकार इतके नाऊमेद झाले नसेल अशी आशा आहे. सार्वजनिक क्षेत्राचे व्यवस्थापन सुधारणे शक्य आहे. किमान तसे मूलगामी प्रयत्न करणे आवश्यक आहे. दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. राजकीय नियंत्रण व ढवळाढवळ कमीतकमी ठेवणे हे एक व स्पर्धा-रहित परिस्थितीतील कामगिरीचे मूल्यमाप करण्यासाठी निकष तयार करणे हे दुसरे. चांगल्या कामगिरीची कदर केली गेली पाहिजे आणि असमाधानकारक कामगिरीबद्दल दंडन. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात मिळून हे दोन्ही करता येईल इतकी गुणवत्ता व अनुभव निश्चित आहे. गंभीरपणे प्रयत्न मात्र केला गेला पाहिजे. वाढती, हताशतेची भावना घालवावयाची असेल तर लवकरात लवकर खुली चर्चा व सल्लामसलत सुरू झाली पाहिजे.

१३. खाजगी क्षेत्राचे नियंत्रण हे सध्याच्या औद्योगिक धोरणाचे दुसरे अंग आहे. उत्पादनाला ईप्सित दिशा देणे हा नियंत्रणांचा उद्देश असतो. खऱ्याखुऱ्या समाजवादी नियोजित अर्थव्यवस्थेत उपलब्ध साधनसामग्रीच्या मर्यादा व सामाजिक इष्टतेचा विचार करून उत्पादन लक्ष्ये ठरविली जातात. अर्थात सामाजिकदृष्ट्या इष्ट असेल त्यालाच बाजारात मागणी असेल असे नाही. या दोन्हीत फरक असल्यास मागणी-नियंत्रण करावेच लागते. नियोजित विकासाच्या प्राथमिक टप्प्यात जे उत्पादित झाले आहे ते नि तेवढेच वापरले जाईल हे बघावे लागते. जनतेच्या मूलभूत गरजा भागवणे हे उद्दिष्ट असते (आणि हे उद्दिष्ट योग्यच आहे). आणि त्यामुळे काही ठराविक दर्जाच्या अत्यावश्यक वस्तूंचे उत्पादन केले जाते. निवडीला फारसा वाव नसतो. चीनने हेच केले असे सांगण्यात येते. अशा परिस्थितीत मागणीचे व्यवस्थापन

(demand management) अवघड असते. परंतु अशक्य नव्हे. उत्पादक वस्तूंची संख्या व प्रत्येक वस्तूंतील विविधता वाढत गेल्यावर मागणी व्यवस्थापन अधिकाधिक अवघड बनत जाते. सामाजिकदृष्ट्या काय इष्ट (socially desirable) आहे ह्याची व्याख्या करणे गुंतागुंतीचे होत जाते. तपकिरी बूट चांगले की काळे हे ठरविणे अवघड असते आणि नियोजनकारांना जे इष्ट वाटते ते लोकांच्या गळी उतरवणेही कठीण जाते. साधकबाधक विचारांती बाजारामार्फत निवडीला वाव देण्याची सुरुवात करणेच सोपे पडते. समाजवादी देशातील नियोजनाचा हा अनुभव आहे.

१४. आपण आपल्या देशात इष्टानिष्टता विचारात घेऊन उत्पादन लक्ष्ये ठरवीत नाही. अंतिम उपभोगासाठीच्या मागणीचा अदमास घेऊन ही लक्ष्ये ठरविली जातात. तद्नंतर आदान-प्रदान सारणीच्या साह्याने आंतर-उद्योग मागणी भागवून ह्या लक्ष्यांची पूर्तता करील असे एकूण उत्पादन किती असावे हे काढले जाते. तत्त्वत: हे तंत्र व यंत्रणा सोपी आहे. जसजशी वस्तूंची संख्या वाढत जाते तसतशी आकडेमोडीतील क्लिष्टता वाढते. आपण सध्या फक्त २५० x २५० सारणी घेतो; म्हणजे २५० वस्तुगटात सर्व वस्तूंची विभागणी करतो. ही संख्या एकूण वस्तूंच्या मानाने फारच लहान आहे हे उघड आहे. चाळीस वर्षापूर्वीच्यां तुलनेत आपली औद्योगिक संरचना आता कैकपटीने अधिक गुंतागुंतीची अधिक मोठी व वैविध्यपूर्ण आहे. उत्पादनाची लक्ष्ये अर्थपूर्ण व्हायची असतील तर हजारो वस्तुगट विचारात घेतले पाहिजेत. गणकयंत्राच्या साह्याने अशा विस्तृत मानाची आदान-प्रदान आकडेवारी हाताळणे आता शक्य आहे; परंतु उत्पादनाच्या परिस्थितीत निर्हेतुक व योगायोगाने घडून येणाऱ्या बदलांबद्दलची माहिती गणकयंत्रापर्यंत पोहोचायला जो वेळ लागतो त्यात खरी मेख आहे. बऱ्याच वेळा ही माहिती पोहोचून नवी लक्ष्ये तयार होईपर्यंतच, ती लक्ष्ये जुनी आणि म्हणून गैरलागू (outdated) ठरतात आणि तरीही नोकरशाहीने जर तीच लक्ष्ये लादण्याचा अट्टहास केला तर अर्थव्यवस्थेच्या सुरळीत चालण्यात व कार्यक्षमतेत त्यांचा अडथळाच होऊन बसतो. गुंतागुंतीची औद्योगिक रचना असणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या नियोजनात केंद्रित नियोजन निष्प्रभ ठरते कारण प्रत्यक्ष उत्पादनापासून ते स्थळकाळाच्या संदर्भात कित्येक योजने दूर असते. रशिया व इतर समाजवादी देशांच्या हे लक्षात आले आहे. आणि ह्यामुळे निर्णयप्रक्रिया विकेंद्रित करणे व बाजार व बाजारी निकष वापरून कार्यक्षमतेला प्रोत्साहन देणे व कार्यक्षमतेचे मूल्यमापन करणे हा मार्ग ते स्वीकारू लागले आहेत.

१५. आपल्याकडे, या उत्पादन लक्ष्यांना चिकटून राहण्यासाठी अजून एक महत्त्वाचे कारण देता येईल. वर सांगितल्याप्रमाणे ही लक्ष्ये सामाजिकदृष्ट्या इष्टतेचा विचार करून नव्हे तर बाजारातील भावी मागणीचा अंदाज घेऊन ठरवली जातात त्यामुळे तत्त्वत: त्यांच्यात व उद्योगधंदे स्वत:साठी जी लक्ष्ये ठरवतात त्यांच्यात काहींच फरक नाही. जास्तीत जास्त एवढेच म्हणता येईल की नियोजनकारांची लक्ष्ये अधिक सर्वसमावेशक व परस्पर संबंध आकडेवारीवर आधारित असल्याने सरस असतात पण म्हणून ही लक्ष्ये परमपवित्र वा शास्त्रपूत (sacrosanct) आहेत असे समजणे म्हणजे आपल्याकडील पुरेसे विकेंद्रित नसलेले प्रतिमान व माहिती संकल्पनातील त्रुटी या सत्याकडे डोळेझाक करणे ठरेल. अशा परिस्थीत नियोजनकारांनी ही लक्ष्ये काढून ती उद्योगधंद्यांवर लादण्यापेक्षा फक्त ती लक्ष्ये सुचविणे जास्ती संयुक्तिक होईल. फ्रेंचांच्या निर्देशात्मक नियोजनाचे हेच सूत्र आहे.

१६. समाजवादी अर्थव्यवस्थेतील एक-केंद्री नियोजन पद्धतीच्या अंमलबजावणीमधील अडचणी एकवेळ सोडून दिल्या तरी या पद्धतीमुळे नोकरशाहीचा जो वरचष्मा होतो व नोकरशाहीच्या ताब्यात अर्थव्यवस्था जाते याचे लोकशाही समाजात गंभीर परिणाम संभवतात. औद्योगिक उत्पादनास इच्छित दिशा देणे हे खाजगी क्षेत्र नियंत्रणाचे एक उद्दिष्ट असल्याचा वर उल्लेख केलाच आहे. बड्या उद्योगधंद्यांना राजकीय वर्चस्व प्रस्थापित करू न देणे हा खाजगी क्षेत्र नियंत्रणामागे दुसरा उद्देश असतो. प्रत्यक्षात, खाजगी उद्योगधंद्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नांचे बरोबर उलटे परिणाम दिसून येतात. एखादे लोकशाहीवादी सरकार जो जो बड्या उद्योगांवर नियंत्रण घालू पाहाते, तो तो ते बड्या उद्योगांच्या आहारी गेलेले आढळते. दिवसा बड्या उद्योग समूहाचे प्रतिनिधी मंत्र्यांना व सरकारी सचिवांना भेटायला येतात; तर रात्री हीच वाहतूक उलट्या दिशेने चाललेली दिसते. प्रत्येक नियम व नियंत्रण बड्या उद्योजकांना जणू राजकारणी व नोकरशहांना भेटायसाठी नवीन संधी उपलब्ध करून देत असते, ह्या भेटींनी सारी व्यवस्थाच आज भ्रष्टाचाराने सडून गेली आहे.

१७. नियमन व नियंत्रणाच्या या राज्याचा अभावितपणे आणखीही एक परिणाम होतो. आंतरराष्टीय स्पर्धेपासून एतद्देशीय उद्योगांचे रक्षण करण्याचे उद्दिष्ट साध्य होते. परंतु देशांतर्गत स्पर्धेलाही आळा बसतो. (सरकारी नियंत्रणे पार करण्याची) अडथळ्यांची शर्यत न जिंकू शकल्याने नव्याने व्यवसायात येणारा व लहान उद्योजक यांचा काही क्षेत्रात शिरकावच होऊ शकत नाही. बड्यांना गुप्त खलबते, कट-कारस्थाने करून स्पर्धेच्या तत्त्वास धाब्यावर बसविता येते. त्यामुळे खर्चिक, अधिक खर्चाची अकार्यक्षम औद्योगिक संरचना तयार होते.

१८. अर्थव्यवस्थेतील स्पर्धा अबाधित राखण्यासाठी एम.आर.टी.पी. कायद्याची योजना केलेली आहे. ही नियंत्रणाची कल्पना ग्राह्य असली तरी भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेत लागू करताना असायला पाहिजे तो रेखीवपणा वा सुस्पष्टता या कायद्यात नाही. औद्योगिक संस्थेच्या तंत्रज्ञान वापरावर आकारमानापरत्वे मर्यादा पडतात. त्यामुळे एखाद्या उद्योगसंस्थेच्या बाजारातील वाट्यावर (market-share) कमाल मर्यादा घालणे म्हणजेच त्या संस्थेच्या सध्याच्या व संभाव्य तंत्रज्ञान वापरावर बंधने घालणे असाच अर्थ निदान विकसनशील अर्थव्यवस्थेत होतो. (कारण विकसनशील अर्थव्यवस्थेत बाजाराची व्याप्तीच कमी असते.) तसेच जर देशातील उद्योगांस आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक (competitive) बनवायचे असेल तर 'एकूण बाजाराच्या तुलनेत आकारमान' या संकल्पनेचे संदर्भ बिंदू बदलतात. एम.आर.टी.पी. कायद्याची अंमलबजावणी करताना या मुद्द्यांचा पुरेसा विचार न झाल्याने अनेक औद्योगिक संस्थांना अकार्यदक्ष आणि छोट्या आकारावर समाधान मानावे लागले आहे व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यामुळे त्या उभ्या राहू शकत नाहीत.

१९. वरील मुद्दे पाहता, औद्योगिक धोरणाची दिशा बदलणे किती तातडीचे व अत्यावश्यक आहे हे अजून स्पष्ट करायची गरज नाही. या दिशाबदलाची सुरवात करून सरकारने एक स्वागतार्ह पाऊल उचलले आहे.

२०. औद्योगिक धोरणाचा दुसरा आधार उच्च तंत्रज्ञानावर भर असा दिसतो. तंत्रज्ञानविषयक प्रगती ही विकास व वाढीचा मूलाधार आहे, त्यादृष्टीने उच्च तंत्रज्ञानावर भर स्वगतार्हच आहे. परंतु, उच्च तंत्रज्ञान म्हणजे काय व काय गतीने उच्च तंत्रज्ञान आणता आणि वापरता येईल याविषयीच्या एक प्रकारच्या भाबड्या स्वप्नरंजनात नियोजनकार मशगूल आहेत ही चिंतेची बाब आहे. कुठल्याही क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या विकासाचे स्थूलमानाने तीन टप्पे असतात. प्रथमत: एखादे उत्पादन वा उत्पादनप्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य आहे की नाही हे ठरवावे लागते; त्यानंतर ती प्रक्रिया व्यापारी पायावर टिकणारी (commercially viable) आहे का ते बघावे लागते आणि मग तिचा व्यापारी उपाययोजन अनुप्रयोग होतो. प्रगत उद्योगप्रधान अर्थव्यवस्थांमध्ये देखील एखाद्या प्रक्रियेबाबत हे तीनही टप्पे पार पडायला जवळजवळ दशक लोटते हे येथे लक्षात घेतले पाहिजे. पहिल्या व्यापारी उपयोजनांनंतरदेखील प्रक्रियेचे सार्वत्रिकरण होण्यातही काळ लोटतोच. उद्योगातील बहुसंख्य मोठ्या व्यापारी संस्था ही प्रक्रिया वापरायला लागायला अजून दहा वर्षे लागतात व जुनी प्रक्रिया रद्दबादल करायला आणखी दहा. थोडक्यात नव्या प्रक्रिया जुन्या प्रक्रियांची

जागा घेतात पण अत्यंत धिम्या गतीने. एखादी नवी प्रक्रिया आपलीशी करण्याची उद्योगांची गती किती आहे यावर तंत्रज्ञानविकासाचा वेग ठरत नसतो; तर किती वेगाने नवनवीन प्रक्रिया शोधल्या जातात यावर हा वेग अवलंबून असतो. पहिल्या नवीन प्रक्रिया औद्योगिक चक्रात पूर्णपणे सामावल्या जायच्या आतच आणिक नवीन प्रक्रिया उदयास आल्या पाहिजेत. एकाच उद्योगाच्या विविध शाखांमध्ये आणि विविध उद्योगांमध्ये नवीन प्रक्रियांचे, नवीन उत्पादनांचे पेव फुटायला पाहिजे, तेव्हा तंत्रज्ञान विकासाचा वेग वाढतो. तंत्रविकास अंत:प्रेरणेने (indigniously) होत जातो.

२१. आपला तांत्रिक विकास पूर्णत: अंत:प्रेरणेने होणार नाही हे तर खरेच पण अनेक उत्पादनप्रक्रियांची तांत्रिक व्यवहार्यता व व्यापारी टिकाऊपणा उद्योगप्रधान देशात सिद्ध झालेला आहे; त्याचा आपल्याला आयता फायदा मिळेल. या प्रक्रिया औद्योगिक देशात रुजल्या आहेत. सामावून गेल्या आहेत. आपल्याला फक्त निवडक प्रक्रिया उचलून आपल्याकडील उद्योगात रुजवायच्या आहेत. यांतल्या कुठल्या प्रक्रिया निवडाव्यात? सध्या सर्वोत्तम, सर्वात अलिकडील व सगळ्या अद्ययावत (up-to-date) प्रक्रिया निवडाव्यात हा विचार प्रबळ आहे. यामुळे आपण औद्योगिक देशांची बरोबरी करू शकू अशी भावना आहे. दुर्दैवाने यात खूप अडचणी आहेत. पहिली म्हणजे तांत्रिक व्यवहार्यता व व्यापारी समर्थता यात महद् अंतर आहे. व्यापारी समर्थता बाजारपेठेच्या व्याप्तीवर अवलंबून असते, आणि गरीब देशात बाजारपेठ संकुचित/लहान असते. विशेषत: आपण उच्च-मध्यमवर्गीयांसाठीच्या वस्तूंचा विचार करत असलो तर ही बाजारपेठ फारच लहान आहे. (त्या वर्गाचे राहणीमान प्रगत देशातील सरासरी राहणीमानाच्या तुलनेतही जास्त आहे). म्हणूनच अद्ययावत तंत्रज्ञान निवडताना अटळपणे निर्यात बाजारपेठ शोधावी लागते. त्यातून तांत्रिक अवलंबनच नव्हे तर बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वर्चस्वही वाढते. दुसरे म्हणजे कुठल्याही नवीन तंत्रज्ञानास संबंधित क्षेत्रातील इतर सुसंवादी तंत्रज्ञानाची (consonant technologies) मदत मिळावी लागते. जेव्हा तंत्रज्ञानविकास अंत:प्रेरणेने होत असतो तेव्हा अशा इतर तंत्रज्ञानाचा विकास क्रमाक्रमाने आणि आपसूक होतो. जेव्हा तंत्रज्ञान आयात केले जाते तेव्हा ही साह्यकारी तंत्रज्ञानेही आयात करावी लागतात. एका क्षेत्रात परकीयांशी सहकार्य केले (collaboration) की त्यातून हजारो इतर सहकार्य उद्‌भवतात; त्यातून तांत्रिक परावलंबन मात्र वाढीस लागते. तिसरे म्हणजे नवीन तंत्रज्ञानाच्या रुजवणूकीसाठी पूरीक तांत्रिक व व्यवस्थापकीय मनुष्यबळ लागते. इतरांचे अनुकरण करण्यासाठी व इतरांनी वापरलेली तंत्रज्ञाने

आपण वापरण्यासाठीदेखील संशोधन करावेच लागते; पूर्वप्रतिमान (prototype) तयार करणे, नमुना उत्पादन, प्रत्यक्ष उत्पादन करणे व अखेरीस उत्पादनाच्या विपणनाची सुरुवात करणे यासाठीही अनुनियोजित संशोधनाची आवश्यकता असते. याकरिता नुसते तांत्रिक व व्यवस्थापकीय मनुष्यबळ पुरत नाही तर उच्चप्रतीच्या शास्त्रज्ञांची आवश्यकता भासते. दैवदुर्विलास असा की आपल्याकडे अशा प्रकारचे मनुष्यबळ इतके अमाप आहे की त्यातले अनेक तरुण आज देश सोडून जात आहेत. त्यांच्या गुणांना येथे वावच नाही.

२२. म्हणूनच ज्यांच्यासाठीची पूरक तंत्रज्ञाने देशात तयार करता येतील व ज्यांच्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा वापर करता येईल अशाच तंत्रज्ञानांची आयात केली पाहिजे. सगळ्यात अद्ययावत तंत्रज्ञानाचा हव्यास धरल्यास या मुद्द्याकडे डोळे–झाक होते. ''सब–कुछ तयार'' पायावर (turn-key-basis) तंत्रज्ञाने आयात करणे सर्वात वाईट कारण त्यामुळे पूरक–तंत्रज्ञानाचा देशांतर्गत विकास व उपलब्ध कौशल्य व ज्ञानाच्या वापराची शक्यता मुळातच वगळली जाते. ''सबकुछ तयार'' प्रकारच्या आयातीमुळे कदाचित थोड्या कमी पैशात व जरा कमी वेळात उत्पादन सुरू होते. परंतु या तात्पुरत्या फायद्यापायी आपण पूरक तंत्रज्ञानविकासाची एक महागडी संधी हातची घालावून बसतो. एका क्षेत्रात सुरू झालेला तंत्रज्ञानविकास साठत जाईल, पसरेल वेग पकडील या व अशा शक्यता मुळातच नाकारतो. मुद्दा पुरेसा स्पष्ट झाला नसेल तर एक उदाहरण घेऊ. भारत सरकारच्या व्यवस्थापनासाठी सब–कुछ–तयार पायावरील जागतिक निविदा मागवता येईल. एखादी अमेरिकन, जपानी वा जर्मन बहुराष्ट्रीय कंपनी हे काम (सध्याच्या, सरकारच्या तुलनेत) अधिक चांगल्या प्रकारे व कमी खर्चात करू शकेलही. पण मग ते आपले सरकार राहणार नाही.

२३. तंत्रज्ञान आयातीस परकीय चलनही लागते. उच्च तंत्रज्ञान आयात करून आपण अ–पारंपारिक वस्तूंच्या निर्यातीस पुष्टी देऊ शकू असा एक आशावाद काहींच्या मनात आहे. यामुळे आपण आयातीवर केलेला खर्च भरून काढून वर काही मिळवू असे त्यांना वाटते. अशा प्रकारच्या निर्यातावर आधारलेले म्हणजे निर्यातानुवर्ती वाढीचे म्हणून द. कोरियाचे उदाहरण नेहमी घेतल जाते. कोरियाची प्रगती विस्मयजनक आहे यांत वादच नाही. मात्र दोन गोष्टी ध्यानात घेतल्या पाहिजेत. पहिले म्हणजे १९६५ पासून म्हणजे २० वर्षे कोरिया त्या धोरणाचा अवलंब करीत आहे. या २० वर्षात अर्थ व्यवस्थेची नेत्रदीपक वाढ झाली असूनही कोरियाला दरवर्षी आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठीच तूट येते आणि आपल्या आकारमानाच्या

मानाने कोरियावरील आंतरराष्ट्रीय कर्जाचा बोजाही पुष्कळच आहे. आणि, दुसरे म्हणजे, जरी आपण आयात खर्च भागवून वर काही उरेल इतपत निर्यात वाढवू शकलो तरी अशा निर्यातवाढीमुळे काही विकसित प्रांत तेवढे तयार होतील. समग्र अर्थव्यवस्थेत त्याचे फायदे झिरपू शकणार नाहीत. हे प्रांत देशांतर्गत अर्थव्यवस्थेपेक्षा वैश्विक, जागतिक अर्थव्यवस्थेला जास्ती जवळचे ठरतील. काही क्षेत्रातील विकासाचे फायदे सर्वत्र झिरपायला भारत काही कोरिया इतका चिमुकला वा कमी लोकसंख्येचा देश नव्हे. याचा अर्थ आपण कुठलेच तंत्रज्ञान आयात करू नये वा अ-पारंपारिक वस्तूंची निर्यात वाढवायचा प्रयत्नच करू नये असा नव्हे. फक्त गैरलागू उदाहरणांच्या आधारे स्वत:ची दिशाभूल करू नये एवढाच इशारा द्यायचा होता.

२४. सध्या 'ताबडतोब परिणाम पाहिजेत' अशा प्रकारचा अधीरेपणाचा आविर्भाव सर्वत्र दिसतो. अधीरेपणा समजू शकतो पण त्यामुळे व्यापक आखणीऐवजी तुकड्यातुकड्याने (piecemeal) धोरणांचा विचार केला जात आहे. अगदी मामुली परंतु प्रातिनिधिक उदाहरण घेऊ. सरकारने सुट्टे पैसे / मोड आयात करायचे ठरवले आहे. आता मोडीची चणचण काही दुष्काळी वर्षात धान्याची चणचण जाणते त्याप्रमाणे एका वर्षात वा काही महिन्यात निर्माण झालेली नाही. गेल्या काही वर्षात चणचण हळूहळू जाणवू लागली व वेळीच कृती केली असती तर या प्रश्नाने उग्र रूप धारण केले नसते. आपल्याकडे टांकसाळी आहेत आणि नाणी तयार करण्यास लागणारे तंत्रज्ञानही आहे. टांकसाळींची क्षमता नोटा छापण्याच्या क्षमतेच्या बरोबरीने वाढवायचे प्रयत्न वेळीच करायला हवे होते. अर्थात हा दोष सध्याच्या सरकारचा नाही हे कबूल. परंतु सरकारने दोष सुधारायचा (क्षमता वाढवायचा) निर्णय घ्यायला हवा होता; तद्नंतर दोनएक वर्षात चणचण संपली असती. लोक आतापर्यंत सबुरीने वागले आहते व नाणे टंचाईवर तात्पुरत्या स्वरूपाचे उपायही शोधत आहेत. सरकारने कृती केलेली आहे व दोन वर्षात चणचण मिटणार आहे हे कळल्यानंतर अजून दोन वर्ष वाट पाहायला ते तयार झाले असते. पण आता सरकारनेच अधीरपणाने सुट्टे पैसे आयात करायचे ठरवले. पंतप्रधानांच्या पत्रकार परिषदेत जेव्हा या निर्णयावर टिप्पणी झाली तेव्हा पंतप्रधानांनी सांगितले की स्वावलंबन म्हणजे काहीच आयात न करणे नव्हे. जपानदेखील अनेक गोष्टी आयात करत असतो. पंतप्रधानांची खरोखरच अशी समजूत नसेल अशी आशा आहे. (The P. M. surely knows better)

स्वावलंबन म्हणजे 'आयातीस मज्जाव नाही' हे खरेच पण स्वावलंबन म्हणजे 'आयातीचा खर्च निर्यातीतून भरून काढणे' हेही तितकेच खरे आहे. जपान आयात

करतो पण किती तरी अधिक निर्यात करतो व आज त्यांच्याकडे आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढावा भरपूर आहे. आपल्याकडे, याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारात मोठी तूट आहे. आपले पर्यटक जसे परदेशी गेल्यावर मोकाटपणे खरेदी करत सुटतात तसे करण्याची आपली परिस्थिती नाही. हा आयात खर्च भीक मागून वा कर्जे घेऊन भागवावा लागेल.

२५. सध्या आपली आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या चालू खात्यावरील तूट वर्षाला २५०० कोटी रु. आहे व ती कमी होण्याची काही चिन्हे नाहीत. ही तूट भरून काढण्यासाठी आपण परकीय सरकारे व आंतरराष्ट्रीय संस्थांकडे पदर पसरतो. दर वर्षी आम्ही कर्जे परत करू अशी धनकोची समजूत घालून घालून २५०० कोटी रु. जमविले जातात. पण ते पुरे पडत नाहीत. कारण त्यातले निम्मे-अधिक साठलेल्या ऋणांचे व्यवस्थापन (debt-servicing) करण्यातच जातात. म्हणून मग आपण व्यापारी तत्त्वावरील कर्ज-उभारणीचा आश्रय घेतो. हे कर्ज कमी मुदतीचेही असते नि महागही. सध्या ह्या कर्जाची व्याप्ती वर्षाला १५००-२००० कोटी रु. आहे. आता तर आपण आपल्याला माल/सेवा पुरवणाऱ्याकडूनही परतीची अपेक्षा ठेवायला लागलो आहोत. (याचाच अर्थ जे बिल उशिराने घेऊ शकतील अशांकडूनच माल घ्यायचा) यामुळे, कोणत्या लोकांकडून आणि कोणता माल घेतला जाईल यावर मोठ्याच मर्यादा पडतात. तसेच, परकीय सरकारी कर्जामागोमाग नाकातली वेसण येतेच हेही आता अधिकाधिक स्पष्ट होऊ लागले आहे. धनको देशांतील मालच उचलला पाहिजे हे बंधन संरक्षण-खर्चाच्या बाबतीतही घातले जाऊ लागलेय हे फार चिंताजनक आहे.

२६. ऋण-व्यवस्थापनापोटी (मुद्दल व व्याज) सध्या आपल्याला वर्षाला जवळजवल २००० कोटी रु. मोजावे लागतात. ही रक्कम नजीकच्या भविष्यात चांगलीच वाढणार आहे. असे असूनही सरकारी पातळीवर सगळे निश्चिंत दिसतात. आपल्यावरील ऋण व्यवस्थापनाचा बोजा आंतरराष्ट्रीय मानकांच्या मानाने काहीच नाही असे मानले जाते. जर लॅटिन अमेरिकन देशांचे उदाहरण आंतरराष्ट्रीय मानके ठरवायला घेतले असेल तर आपल्यावरील बोजा कमीच म्हणायचा. पण लॅटिन अमेरिकन उदाहरणाचा पाठपुरावा केला तर अवाढव्य कर्जाची परिणती काय होते हेही लक्षात येईल. जेव्हा देश थकबाकीदार होतात व हप्तेबंदीत बदल करून मागितला जातो. (rescheduling of debt) तेव्हा धनको देश मौद्रिक व वित्तीय व्यवस्थापनाबद्दलच नव्हे तर अर्थव्यवस्थेतील एकूणच राजकीय-आर्थिक धोरणावर

फुकट सल्ला देऊ करतात. आपल्यालाही याचा अनुभव आहेच. विशेषत: मौद्रिक व वित्तीय व्यवस्थापनाचे बाबतीतील सल्ला, सर्वच्या सर्वच चूक वा विघातक असतो असे नाही. पण त्यातील जो चांगला सल्ला आहे तो आपण स्वत:च अगोदरच अंमलात आणू शकतो. तो परदेशातून येईपर्यंत थांबणे काही खरे नव्हे.

२७. नव्या सरकारच्या औद्योगिक धोरणाच्या आतापर्यंत स्पष्ट झालेल्या दोन अंगांचे संभाव्य परिणाम हे असे आहेत. प्रामुख्याने, शहरातील जनतेच्या (एकूण लोकसंख्येच्या ३०%) आयुष्यावर या धोरणाचा विशेष परिणाम होईल. इतर ७०% वर परिणाम करणाऱ्या धोरणांबद्दल अद्याप स्पष्टता यायची आहे. या ७० टक्क्यांचे आपण ३०% व ४०% असे दोन ढोबळ गट करू शकतो. आर्थिकदृष्ट्या किफायतशीर धारणक्षेत्रे (holdings) असलेले शेतकरी व आवश्यक ती धोरणे व कार्यक्रम राबविले असता ज्यांची शेती किफायतशीर होऊ शकेल असे शेतकरी पहिल्या वर्गात मोडतात. जलसिंचन, शेतकी शिक्षण, संशोधन व विस्तार, आदानांचा पुरवठा, वखारपालन व विपणनविषयक कार्यक्रमांचा या कार्यक्रमात समावेश होतो. यासर्व कार्यक्रमांची उपयुक्तता ज्ञात आहे; परंतु ते नीट राबविले जाण्याची गरज आहे. जलसिंचन-सुविधांच्या विस्तारावर अधिक पैसा खर्च केला गेला पाहिजे व पाणीवापराच्या व्यवस्थापनाकडे अधिक लक्ष दिले गेले पाहिजे; कारण अखेरीस जलसिंचन हीच आपल्या कृषि विकासाची गुरूकिल्ली ठरणार आहे. 'भेट व प्रशिक्षण' (व्ही.ॲड टी.) योजनेचा खरोखरीने किती फायदा होतो याबद्दल मतभिन्नता आहे. सर्वसामान्यत: टी. ॲड व्ही. कार्यक्रमाचे वर्णन 'निसटती भेट देऊन गुप्त होणे' (touch and vanish) असे केले जाते! बऱ्याच जणांना या योजनेवर खर्चलेला पैसा वाया जातो असे वाटते. करण्यात येणारा खर्च पाहू जाता या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे. ज्यांना गरज आहे त्यांनाच नव्हे तर ज्यांच्या थकबाक्या साठल्या आहेत त्यांनाही पतपुरवठा केला जातो. थकबाकीचा प्रश्न आज भेडसावतो आहे त्याचे एक कारण म्हणजे वखारपालन व विपणन यांच्याशी पतपुरवठ्याचा मेळ घातला गेलेला नाही. तसेच, आदान-पुरवठा, पत-पुरवठा, वखारपालन व विपणन या क्षेत्रात सहकार तत्त्वाचा पुरेसा शिरकाव झालेला नाही अगर सहकार यशस्वी ठरलेला नाही. परंतु सहकारी तत्त्व यशस्वीपणे वापरता आलेच पाहिजे कारण फक्त त्यायोगेच शेतकरी वर्गातील उपक्रमशीलता व व्यवस्थापकीय दृष्टिकोन (attitudes) वाढीला लागतील. सहकारी तत्त्वाचा प्रसार हा व्यापक शिक्षणाचा भाग मानून धिमेपणाने, सातत्याने व चिकाटीने सहकाराचा विकास घडवला पाहिजे.

२८. उरलेल्या चाळीस टक्क्यांकडे जमीन नाही अगर अगदी थोडी आहे. यांच्यामध्ये बलुतेदार व इतर कारागीरांचाही समावेश आहे. ह्या कारागीरांची कौशल्ये, तंत्रे आज कालबाह्य (outmodel) ठरली असल्याने ते बेरोजगार अगर न्यूनरोजगार आहेत. आज हा वर्ग समाजातील सगळ्यात हलाखीच्या (underemployed) स्थितीतील वर्ग आहे. आतापर्यंत त्यांच्या हालअपेष्टा कमी व्हाव्या म्हणून दोन धोरणे राबविली गेली. त्यातील पहिले जमिनीचे पुनर्वाटप हे होते. याचा फारसा उपयोग झाला नाही. शेतजमिनीची मालकी अत्यंत विषम आहे यात वाद नाही. पण बिगर-शेती व्यवसायातील संपत्ती वा उत्पन्नांच्या वितरणातील विषमतेच्या तुलनेत शेतीतील विषमता अधिक नाही. म्हणूनच फक्त शेतजमिनीच्या मालकी हक्काबाबत निखळ समाजवादी धोरणे वापरणे असमर्थनीय आहे. खरे पाहता, पुनर्वाटपाइतकी आपल्याकडे जमीनच नाही!

२९. हस्तोद्योग, कुटिरोद्योग श्रमसघन असल्यामुळे (labour intensive) त्यांना संरक्षण द्यावे, त्यामुळे रोजगारही वाढेल हे दुसरे धोरण झाले. एकाच उद्योगात एकाच वेळी नव्या जुन्या वाणाची अनेक तंत्रज्ञाने अस्तित्वात असतात हे वर आलेच आहे त्यापैकी काही इतरांपेक्षा अधिक उत्पादक असतात. कमी उत्पादक तंत्रज्ञाने अस्तित्वात राहावयाची असतील तर ती तंत्रज्ञाने वापरणाऱ्या भांडवल व श्रमांना कमी मोबदला स्वीकारावा लागतो. जर कमी मोबदला स्वीकारण्याची उत्पादन घटकांची तयारी राहिली नाही तर, वा सध्याची यंत्रसामग्री झिजून गेल्यानंतर ही तंत्रज्ञाने वापरात राहात नाहीत. दरम्यान अधिक उत्पादक अशी अजून नवी तंत्रज्ञाने उदयास आलेली असतात. त्यामुळे परत त्या उद्योगात कुठल्याही निर्दिष्ट क्षणी तंत्रज्ञानांची मालिका (aray) अस्तित्वात असते. ही तंत्रज्ञान-विकासाची प्रक्रिया आहे. त्यामुळे अबकारी व विक्री करात सूट देऊन कमी उत्पादक तंत्रज्ञानांना संरक्षण देणे वाजवी व उचित (legitimate and appropriate) आहे; पण केव्हां? जेव्हा ही धोरणे मूलत: संक्रमणात्मक आहेत व त्याचे भान ठेवले जाते तेव्हा. या पलीकडे जाऊन अशी कम-उत्पादक तंत्रज्ञाने स्थिरावतील, फैलावतील असे प्रयत्न करणे व त्यामुळे रोजगाराच्या प्रश्नास कायमस्वरूपी (long term) उत्तर मिळेल असे मानणे म्हणजे उद्दिष्टांची गल्लत करणे ठरेल. त्यासाठी पूरक साहाय्य (subsidisation) संघटनात्मक व विक्रीसाह्याचा जो इमला उभारावा लागतो त्याचा मध्यस्थ व नोकरशाहीलाच फक्त फायदा होतो हा आता पावेतोचा अनुभव आहे. नवीन धोरणात जरी उच्च-तंत्रज्ञानावर भर असला तरी श्रमसघन तंत्रज्ञान, मध्यममार्गी (intermediate technology) व समुचित तंत्रज्ञान यांची गुंतागुंत काही सुटलेली नही.

३०. जमीन पुनर्वाटप व श्रमसघन तंत्रज्ञान पुरेसे न वाटल्याने आता पतपुरवठा व पूरक साह्यावर लक्ष केंद्रित केलेले आहे. पुरेसे पत व पुरेसे साह्य मिळाल्याने ग्रामीण गरीब वर्ग उत्पादन साधने विकत घेईल व त्यातून त्यांना कायमचा रोजगार मिळेल अशी अपेक्षा या मागे आहे. दुर्दैवाने, सगळे इतके काही सरळ पद्धतीने होत नाही. या लोकांकडे उत्पादनसाधनांचीच कमी नाहीये तर उपक्रमशीलता व अनुभवाचीही कमतरता आहे. अशा परिस्थितीत कर्जाचा गैरवापर होतो व पूरक मदत लाटली जाते. या सगळ्याच्या मुळाशी गरिबांना लाचार न बनवता त्यांना मदत कशी करावी हा खरा प्रश्न आहे. माझे हे म्हणणे कदाचित निष्ठूर वाटेल. पण गरीबानेसुद्धा घाम गाळून पैसा मिळवला पाहिजे, काटकसर करून बचत केली पाहिजे व स्वत:च्या पायावर उभे राहिले पाहिजे. समाजाने व सरकारने ज्यांच्याकडे उत्पादन साधने नाहीत, अशांना काम करून पैसे मिळवण्याची संधी उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांच्यापैकी जास्त काटकसरी असतील ते बचत करतील उत्पादन साधने विकत घेतील, स्वत:च्या पायावर उभे राहतील व दुसऱ्यांना उदाहरण घालून देतील.

३१. मोठ्या संख्येने असलेल्या या श्रमजीवी वर्गास ताबडतोब तरी सार्वजनिक बांधकामावरच (मृद् व जलसंधारण, जलसिंचन, वनीकरण व रस्ते बांधणे) काम पुरवता येईल. नित्याच्या लाभ-खर्च आकडेमोडीच्या भानगडीत न पडता रोजगारनिर्मिती करील असा कुठलाही उपक्रम राबवला गेला पाहिजे. काम नसलेल्यांना काम मिळवून देणे व त्याद्वारे त्यांच्या अन्नवस्त्राची सोय करत असतानाच त्यांना प्रशिक्षणही देणे हा खर्च समजता कामा नये. जलसिंचनाचे फायदे तर लगोलगच दिसतात. इतर फायद्यांबरोबरच शेतीतील श्रमशक्ती-वापराची क्षमता वाढते हाही फायदा विचारात घेतला पाहिजे. मृद् व जलसंधारण आणि वनीकरण यांचे फायदे लगेच दृष्टोत्पत्तीस येणारे नाहीत. परंतु यामुळे जमिनीची न भरून येणारी हानी टाळता येते. रस्ते अनुत्पादक आहेत असे मानले जाते. ज्यांनी रस्त्याअभावी होणारे हाल कधीच भोगलेले नाहीत, ते लोकच असे म्हणतील. देशातील काही भाग अविकसित, मागासलेला राहण्याचे एक प्रमुख कारण रस्त्यांचा अभाव हे आहे.

३२. हे सर्वमान्य सिद्धांत आहेत. अशा प्रकारचा सार्वजनिक बांधकाम कार्यक्रम कशा प्रकारे राबवावा याविषयी चर्चाही झाल्या आहेत. परंतु महाराष्ट्राखेरीज अन्यत्र याविषयी गंभीरपणे प्रयत्न केले गेलेले नाहीत. महाराष्ट्रातदेखील दीर्घ मुदतीचे धोरण आखून राबवण्यापेक्षा तात्पुरती मदत मिळावी म्हणूनच रोजगार हमी योजना राबविली जाते. अनेक वर्षांपूर्वी भू-सेनेच्या कल्पनेचा उच्चार झाला होता. आज त्या संकल्पनेचे

पुनरुज्जीवन फायद्याचे ठरेल. देशभरात कुठेही काम करायला तयार असलेल्या सुदृढ स्त्री-पुरुषांस काम देऊ शकेल अशा निमलष्करी संघटनेची आज गरज आहे. ही सेना फिरती असेल. रोजगार शोधणारी लहान मुलंसुद्धा त्यांत सामील असतील. कामगार छावण्यांतून राहतील, सामुदायिकरित्या जेवण करतील व पगारी कामाव्यतिरिक्त शारीरिक क्षमता वृद्धीसाठी नियमित व्यायामही करतील. या दृष्टीने ही संघटना निमलष्करी आहे असे मी म्हणतो. मुलांना शालेय शिक्षण व तरुणांना व्यावसायिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी लागेल. सैन्यातील निवृत्त (non-commissioned) अधिकाऱ्यांकडे व्यवस्थापन सोपवावे. सुरुवातीला फक्त भूमिहीनांपुरतीच भू-सेनेतील कामगार-भरती मर्यादित ठेवता येईल. त्यांचे जमिनीत कुठलेही हितसंबंध गुंतलेले नसतात. जरा कल्पना करा, सुरुवातीलाच दहा लाख लोक भरती करता येतील! हळूहळू हा आकडा पन्नास लाखांपर्यंत नेता येईल. या प्रश्नांच्या मिती लक्षात घेता त्यांच्याशी मुकाबला करायला कुणी तरी धाडसी पुढाकार घ्यायला हवा. नवीन सरकारमध्ये ती क्षमता आहे असे वाटते.

३३. वर उल्लेखिलेल्या बांधकाम कार्यक्रमाबरोबरच समाजातील अत्यंत दरिद्री वर्गास मदत करायचे दुसरे पारंपरिक साधन म्हणजे भौतिक साधनसामुग्रीत व सामाजिक सेवांमध्ये (सोयी-सवलतींमध्ये) वाढ करणे. रस्ते, विद्युतीकरण यांच्यात वाढ व्हायला हवी; आरोग्य, शिक्षण, पिण्याचे पाणी व स्वयंपाकासाठी जळण हेही शक्य तर जास्ती प्रमाणात उपलब्ध करून द्यायला हवे. वाटले तर या सवलती शुल्क घेऊन पुरवाव्यात. काहींची पुरी किंमत घेऊन तर काहींची नाममात्र (nominal). पण सर्वांना किंमत मोजून का होईना, या सवलती उपलब्ध असाव्यात. आज बरीच खेडी अशी आहेत की जिथे या सेवांची उपलब्धताच नाही. विकासगटात या सेवांच्या उपलब्धतेविषयी चिकित्सा करून या सेवा एका किमान सरासरी पातळीपर्यंत आणून ठेवण्यासाठी देशभरातील मागासगटांमध्ये कार्यक्रम सुरू करावा लागेल.

३४. मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक बांधकामे व भौतिक संरचनात्मक सुविधांमधील प्रादेशिक असमतोल दूर करणे हे दोन कार्यक्रमच केवळ ग्रामीण गरिबांना फलदायी ठरण्याची शक्यता आहे. यासाठी लागणारे मनुष्यबळ व भौतिक साधनसंपत्ती आपल्याकडे मुबलक आहे. परकीय मदतीची गरज नाही. या भौतिक साधनांना व मनुष्यबळास कार्यरत करण्यासाठी आर्थिक बळाची तेवढी आवश्यकता आहे.

३५. विकास व समता या दोन उद्दिष्टांमध्ये काही अंतर्विरोध आहे का, ह्या प्रश्नावर सतत चर्चा होत आलेली आहे. दीर्घकालीन (Long run) विचार करीत

असता असा आंतर्विरोध बहुधा नसावा. परंतु तत्कालिक विरोध आहे हे लक्षात घेणे व मान्य करणे आवश्यक आहे. अंतिमत: अर्थव्यवस्थेची वाढ व विकास झाल्याने सरकारच्या कर–उत्पन्नात वाढ होऊ शकते. परंतु ताबडतोबीने (In the short run) करांच्या दरात वाढ करून उत्पन्न वाढू शकते. मात्र काही एका मर्यादेपलिकडे करांचे दर वाढवण्याचा उलटाच परिणाम संभवतो. करदाते करचुकवेपणा करण्याची तर शक्यता असतेच, पण त्याचबरोबर दीर्घकालीन आर्थिक विकास व विस्तारास हानी संभवते. आपल्या अर्थव्यवस्थेवरील करांच्या बोज्याने कमाल मर्यादा गाठली आहे किंवा कदाचित ही मर्यादा ओलांडलीदेखील आहे अशी नव्या सरकारची धारणा वा अनुमान असावेसे दिसते. त्यामुळेच सध्याचे धोरण करांचे दर कमी करण्याचे आहे. यामुळे जे उत्पन्नाचे नुकसान होईल ते आर्थिक विकासामुळे, जी कर–उत्पन्नात वाढ होईल त्या तुलनेत खूपच कमी असेल अशी सरकारला आशा वाटते. (आणि अलिकडे अर्थव्यवस्थेने धरलेली उभारी या सिद्धांतास पुष्टी देत आहे.) हा कार्यकारणभाव बरोबर असण्याची शक्यता आहे आणि म्हणूनच असे धोरण राबवून पाहणे उपयुक्त ठरेल.

३६. दरम्यान, सरकारी खर्च काही इतक्या सहजतेने कमी करता येत नाहीत व त्यामुळे अंदाजपत्रकातील जमा व खर्चाचा मेळ घालणे अधिकच बिकट होते. उत्पन्न व खर्चाची तोंडमिळवणी कर्जे घेऊन व तुटीचे अंदाजपत्रक करून केली जाते. हे नेहमीचेच आहे. परंतु नव्या सरकारने आपल्या पहिल्याच अंदाजपत्रकात महसूल उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज व तूट दोन्हीच्या प्रमाणात वाढ केली आहे. ७९–८० पासून केंद्र सरकारचे महसुली उत्पन्न सरकारच्या चालू/महसूल खर्चास पुरे पडेनासे झाले आहे. ८४–८५ पर्यंत उत्पन्नापेक्षा खर्च अधिक होताच, पण हे आधिक्य उत्पन्नाच्या ३.५% पर्यंतच मर्यादित होत. ८५–८६ च्या अंदाजपत्रकात हे प्रमाण २२.२% झाले आहे. (म्हणजे १०० रु. उत्पन्नामागे १२२.२ रु. खर्च) हा वाढीव खर्च व सरकारचा भांडवली खर्च भागविण्याकरता कर्ज व अंदाजपत्रकातील तूट यांचा आश्रय घेतला जातो. ८३–८४ पर्यंत कर्ज व तूट महसूल उत्पन्नाच्या ७०% पेक्षा कमी होते. १९८५–८६ च्या अंदाजपत्रकात हे प्रमाण ७६.६४% वर गेले आहे. कर्जावरील वाढत्या अवलंबित्वामुळे सार्वजनिक कर्जाचा बोजा प्रतिवर्षी वाढतो आहे. ७७–७८ मध्ये केंद्र सरकारची निव्वळ देणी निव्वळ राष्ट्रीय उत्पादनाच्या ५२.७३% होती, ८५/८६ मध्ये ही टक्केवारी ६८.५२ वर जाईल असा अंदाज आहे. व्याजाचा बोजाही साहजिकच वाढतो आहे. ७९–८० मध्ये महसूल उत्पन्नाच्या २०% रक्कम

व्याजापोटी खर्च होत होती. ८४-८५ मध्ये हे प्रमाण २४% होते; तर ८५-८६ त ते २६.४३% वर जाईल असा अंदाज आहे. व्याजाच्या बोज्याकडे वेगळ्या पद्धतीनेही पाहता येईल. ८५-८६ मध्ये देशातून ५१०० रु. कोटीची कर्ज उभारणी केली जाईल. देशाबाहेरून २१४४ कोटी रु. उभारले जातील. याउलट व्याजाचा बोजा ७०७५ रु. कोटी असेल. म्हणजेच, बहुतेक सर्व कर्जउभारणी व्याज द्यायलाच खर्ची पडेल.

३७. यातून अनेक प्रश्न उभे राहतात. परकीय कर्जाविषयी वर भाष्य केलेलेच आहे. देशांतर्गत कर्जाचे काय? सरकारने देशातून किती कर्जउभारणी करावी याला कमाल मर्यादा घालणे आवश्यक आहे का? तत्त्वत: जुन्या कर्जांची परतफेड व व्याज भागवता येईल इतके कर्ज सरकारला उभे करता आले म्हणजे पुरे. (आता तीच परिस्थिती आली आहे!) या कर्जाचा बोजा कुणावर पडतो? यासाठी सरकारी कर्जरोखे कोण विकत घेतो ते पाहायला पाहिजे. जरी सरकार खुल्या बाजारात कर्जउभारणी करते असे म्हटले जाते तरी प्रत्यक्षात बंदिवान बाजारातून (captive market) कर्जउभारणी केली जाते. कारण सरकार बाजारातील व्याजदरापेक्षा कमी दराने व्याज देते. तीन गट प्रामुख्याने हे कर्जरोखे घेतात. पहिला व्यापारी बँकांचा. व्यापारी बँकाकडील एकूण वित्तीय साधनांच्या ठराविक गुणोत्तरात बँकांना सरकारी कर्जरोख्यात गुंतवणूक करावी लागते. वैधानिक तरलता गुणोत्तर (SLR) वरून ही गुंतवणूक ठरते. बँकांनी आपल्या मागणी व मुदत देयतांच्या काही ठराविक गुणोत्तरातील रक्कम रोकड, सोने वा बोजा नसलेल्या मान्यताप्राप्त रोख्यांच्या प्रमाणात ठेवायची असते. हे रोखे म्हणजे प्रामुख्याने सरकारी रोखेच असतात. आणि वै.त. गुणोत्तर राखण्यासाठीची बहुतेक गुंतवणूक या रोख्यात केलेली असते. म्हणजेच बँकांच्या वित्तीय साधनापैकी बराच मोठी भाग (सध्या वै.त. गुणोत्तर ३७% आहे) सरकारी कर्जरोख्यात गुंतवलेला असतो. खरे तर, सरकारच्या रोख्यावरील व्याजदर बँक आपल्या ठेवीदारांना देत असलेल्या दरापेक्षाही कमी असतो. त्यामुळे आपला इतर खर्च व हा फरक भरून काढण्यासाठी बँक व्यापारी उपयोगासाठी द्यावयाच्या कर्जावर जास्त व्याजआकारणी करतात. या रीतीने सार्वजनिक कर्जाचा काही बोजा उद्योग व व्यापारी क्षेत्रावर ढकलला जातो.

३८. सरकारी कर्जरोखे घेणारा दुसरा गट म्हणजे कही वित्तीय संस्था. यामध्ये एल.आय.सी., जी.आय.सी. येतात तसेच भविष्यनिर्वाह निधीचाही समावेश होतो. त्यांना आपल्याजवळील गुंतवणूकयोग्य रकमेपैकी काही भाग (काहींना बराच मोठा भाग) सरकारी रोख्यात गुंतवावा लागतो. जी.आय.सी. कडील गुंतवणूकयोग्य रक्कम

प्रामुख्याने व्यापारी क्षेत्रातून जमा झालेली असते. त्यांना द्यावी लागणारी हप्त्यांची रक्कम वाढते. (हप्तेबंदीचे दर वाढतात). याउलट LIC मध्ये छोटे बचतदार गुंतवणूक करतात. हे लोक अकाली मृत्यू, निवृत्ती, म्हातारपण अशा शक्यतांचा विचार करून बचत करत असतात. याशिवाय, भविष्यनिर्वाह निधीत गुंतवणूक करणे सक्तीचे असते. ज्या प्रमाणात ह्या रकमा कमी व्याजदराच्या सरकारी रोख्यात गुंतविल्या जातात, त्या प्रमाणात सरकारी कर्जाचा बोजा या वर्गावर पडतो. याला उपाय म्हणून या गुंतवणुकीस आयकरापासून संरक्षण दिलेले आहे. हे असमानतेचा परिपोष करणारे आहे, आणि म्हणून थांबवले पाहिजे. अधिक उत्पन्न गटातील व्यक्तींना या तरतुदीचा जास्त उपयोग होतो हे उघडच आहे; आणि त्यामुळे केवळ या संरक्षणाचा फायदा घेण्यासाठी एल.आय.सीत काही लोक मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. जे खरोखर मृत्यू, निवृत्ती, म्हातारपणात साह्यकारी ठरावे म्हणून गुंतवणूक करतात त्यांच्या गुंतवणुकी सहसा ३० वर्षे वा त्याहूनही अधिक मुदतीच्या असतात. त्यामुळे त्यांचे अजून एक नुकसान होते. या काळात होणाऱ्या भाववाढीमुळे (ज्यासाठी अंतिमत: सरकारच जबाबदार असते) त्यांच्या गुतवणुकीची किंमत खूपच कमी होते. अनेक जणांनी आपल्या आयुष्यभराच्या बचतीची किंमत डोळ्यादेखत कमी होत असताना पाहिली आहे. मृत्यू, निवृत्ती व म्हातारपणात आधार म्हणून केलेल्या बचतीची अशी अवस्था व्हावी हे नैतिकदृष्ट्या अगदी अनुचित आहे. म्हणून, निदान एल.आय.सी. व भविष्यनिर्वाहनिधी या दोघांची सार्वजनिक कर्जाच्या पकडीतून सुटका केली पाहिजे.

३९. एलआयसी व भविष्यनिर्वाहनिधीस जास्ती उत्पन्न देणाऱ्या परंतु अशाश्वत गुंतवणुकी करून उपयोग नाही हे तर खरेच. गुंतवणुकीची शाश्वती असली पाहिजे; त्यावर वाजवी दराने उत्पन्न मिळाले पाहिजे आणि भाववाढीपासून काही प्रमाणात संरक्षण मिळाले पाहिजे. भारतात युनिट ट्रस्टमधील गुंतवणूक या सर्व अटी समाधानकारकरित्या पूर्ण करते. त्यामुळे एल.आय.सी. व भविष्यनिर्वाहनिधीस (कोणतीही कमाल मर्यादा न घालता) युनिट ट्रस्टमध्ये गुंतवण्याची मुभा दिली गेली पाहिजे. यामुळे, एल. आय. सी. व भविष्यनिर्वाहनिधीस आपल्या गुंतवणुकीवर चांगले उत्पन्न तर मिळेल; पण त्याचबरोबर मजूर व पगारदार हळूहळू देशातील जवळजवळ सर्व औद्योगिक भांडवलाचे मालक बनतील. हा कामगारांचा व्यवस्थापनातील सहभागच नव्हे का?

४०. सरकारी कर्जरोख्यातील उर्वरित गुंतवणूक रिझर्व बँकेची असते. सरकार बंदिवान बाजारातूनही जे कर्ज गोळा करू शकत नाही, ते रिझर्व बँकेकडून घेतले

जाते. यासाठीच रिझर्व बँकेला निर्वाणीचा धनको म्हटले जाते. रिझर्व्ह बँकेकडून घेतलेले कर्ज व अंदाजपत्रकीय तूट मिळून तुटीची जमाव्यवस्था (deficit financing) (Lender of the last resort) बनते आणि या तुटीमुळे प्रत्यक्षपणे चलनफुगवटा होतो. आतापर्यंत तुटीची वित्तव्यवस्था कशी आवश्यक आहे व त्यामुळे भाववाढ कशी होत नाही याबद्दल अनेक समर्थने दिली गेली आहेत. परंतु सततची तुटीची वित्तव्यवस्था हा चलनफुगवट्याद्वारे होणाऱ्या भाववाढीचा मूलस्त्रोत आहे हे समजायला पैसावादी (monetarist) असण्याची गरज नाही. यामुळे पैसा उभा करण्याचे तुटीची जमाव्यवस्था हे सगळ्यात प्रतिगामी साधन आहे. आधी सांगितलेल्या सर्वात गरीब ४०% जनतेवर भाववाढीचा जास्त परिणाम होतो. त्यांच्याकडे त्यांच्या श्रमाशिवाय काहीही विकाऊ नाही. रोजगाराची हमी नाही, त्यांचे किमान वेतन ठरविलेले नाही व भाववाढीशी जोडलेले दर तर नाहीच नाही. दुसरे म्हणजे सततच्या भाववाढीमुळे एल.आय.सी. व भविष्य निर्वाहनिधीतील बचतीचे मूल्य कमी होते. हे अनैतिक आहे हे पुरावृत्तीचा धोका पत्करून सांगतो. तिसरे म्हणजे प्रत्येक भाववाढीमुळे औद्योगिक अशांतता वाढते (सरकारला फक्त याचीच फिकीर दिसते!) जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रणे घालून भाववाढीस आळा घालण्याचे धोरण यशस्वी होताना दिसत नाही. या नियंत्रणामुळे या वस्तूंच्या उत्पन्नावर परिणाम होतो व नियंत्रणे सैल केली नाहीत तरी ती पाळली जात नाहीतच. आयात करून जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कमी ठेवण्याच्या प्रयत्नात या वस्तूंच्या उत्पादनाची हानी तर होतेच. पण त्याचबरोबर परकीय चलनही खर्च होते. त्यामुळे सरकार पुन्हा तुटीच्या जमाव्यवस्थेचा आश्रय घेते व अशा प्रकारे अर्थव्यवस्था या दुष्टचक्रात अडकते.

४१. या दुष्टचक्रातून मुक्तता होण्यासाठी वित्तीय शिस्तीची आवश्यकता आहे आणि ही शिस्त सरकारनेच स्वत:च्या अंगी बाणवली पाहिजे. सरकारच्या अंदाजपत्रकीय तुटीवर कमाल मर्यादा (जरूर पडली तर कायद्याने) घातली पाहिजे. आणि सगळ्यात उत्तम मर्यादा शून्य तूट ही आहे. अंदाजपत्रके समतोलाचीच असली पाहिजेत; मग ती राज्यांची असोत वा केंद्राची. तुटीचे अंदाजपत्रक सादर करायला अर्थमंत्रीच कशाला हवा! सरकारच्या बाजारातील कर्जउभारणीस रिझर्व बँकेने दिलेले सहाय्य तुटीच्या जमाव्यवस्थेत न धरण्याचा सोयीचा हिशोबही थांबवला गेला पाहिजे. सरकारने हवे तर बंदिवान बाजारात, कमी व्याजदराने कर्ज उभारणी करावी, पण रिझर्व बँकेला त्यात गोवू नये. (रिझर्व बँकेकडून या कर्जाची अपेक्षा ठेवू नये). रिझर्व बँकेने अधिकर्ष सुविधा द्याव्यात पण त्यावरही सरकारच्या चालू

महसूल उत्पन्नाच्या अमुक एक ठराविक टक्क्यापर्यंतच अशी वैधानिक मर्यादा हवी. अशा प्रकारच्या वैधानिक तरतुदी केल्या नाहीत तर केंद्रीय व राज्यीय अर्थकारणास शिस्त लागणे कठीणच आहे.

४२. एल.आय.सी. व भविष्यनिर्वाहनिधीत, युनिट ट्रस्टमध्य गुंतवणूक करू देणे व रिझर्व बँकेने बाजारातील कर्जउभारणीस हातभार न लावणे या दुहेरी तरतुदीमुळे सरकारला फक्त व्यापारी बँकांकडून कर्जउभारणी करता येईल; व त्यामुळे कर्जउभारणीवर आपोआपच मर्यादा येतील. यासाठी वैधानिक तरलता गुणोत्तर (SLR) ५०% वर नेऊन व रोकड संचिती गुणोत्तर CRR) गरजेप्रमाणे वेळोवेळी कमी करून कर्जउभारणी क्षमता वाढवता येईल. यामुळे पैसाविषयक अधिकारमंडळाच्या अनुमानाप्रमाणे व कल्पनेप्रमाणे अर्थव्यवस्थेची जी तरलतेची (liquidity) गरज असेल त्या प्रमाणात देशातील पतपुरवठ्याचा विस्तार होईल व सरकारला या वाढीव पतपुरवठ्यातील काही विवक्षित भाग स्वत:साठी हक्काने घेता येईल. या प्रक्रियेत मौद्रिक व वित्तीय धोरण वेगवेगळी काढली जातील. हे आवश्यकच आहे. ज्या प्रमाणात सरकार कमी दराने कर्ज घेते त्या प्रमाणात व्यापारी क्षेत्रास अधिक दराने कर्जपुरवठा होईल. यामुळे सरकार व व्यापारी क्षेत्रातील कर्जदार एकमेकासमोर उभे ठाकतील व जास्ती करभार का जास्त कर्जउभारणी याचा निर्णय अधिक डोळसपणे घेतला जाईल.

४३. आर्थिक विकासासाठी करायच्या परिश्रमात खाजगी क्षेत्र व सरकार हे बरोबरीचे भागीदार असले पाहिजेत. सार्वजनिक क्षेत्रातील मागील अनुभव जमेस धरता सरकारने सार्वजनिक क्षेत्राची गुणात्मक वृद्धी करण्याकडे लक्ष केंद्रित करावे व या क्षेत्राचा विस्तार करण्यात पैसा व प्रयत्न खर्ची घालू नये. काही काळ सरकारने उत्पादनाची जबाबदारी खाजगी क्षेत्रावर टाकावी, उत्पादनवाढीसाठी आवश्यक त्या सवलती द्याव्यात व आवश्यक ती परिस्थिती निर्माण करावी. पण सार्वजनिक क्षेत्र व सरकार समकक्ष नव्हेत. सरकारला इतर अनेक महत्त्वाची कामे पार पाडायची असतात जी कधीही खाजगी क्षेत्रावर टाकणे शक्य नाही. कायदा व सुव्यवस्था संरक्षण या मूलभूत कार्याखेरीज ऊर्जा, दळणवळण व जलसिंचनातील संरचनात्मक साधनसामग्रीची निर्मिती ही सरकारची जबाबदारी आहे. या साधनांची खाजगी क्षेत्राच्या विस्तारास गरज आहे. शिक्षण, आरोग्य व इतर सामाजिक सुविधांच्या निर्मितीचीही खाजगी क्षेत्र सुरळीत चालण्यासाठी गरज आहे. वर उल्लेखलेल्या मोठ्या व प्रचंड सार्वजनिक बांधकाम कार्यक्रमाचाही खाजगी क्षेत्रास उपयोग होणार

आहे. त्यांची बाजारपेठ ह्यामुळे विस्तारणार आहे. यामुळे, ज्याप्रमाणे खाजगी क्षेत्रास विकासासाठी साधनसामग्रीची (resources) आवश्यकता आहे हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे तद्वत सरकारलाही आपली कार्ये पार पाडण्यासाठी पैसा लागतो हे खाजगी क्षेत्राने लक्षात घेतले पाहिजे. उपलब्ध साधनांची दोघात समान व न्याय्य वाटणी झाली पाहिजे. सध्या फक्त एकाकडे सर्व सवलतींचा ओघ वाहताना दिसतो व दुसऱ्याच्या गरजा व जबाबदाऱ्यांकडे दुर्लक्ष होताना दिसते.

■■

(प्रा. वि. म. खांडेकर यांचा प्रस्तुत लेख दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'सेमिनार' मासिकाच्या डिसेंबर १९८५ च्या अंकात 'ए फ्रेमवर्क' या शीर्षकाखाली प्रसिद्ध झाला. 'अर्थसंवाद'च्या वाचकांना तो खचितच उद्बोधक वाटेल म्हणून त्याचा अनुवाद येथे देत आहोत. अनुवाद प्रसिद्ध करण्यास अनुमती दिल्याबद्दल प्रा. दांडेकर आणि संपादक 'सेमिनार' यांचे आभार. – संपादक)

पुरवणी

लोकशाही विकेन्द्रीकरण

यापूर्वी या व्याख्यानमालेत ज्या सन्माननीय वक्त्यांनी व्याख्याने दिली आहेत त्यांच्या नावाची यादी पाहाता या ठिकाणी व्याख्यान देण्यास निमंत्रित करून आपण माझा बहुमान केलेला आहे हे उघड आहे. त्याबद्दल प्राध्यापक मावळकर आणि या संस्थेचे अन्य पदधिकारी यांचा मी कृतज्ञ आहे.

लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या काही अंगांसंबंधी माझे काही विचार आपणासमोर मांडण्याचे आज मी योजिले आहे. लोकशाही विकेन्द्रीकरणाची ही कल्पना पंचायती राज्य या नांवानेही उल्लेखिली जाते. ही कल्पना सुमारे दहा वर्षांपूर्वी पुढे आली, हे आपणांस माहीत आहेच. श्री. बलवंतराय मेहता यांच्या सन्माननीय अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या अभ्यासमंडळाने आपल्या पुरोगामी अहवालात या कल्पनेचा पुरस्कार केला. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यापासून गेल्या दहा वर्षांत सामान्यपणे या अहवालांतील शिफारशींना धरून लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या दिशेने बरीच प्रगती झाली आहे. आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, गुजरात, मद्रास, महाराष्ट्र, म्हैसूर, ओरिसा, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगाल या बारा राज्यांमध्ये पंचायती राज्य स्थापन झालेले आहे. आज जिल्हापातळीवरील सुमारे २५० पंचायती राज्य संस्था आणि जिल्हा व खेडे यांच्यामधील पातळीवरील सुमारे ३५०० पंचायती राज्य संस्था देशांत स्थापन झालेल्या आहेत. या विविध संस्थांची घटना आणि कार्यपद्धती काय आहे किंवा त्यांच्याकडे सोपविण्यात आलेली कामे करण्यात त्या कितपत यशस्वी वा अयशस्वी झाल्या आहेत याचे विवेचन करण्याचा आज माझा विचार नाही. त्या ऐवजी या विषयाच्या संदर्भात काही तात्त्विक व धोरणविषयक व्यापक प्रश्न आपणांसमोर मांडावेत असा माझा मानस आहे. या हेतूने या विषयाची पार्श्वभूमी मी आपणासमोर थोडक्यात मांडतो.

आपल्याला माहीतच आहे की जिल्हापातळीवरील राज्यकारभाराची पुनर्रचना करण्याच्या गरजेतून लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या कल्पनेचा जन्म झालेला आहे. ब्रिटिश अमदानीत जिल्हा हा राज्यकारभाराचा प्रमुख घटक मानलेला होता. जिल्हाधिकारी हा लोकांशी निकट संबंध असणारा सरकारचा मुख्य प्रतिनिधी असे. जिल्ह्यातील कायदा, सुव्यवस्था व महसूल या बाबी त्याच्या खास अधिकारात असत. शिवाय जिल्हापातळीवर वेगवेगळ्या खात्यांमार्फत चालणाऱ्या सर्व कामांत एकसूत्रता ठेवण्याची जबाबदारीही त्याचीच असे. एकूण राज्यकारभारातील अधिकारमालिकेत त्याचे स्थान फार महत्त्वाचे मानले जाई. त्याचे हाती असलेल्या या राजसत्तेमुळे स्थानिक लोकांवर त्याचा फार प्रभाव असे, आणि राज्यकारभारास आवश्यक ते सर्व सहकार्य स्थानिक लोकाकडून त्याला सहज मिळत असे.

देश स्वतंत्र झाला आणि कायदा व सुव्यवस्था यांच्या ऐवजी आर्थिक विकासावर भर देण्यात आला. तेव्हा निव्वळ सरकारी नोकरशाहीच्याकरवी ग्रामीण विकासाचा मामुली कार्यक्रमही अमलात आणता येणार नाही हे स्पष्ट झाले आणि विकासकार्यक्रमात स्थानिक लोकांनी अधिकाधिक पुढाकार व भाग घेण्याची गरज भासू लागली. पहिल्या पंचवार्षिक योजनेत याची आवश्यकता समजली होती परंतु या दिशेने प्रत्यक्ष फारच थोडी प्रगती झाली. पुनश्च दुसऱ्या योजनेत जिल्ह्यांत लोकशाही पद्धतीची सुसंघटित प्रशासनयंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता प्रतिपादिली गेली आणि असे सुचविले गेले की, ''जनतेच्या या प्रातिनिधिक संघटनेकडे सुपूर्द करावयाच्या कामांमध्ये कायदा व सुव्यवस्था, न्यायदान आणि महसुलाशी संबंधित काही बाबी वगळता जिल्ह्यातील संपूर्ण सामान्य प्रशासन आणि विकास यांचा समावेश करण्यात यावा. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय विकास मंडळाच्या योजना प्रकल्प समितीने १९५७ च्या जानेवारीत श्री. बलवंतराय मेहता यांच्या नेतृत्वाखाली एक अभ्यासमंडळ नियुक्त केले आणि त्याने समाज विकास आणि राष्ट्रीय विकास – प्रचार यांच्या कार्याचा अभ्यास करून जिल्हाप्रशासनाच्या पुनर्घटनेसंबंधी विचार करून सूचना कराव्यात असा आदेश दिला. या अभ्यासमंडळाने १९५७ च्या अखेरीस आपला अहवाल सादर केला. त्या वेळी जिल्ह्यात विद्यमान असलेल्या अनेक स्थानिक विकास संघटना आणि समित्या यांच्या कार्याची पहाणी करून या अभ्यासमंडळाने अशी शिफारस केली की या सर्व संस्था व संघटनांच्या एवजी ''ग्रामीण भागातील विकासकार्याच्या सर्व अंगांची जबाबदारी घेऊ शकेल अशी एक प्रातिनिधिक आणि प्रभावी लोकशाही संस्था निर्माण करण्यात यावी.''

या विषयाच्यां संदर्भात जे काही तात्त्विक व धोरणविषयक मुद्दे उपस्थित करून त्यांची चर्चा करण्याचे आज मी योजिले आहे ते उपरिनिर्दिष्ट अभ्यासमंडळाच्या या मूलभूत शिफारशीशी संबंधित आहेत. मी दोन मुद्दे उपस्थित करू इच्छितो. पहिला मुद्दा असा की जिल्ह्यातील विकासकार्याच्या सर्व अंगांची जबाबदारी घेणारी एकच एक संस्था निर्माण करणे कितपत इष्ट आहे? याबाबत मला असे म्हणावयाचे आहे की, स्थानिक पातळीवर अशी एकमेव संस्था निर्माण करण्याने अधिकार व सत्ता यांचे केंद्रीकरण होते आणि ते अनिष्ट आहे. दुसरा मुद्दा असा की पंचायती राज्य संस्थामध्ये अभिप्रेत असलेल्या प्रातिनिधिक लोकशाहीचे निश्चित स्वरूप व आशय काय असावयास हवा? याबाबत मला असे म्हणावयाचे आहे की, या संस्थांतील लोकशाहीचे स्वरूप संसदीय लोकशाहीचे ठेवले तर एकाच राजकीय पक्षाच्या हातांत सत्तेचे अनुचित व असमर्थनीय केन्द्रीकरण होते आणि ते तसे होऊ देणे इष्ट नाही. या दोन मुद्द्यांचा आता मी क्रमश: उहापोह करतो.

लोकशाही विकेन्द्रीकरणाची आपली कल्पना ही प्रामुख्याने भौगोलिक किंवा प्रादेशिक विकेंद्रीकरणाची कल्पना आहे. राज्यपातळीवरून जिल्हापातळीवर, जिल्हापातळीवरून विकासगटाच्या पातळीवर आणि विकासगटाच्या पातळीवरून गावाच्या पातळीवर राज्यकारभाराचे अधिकाधिक विकेन्द्रीकरण करणे ही त्यातील मुख्य कल्पना आहे. त्यामुळे साहजिकच ज्या स्तरापर्यंत विकेन्द्रीकरण करावयाचे त्या स्तरावरील राज्यकारभार आणि विकासकार्यक्रम यांची सर्वांगीण जबाबदारी घेणारी एकच संस्था त्या स्तरावर असावी अशी कल्पना उद्‌भवते. विकेन्द्रीकरण जिल्हापातळीपर्यंत करावे की त्याच्याही पुढे जाऊन ते विकासगटाच्या पातळीपर्यंत न्यावे यासंबंधी बरीच चर्चा झाली आहे आणि तत्‌संबंधी भिन्न मतेही आहेत. परंतु जिल्हा किंवा विकासगट यांपैकी ज्या स्तरापर्यंत विकेन्द्रीकरण करावयाचे त्या स्तरावरील सर्व विकेन्द्रित सत्ता एकाच संस्थेच्या हाती एकवटलेली असावी या संबंधी सर्वांचे एकमत असावे असे दिसते. या उपायाने भौगोलिक किंवा प्रादेशिक विकेन्द्रीकरण होते हे खरे परंतु त्याचबरोबर विकेन्द्रीकरण करावयाच्या स्तरावरील सर्व सत्ता एकाच संस्थेत केन्द्रित होते हे लक्षांत घ्यावयास हवे. हे अनिष्ट आहे असे मला वाटते. हे टाळावयाचे तर लोकशाही विकेन्द्रीकरण जसे प्रादेशिक तसेच विविध कार्यक्षेत्रानुसारही व्हावयास हवे की ज्या योगे विकेन्द्रीकरण करावयाच्या स्तरावरील सत्ता विविध कार्यक्षेत्रानुसार विविध संस्थांत विभागली जाईल.

या मुद्याचा सविस्तर उहापोह करण्यापूर्वी एका लहानशा बाबीचे स्पष्टीकरण करणे उपयुक्त ठरेल. मी आताच म्हटल्याप्रमाणें विकेन्द्रीकरण कोणत्या पातळीपर्यंत करावे यासंबंधी बरीच चर्चा झालेली आहे. बलवंतराय मेहता अभ्यासमंडळाने असे सुचविले होते की लोकशाही सत्तेचे विकेन्द्रीकरण जिल्हापातळीच्याही पुढे म्हणजे विकासगटापर्यंत व्हावे आणि विकासगटपातळीवर पंचायत समित्या स्थापन करून त्यांच्या हाती खरीखुरी सत्ता दिली जावी. जिल्हापातळीवर जिल्हा परिषदा स्थापन कराव्यात परंतु या परिषदांचे कार्य जिल्ह्यातील पंचायत समित्यांना सल्ला देण्याचे, मार्गदर्शन करण्याचे असावे असे या अभ्यासमंडळाने सुचविले होते. या विषयी साहजिकच पुष्कळ चर्चा झाली आणि अंती वेगवेगळ्या राज्यसरकारांनी बलवंतराय मेहता अभ्यासमंडळाच्या या विषयीच्या भूमिकेच्या अगदी उलट भूमिका स्वीकारली आणि जिल्हापातळीवरील जिल्हा परिषदांच्या हाती खरी सत्ता देऊन विकासगटपातळीवरील पंचायत समित्या ह्या जिल्हापरिषदेच्या केवळ प्रादेशिक उपसमित्या रहाव्यात असे ठरविले. या विषयी भिन्न दृष्टिकोण असणे साहजिक असले तरी मला वाटते की, एक गोष्ट उघड आहे. ती अशी की ज्या मानाने खालच्या पातळीपर्यंत सत्तेचे विकेन्द्रीकरण करावयाचे असेल त्यामानाने कमी सत्तेचे विकेंद्रीकरण करता येईल. अर्थातच अधिकांश सत्तेचे विकेन्द्रीकरण साधावयाचे तर ते त्या मानाने वरच्या पातळीपर्यंतच करता येईल. याचे कारणही उघड आहे. उदाहरणार्थ, पंचायत समितीच्या पातळीवर निवडून येणारे लोकप्रतिनिधी आणि त्या पातळीवर पुरविता येतील असे तंत्रज्ञ आणि शासकीय अधिकारी यांचा अनुभव व योग्यता जिल्हापातळीवरील लोकप्रतिनिधी आणि तंत्रज्ञ व अधिकारी यांच्या अनुभवाच्या व योग्यतेच्या तुलनेने अर्थातच गौण असणार. स्वाभाविकच पंचायत समितीच्या पातळीवर सत्तेचे विकेन्द्रीकरण करावयाचे तर ते त्या मानाने कमी सत्तेचेच विकेन्द्रीकरण करता येईल. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य सरकारने खऱ्याखुऱ्या सत्तेचे विकेन्द्रीकरण विकासगट पातळीपर्यंत न करता जिल्हापातळीपर्यंतच केले हे खरे परंतु त्याचबरोबर बलवंतराय मेहता अभ्यासमंडळाने कल्पिलेल्या विकेन्द्रीकरणाच्या मानाने पुष्कळच अधिकांश सत्तेचे विकेन्द्रीकरण महाराष्ट्र राज्यसरकारने साधले आहे हे मान्य केले पाहिजे. व्यक्तिश: मला असे वाटते की, सत्तेचे विकेन्द्रीकरण कार्यक्षम आणि उपयुक्त व्हावयाचे असेल तर ते पुरेशा सत्तेचे व्हावयास हवे. त्याकरता सद्य:परिस्थितीत विकेन्द्रीकरण पुरेशा खालच्या पातळीवर नेता आले नाही तर ते निरुपायाने मान्य करावे. या दृष्टीने मला या बाबतची महाराष्ट्र राज्यसरकारची भूमिका योग्य आणि व्यवहार्य वाटते.

आता याच अनुषंगाने माझ्या मुख्य मुद्याकडे वळू. आतापर्यंतच्या विवेचनाचा मथितार्थ असा की सत्तेचे विकेन्द्रीकरण कार्यक्षम आणि उपयुक्त व्हावयाचे असेल तर ते पुरेशा आणि खऱ्याखुऱ्या सत्तेचे झाले पाहिजे आणि त्याकरता ते पुरेशा वरच्या पातळीवरच, जसे जिल्हापातळीवरच केले पाहिजे. अर्थात् हे ओघानेच येते की, या पातळीवर विकेन्द्रीत केलेली सर्व सत्ता एकाच संस्थेच्या हातांत केन्द्रित केली तर त्या पातळीवर सत्तेचे अनिष्ट प्रमाणांत केन्द्रीकरण होते. उदाहरणार्थ, महाराष्ट्रातीलच परिस्थिती पाहू. महाराष्ट्रांत जिल्हा पातळीवरील राज्यकारभारापैकी कायदा, सुव्यवस्था व न्यायदान एवढ्या बाबी वगळून बाकीच्या बहुतेक सर्व बाबी राज्यसरकारने जिल्हापरिषदांकडे हस्तांतरित केलेल्या आहेत. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, शेती व सहकार या क्षेत्रांतील जिल्हापातळीवरील बहुतेक सर्व कामे जिल्हापरिषदांच्याच स्वाधीन करण्यांत आली आहे. साहजिकच महाराष्ट्रांतील जिल्हापरिषदांकडे खरीखुरी सत्ता आलेली आहे. आर्थिक बळ व मनुष्यबळ या दोनही बाजूंनी या संस्था समर्थ आहेत. एकेका जिल्हापरिषदेचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे दोन ते तीन कोटी रुपयांचे असते आणि तिच्या हुकुमतीखाली दोन-तीन हजार कर्मचारी असतात. हे खऱ्याखुऱ्या अर्थाने लोकशाही विकेन्द्रीकरण आहे यांत मुळीच शंका नाही. परंतु त्याचबरोबर अपरिहार्यपणे जिल्ह्यांतील सत्ता व अधिकार यांचे अनिष्ट प्रमाणांत केन्द्रीकरण झालेले आहे असे मला वाटते. सत्तेचे हे अवास्तव केन्द्रीकरण जिल्हापरिषदांच्या राजकीय तसेच प्रशासनात्मक अशा दोन्ही विभागांत आढळून येते. एका बाजूने जिल्हारिषदेच्या अध्यक्षाच्या हाती राजकीय सत्तेचे फार मोठ्या प्रमाणांत केन्द्रीकरण झालेले आहे. साहजिकच अशा तऱ्हेच्या राजकीय सत्तेच्या केन्द्रीकरणामुळे उत्पन्न होणाऱ्या दोषांची झळ जिल्हापरिषदांना लागण्याचा संभव आहे. त्याचबरोबर दुसऱ्या बाजूने जिल्हापरिषदेच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्याच्या हाती प्रशासनिक सत्तेचे केन्द्रीकरण झालेले आहे. हा अधिकारी भारतीय प्रशासकीय सेवेच्या (आय्.ए.एस्.) वरिष्ठ वेतनश्रेणीतील एक अधिकारी सेवक असतो. जिल्हापरिषदेची कारभारविषयक सारी सत्ता त्याच्या हाती केन्द्रित केलेली आहे. जिल्हापरिषदेच्या सर्व खात्यांतील सारा सेवकवर्ग त्याच्या अंमलाखाली असतो. त्यामध्ये जिल्हापरिषदेच्या सेवेस दिलेले राज्यसरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील पहिल्या वर्गातील अधिकारी येतात. या केन्द्रीकरणाचे अनेक अनिष्ट परिणाम आहेत. त्यापैकी सर्वांत गंभीर परिणाम असा की, जिल्ह्यामध्ये काम करणारा तांत्रिक सेवक वर्ग आणि विभागीय किंवा राज्याच्या पातळीवरील त्या त्या खात्यांतील वरिष्ठ अधिकारी यांचा संबंध तुटतो.

अशा रीतीने जिल्हापरिषदांच्या निमित्ताने जिल्हापातळीवर राजकीय आणि प्रशासनिक सत्तेचे फार मोठ्या प्रमाणावर केन्द्रीकरण झालेले आहे. ते लोकशाही विकेन्द्रीकरणाशी विसंवादी आणि अनिष्ट आहे असे मला वाटते.

लोकशाही विकेन्द्रीकरणाची अशी ही मूलभूत समस्या आहे. सत्तेचे विकेन्द्रीकरण आपण फार खालच्या पातळीवर केले तर पुरेशा खऱ्याखुऱ्या आणि कार्यक्षम सत्तेचे विकेन्द्रीकरण आपण करू शकत नाही. पुरेशा सत्तेचे खरेखरे विकेन्द्रीकरण करावयाचे तर ते पुरेशा वरच्या पातळीवर करावे लागते. परंतु ते तसे केले तर त्या पातळीवर सत्ता व अधिकार यांचे अनिष्ट केन्द्रीकरण होते. मी प्रथमच सांगितल्याप्रमाणें लोकशाही विकेन्द्रीकरण म्हणजे प्रादेशिक सत्तेचे विकेन्द्रीकरण असे जे समीकरण आपण मानले आहे ते या समस्येचे मूळ कारण आहे. म्हणून या समीकरणातून बाहेर पडून सत्तेच्या प्रादेशिक विकेन्द्रीकरणाला आपण विषयवार किंवा खातेवार विकेन्द्रीकरणाची जोड दिली तर ही समस्या सुटू शकेल आणि लोकशाही विकेन्द्रीकरणाचे एक अधिक इष्ट स्वरूप साकार होऊ शकेल असे मला वाटते. महाराष्ट्रातील जिल्हापरिषदांच्या घटनेचे उदाहरण घेऊन मी हा मुद्दा अधिक विशद करून सांगू इच्छितो.

महाराष्ट्रांतील जिल्हा परिषदा एक स्थायी समिती आणि सहा विषय समित्या यांच्याद्वारे काम करतात. जिल्हापरिषदेचा अध्यक्ष हाच स्थायी समितीचा अध्यक्ष असतो. सहा विषय समित्यांचे मिळून तीन अध्यक्ष असतात. म्हणजे दोन दोन विषयसमित्यांना एक अध्यक्ष असतो. विषय समित्यांच्या या तीन अध्यक्षांकडे त्या त्या विषयासंबंधीची सर्व कामे आणि अधिकार वाटून दिलेले असतात. तरीपण जिल्हापरिषदेच्या अधिकार परंपरेत आणि राजकीयदृष्ट्याही विषय समित्यांच्या या अध्यक्षांचे स्थान जिल्हापरिषदेच्या अध्यक्षाच्या खालचे असते. त्यामुळे प्रत्यक्षात जिल्हापरिषदेच्या अध्यक्षाच्या हाती सत्तेचे केन्द्रीकरण होते. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील निरनिराळ्या खात्यांचे प्रमुख त्या त्या विषय समित्यांचे चिटणीस म्हणून काम करतात आणि ते त्या त्या समित्यांना जबाबदार असतात. परंतु कार्यवाहीत ते जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अमलाखाली असल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या हाती सर्व कार्यकारी सत्तेचे केन्द्रीकरण झालेले असते. राजकीय व कार्यकारी सत्तेचे हे केन्द्रीकरण कमी करावयाचे तर जिल्हापरिषदेच्या सत्तेचे विषयवार किंवा खातेवार काही प्रमाणांत विकेन्द्रीकरण होणे जरूर आहे. हे विकेन्द्रीकरण असे व्हावयास हवे की, ज्या योगे विषय समित्यांचे अध्यक्ष हे जिल्हापरिषदेच्या अध्यक्षास गौण राहाणार नाहीत आणि जिल्हापातळीवरील विविध

खात्यांचे प्रमुख जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अंमलाखाली राहणार नाहीत.

प्रत्येक विभागातील सहा-आठ जिल्ह्यांकरता जिल्हापरिषदांच्या प्रत्येक विषयाच्या समित्यांचा एक एक संक्ष किवा विभागीय मंडळ बनविल्यास ही गोष्ट सुलभ रीतीने साधू शकेल असे मला वाटते. उदाहरणादाखल आपण जिल्हापरिषदेची शिक्षणसमिती घेऊ. सध्या ही समिती जिल्हापरिषदेच्या चौकटीत बसून कार्य करते आणि त्या करणाने ती एका बाजूने जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांच्या आणि दुसऱ्या बाजूने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या हुकुमतीखाली राहाते. आता आपण अशी कल्पना करू की प्रत्येक विभागातील सहा-आठ जिल्ह्यांकरता एक एक विभागीय शिक्षण मंडळ स्थापन केलेले असून जिल्हापरिषदांच्या शिक्षण समित्यांचे अध्यक्ष आणि त्याच समित्यांचे चिटणीस म्हणून काम पाहाणारे जिल्हाशिक्षण प्रमुख या मंडळांचे सभासद आहेत. या मंडळाच्या लोकनियुक्त सभासदांनी आपणांपैकी एकाची मंडळाचा अध्यक्ष म्हणून निवड करावी आणि विभागीय शिक्षण अधिकाऱ्याने या विभागीय मंडळाचे चिटणीस म्हणून काम पाहावे. अशा या विभागीय शिक्षणमंडळाकडे त्या विभागातील शिक्षणविषयक धोरण आणि कार्यक्रम यांच्या कार्यवाहीची पूर्ण जबाबदारी सोपविण्यांत यावी आणि त्या विभागातील जिल्हापरिषदांच्या शिक्षणसमित्यांनी विभागीय मंडळाच्या प्रादेशिक साहाय्यक समित्या म्हणून या मंडळाच्या हुकुमतीखाली काम करावे. या शिक्षणमंडळाप्रमाणेच सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, शेती, सहकार इत्यादी विषयांकरताही अशीच विभागीय मंडळे स्थापन करावीत. या सर्व विभागीय मंडळांच्या अध्यक्षांना जिल्हापरिषदांच्या अध्यक्षांच्या बरोबरीचा दर्जा दिला जावा. त्याचबरोबर जिल्हापरिषदांच्या सर्व खात्यांच्या प्रमुखांना जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली न ठेवता त्या त्या खात्यांच्या विभागीय अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ठेवावे. त्यायोगे जिल्हापातळीवरील विविध खात्यांचे अधिकारी आणि विभागीय व राज्यपातळीवरील खात्यांचे अधिकारी याचे दुरावलेले संबंधही पूर्ववत् सांधले जातील.

आर्थिक विकासाचे कार्यक्रम दिवसेंदिवस अधिकाधिक तांत्रिक बनू लागले आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींना या कार्यक्रमांच्या तांत्रिक अंगाचे किमान ज्ञान असणे अगत्याचे झाले आहे. या तांत्रिक अंगाबरोबरच या विषयांच्या बाबतीतील व्यापक सामाजिक-आर्थिक धोरणाविषयीही त्यांना पुरेशी माहिती असणे आवश्यक आहे. यादृष्टीने मी वर सुचविलेल्या विषयवार विभागीय

मंडळाचा उपयोग होऊ शकेल असे मला वाटते. अशा विभागीय मंडळाच्या निमित्ताने जिल्हापरिषदांच्या त्या त्या विषय समित्यांचे अध्यक्ष एकत्र येतील आणि आपापल्या विषयासंबंधींच्या विकासकार्यक्रमात अभिप्रेत असलेल्या व्यापक विकास धोरणासंबंधी चर्चा करू शकतील. याच मंडळावर त्या त्या विषयांतील जिल्हाप्रमुख आपल्या विभागीय प्रमुखाच्या मार्गदर्शनाखाली लोकनियुक्त प्रतिनिधींना म्हणजेच जिल्हापरिषदांच्या विषयसमित्यांच्या अध्यक्षांना समान पातळीवर बसून त्यात या विषयातील तांत्रिक अंगांची माहिती देऊ शकतील. आज हे पुरेशा प्रमाणांत घडत नाही. प्रत्येक खात्याचा जिल्हाप्रमुख संबंधित विषय समितीचा सभासद असतो हे खरे. परंतु तो त्या समितीत एकटाच तंत्रज्ञ असतो आणि पुष्कळदा त्याला समितीतील इतर सभासदांच्या राजकीय दडपणाला तोंड द्यावे लागते. शिवाय त्याच्या खात्यातील त्याच्या बरोबरीच्या आणि वरिष्ठ सहकाऱ्यापासून वेगळा होऊन तो एकाकी झाल्यामुळे एखाद्या प्रश्नाची तांत्रिक बाजू आत्मविश्वासाने आणि निर्भीडपणे समितीसमोर तो मांडू शकत नाही आणि परिणामत: तो समितीतील राजकीय दडपणाला बळी पडतो. विभागीय मंडळांत विभागांतील सर्व जिल्ह्यांचे त्या त्या खात्यांचे प्रमुख एकत्र येतील. शिवाय खात्याचा विभागीय अधिकारीही विभागीय मंडळाचा चिटणीस आणि कार्यकारी अधिकारी म्हणून हजर राहील. त्यामुळे मंडळाच्या विचाराधीन असलेल्या कोणत्याही प्रश्नाची तांत्रिक आणि प्रशासनिक बाजू काय आहे हे मंडळासमोर मांडण्यास या तंत्रज्ञ अधिकाऱ्यांना अडचण पडणार नाही. मंडळामध्ये या तंत्रज्ञ अधिकाऱ्यांना मतदानाचा हक्क नसला तरी मंडळाच्या लोकनियुक्त सभासदांनी घेतलेले सर्व निर्णय पूर्ण माहितीनिशी आणि विचाराअंती घेतलेले असतील या गोष्टीला महत्त्व आहे.

विभागीय मंडळांचा आणखी एक महत्त्वाचा परिणाम असा होईल की जिल्हापातळीवरील खातेप्रमुख आणि इतर कनिष्ठ सेवकवर्ग यांचा त्या त्या खात्यांचे विभागीय आणि राज्य पातळीवरील अधिकारी यांचा जो संबंध आज अगदीच तुटला आहे तो पुनश्च साधला जाईल. अनेक कारणांनी हे होणे जरुर आहे. त्यांतील सर्वात महत्त्वाचे कारण असे की, समाधानकारकपणे काम करता यावे यासाठी आपल्या खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी आपला प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे असे प्रत्येक खात्यातील सेवकवर्गाला वाटते. स्थानिक पातळीवरील राज्यकारभारांत आणि विकासकार्यात लोकनियुक्त प्रतिनिधींनी लक्ष घालावे म्हणून इष्ट ती राजकीय परिस्थिती निर्माण करण्याकडे आपण गेली काही वर्षे पुष्कळ लक्ष दिले आहे. परंतु

सरकारी सेवकवर्गाने कार्यक्षम रहावे यासाठी आवश्यक ती नोकरीविषयक परिस्थिती निर्माण करण्याकडे मात्र आपण अगदीच दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे जिल्हापरिषदेत काम करणाऱ्या सेवकवर्गाच्या मनात अत्यंत कटुता, संताप आणि वैफल्य निर्माण झालेले आहे. इतके की, लोकशाही विकेन्द्रीकरणात सहभागी होऊन सहकार्य देण्यास ते सामान्यत: तयार नसतात. लोकशाही विकेन्द्रीकरण आणि त्यातून घडवून आणावयाचा आर्थिक विकास यांच्या दृष्टीने ही घटना अनिष्ट आहे. लोकशाही स्वातंत्र्याच्या पहिल्या आवेगात या गोष्टीकडे दुर्लक्ष झालेले असले तरी आता या प्रश्नाकडे आस्थेने आणि सहानुभूतीने पाहाणे आवश्यक झाले आहे.

यावर कोणी असा प्रश्न करील की, जिल्हा परिषदांची अशा पद्धतीने पुनर्घटना केल्यास जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांचे काम काय? मी सुचविलेल्या पुनर्घटनेमुळे जिल्हापरिषदांच्या अध्यक्षांची राजकीय सत्ता आणि जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचा प्रशासनिक अधिकारही आजच्या मानाने खूपच कमी होतील यात मुळीच शंका नाही. किंबहुना मी सुचविलेल्या पुनर्घटनेचा तोच मुख्य हेतू आहे. अशा पुनर्घटनेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कामे व अधिकार इतके कमी होतील की या जागेसाठी भारतीय प्रशासकीय सेवेच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील अधिकाऱ्यांची गरजच राहाणार नाही, असे वाटते. परंतु या पुनर्घटनेनंतरही जिल्हापरिषदांच्या अध्यक्षांचे स्थान मात्र जबाबदारीचे राहील. त्यांचे मुख्य काम जिल्हा परिषदांच्या स्थायी समित्यांचे अध्यक्ष या नात्याने असेल. या समित्यांमध्ये इतर लोकनियुक्त सभासदांव्यतिरिक्त जिल्हापरिषदांच्या सर्व विषय समित्यांचे अध्यक्षही असतात. त्यामुळे जिल्हापरिषदेची स्थायी समिती ही जिल्ह्याचा कारभार, विकासकार्यक्रम व तद्विषयक धोरण या बाबतीतील प्रगतीचा वेळोवेळी आढावा घेणारी एक कार्यकारी समिती बनेल. अशा तऱ्हेचा आढावा घेणे आणि त्यात काही उणीवा आढळल्यास त्या त्या विषयांच्या विभागीय मंडळांच्या नजरेस आणणे ही जिल्हा परिषदांच्या अध्यक्षांची जबाबदारी राहील. जिल्हापरिषदांचे आर्थिक हिशेब ठेवण्याची व तपासून घेण्याची जबाबदारीही अध्यक्षांकडेच सोपविण्यास हरकत नाही. तसेच जिल्हा पातळीवरील अनेक विषय समित्यांचा कारभार व्यवस्थितपणे चालण्यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था व साधनसामग्री उपलब्ध करून देणे आणि तिच्यावर देखरेख ठेवणे ही कामे अध्यक्षावरच सोपविता येतील. अशा रीतीने, मी सुचविलेल्या पुनर्घटनेमुळे जिल्हापरिषदांच्या अध्यक्षांची राजकीय सत्ता पुष्कळच कमी झाली तरी आपापल्या जिल्ह्यात निरनिराळ्या विभागीय विषय

समित्यांच्या मार्फत होणाऱ्या कामांत एकसूत्रता आणणे व आवश्यक तेथे त्यांत समन्वय साधणे ही महत्त्वाची जबाबदारी अध्यक्षाकडे राहील.

सारांश, प्रत्येक जिल्ह्यातील सर्व कारभार आणि विकासकामे यांची जबाबदारी पत्करणारी एकमेव संस्था प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्याची कल्पना मला इष्ट वाटत नाही. अशा संस्थेमुळे त्या प्रदेशातील राजकीय सत्तेचे आणि कार्यकारी अधिकाराचे फाजील केंद्रीकरण होते. त्यामुळे ही संस्था एका बाजूने राजकीय व दुसऱ्या बाजूने नोकरशाही ढंगाची बनू लागते. तिच्या या दोन बाजूंमध्ये बहुधा विसंवाद निर्माण होतो, आणि विकास कार्यक्रमांच्या वाढत्या तांत्रिक पैलूंकडे दुर्लक्ष होते. म्हणून महाराष्ट्रातील जिल्हापरिषदांच्या घटनेच्या संदर्भात माझी अशी सूचना आहे की, जिल्ह्याच्या वरच्या पातळीवर म्हणजे सहा-आठ जिल्ह्यांच्या विभागीय पातळीवर प्रत्येक विषयाची विभागीय मंडळे स्थापन करावीत व त्यांना त्या-त्या विषयांचा नित्य कारभार आणि विकास कार्यक्रम यांबाबतीत सर्व कार्यकारी अधिकार देण्यात यावा. अशी विभागीय मंडळे स्थापन केल्यानंतरही सध्या जिल्हा पातळीवर असणाऱ्या विविध विषय समित्या आजच्याप्रमाणेच काम करीत राहतील. मात्र त्या जिल्हा परिदांऐवजी विभागीय मंडळांना जबाबदार असतील. जिल्हापरिषदांचे मुख्य काम वेगवेगळ्या विभागीय विषय समित्यांमार्फत जिल्ह्यात चालणाऱ्या कामात एकसूत्रता आणणे हे राहील. अशा पुनर्घटनेने आजच्या पंचायत समित्यांवर काहीही परिणाम होणार नाही, त्या आजच्या प्रमाणेच काम करीत राहतील. या सर्व तपशीलाच्या बाबी आहेत. महाराष्ट्रातील जिल्हापरिषदांच्या संदर्भात त्यांचे काहीसे सविस्तर विवेचन केवळ उदाहरणादाखल केले आहे. एकदा प्रादेशिक विकेंद्रीकरणाबरोबर विषयवार किंवा खातेवार विकेंद्रीकरणाचे तत्त्व मान्य झाले म्हणजे प्रत्येक राज्यातील पंचायत राज्याच्या सद्य:घटनेला अनुरुप असा तपशीलात बदल करिता येईल.

■■

(अहमदाबाद येथील हॅरॉल्ड लास्की इन्स्टिट्यूट ऑफ पोलिटिकल सायन्स या संस्थेत तारीख ३ डिसेंबर १९६७ रोजी दिलेल्या मूळ इंग्रजी भाषणाचा स्वैर अनुवाद.)

भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथलयाचाही लाभ घेता येईल.

'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलाकडे व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

अर्थबोधपत्रिका मासिक
वर्गणीदारांसाठी विशेष योजना

वार्षिक वर्गणी	**फक्त २००/- रुपये**
द्वैवार्षिक वर्गणी	**फक्त ३५०/- रुपये**
त्रैवार्षिक वर्गणी	**फक्त ५००/- रुपये**
पंचवार्षिक वर्गणी	**फक्त ८००/- रुपये**

The Bank details for NEFT are as under :

- Bank Name : **Vidya Sahakari Bank S.B. Road, Pune 411016.**
- Account Name : **Indian School of Political Economy**
- Bank Account No. : **200403130004208**
- NEFT/RTGS No. : **SVCB0003004**
- IFSC Code : **SVCB0003004**